CMYK

सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | बुधवार, दि. १ जुलै २०२६ | वर्ष – ४ थे | अंक ७८ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## जलसंधारणाची कामे प्राधान्याने पूर्ण करा : फडणवीस

तभा वृत्तसेवा

मुंबई : विविध हवामान संस्थांनी या वर्षीच्या पावसाळ्यामध्ये 'एल निनो'बाबत दिलेल्या इशाऱ्यांबाबत शासन गंभीर आहे. यामुळे निर्माण होऊ शकणारी संभाव्य टंचाई परिस्थिती यशस्वीपणे हाताळण्यासाठी शासन सज्ज आहे. त्यामुळे एल निनोचे संभाव्य संकट हे जलसंधारणासाठी इष्टापत्ती असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कमी कालावधीमध्ये पूर्ण होऊ शकणारी जलसंधारणाची कामे प्राधान्याने पूर्ण करण्याचे निर्देश दिले.विधान भवनातील मंत्रिमंडळ सभागृहात आयोजित बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

बैठकीस जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण पाटबंधारे विकास महामंडळ) मंत्री गिरीश महाजन, जलसंपदा (कृष्णा आणि गोदावरी खोरे पाटबंधारे विकास महामंडळ) मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड उपस्थित होते.राज्यामध्ये नादरुस्त असलेले कोल्हापुरी बंधाऱ्यांना प्राधान्याने दुरुस्त करण्यासाठी धडक कार्यक्रम राबवण्याचे निर्देश देत मुख्यमंत्री फडणवीसम्हणाले, नादरुस्त असलेले कोल्हापुरी बंधारे 'आर्च पद्धतीने' पुलवजा करण्याबाबत पडताळणी करण्यात यावी. जलसंधारणाचे कुठलेही नवीन काम न घेता दुरुस्तीची कामे प्राधान्याने पूर्ण करावी. आपत्ती व्यवस्थापन विभागाने मागील वर्षांमध्ये महाराष्ट्रातील गंभीर दुष्काळी परिस्थिती असलेले भाग चिन्हांकित करावे. संबंधित भागात तत्कालीन परिस्थितीमध्ये राबविण्यात आलेल्या उपाय योजनांच्या अहवाल द्यावा. त्यावर आधारित किंवा आवश्यक ते बदल करून यावेळी उपाययोजना करण्यात याव्यात.कामे पूर्ण करण्यास असलेला कालावधी लक्षात घेता या कामांसाठी गतीने प्रक्रिया राबवावी. नादरुस्त कोल्हापुरी बंधारे दुरुस्त करण्यासाठी जिल्हा नियोजनमधून निधीची तरतूद करण्यात यावी. नादुरुस्त कोल्हापुरी बंधाऱ्यांमध्ये दुरुस्ती करताना धातू विरहित पद्धतीचा पर्याय शोधण्यात यावा. ही उपाययोजना कायमस्वरूपी असावी. याबाबत यंत्रणा निश्चित करून संबंधित यंत्रणेकडे संपूर्ण जबाबदारी देण्यात यावी. संभाव्य परिस्थिती लक्षात घेता लवकर पूर्ण होतील, अशीच जलसंधारणाची कामे हाती घेण्यात यावीत. याबाबत संपूर्ण कार्यवाहीचे अधिकार पाटबंधारे विकास महामंडळ स्तरावर देण्यात यावेत, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. नादुरुस्त कोल्हापुरी बंधाऱ्यांसोबतच जलस्त्रोतांचे बळकटीकरण करण्यात यावे. यासाठीही कार्यक्रम हाती घेण्यात यावा. राज्यामध्ये कृषी क्षेत्रात सौर ऊर्जा निर्मितीची चांगली परिसंस्था निर्माण होत आहे. यामधून निर्मित होणारी सौर ऊर्जेचे वितरण करण्यात यावे. त्यामुळे पारेषण व्यवस्थित होऊन महावितरणच्या यंत्रणेवर ताण येणार नाही. सौर ऊर्जा विषयक उपकरणांच्या दुरुस्तीसाठी संबंधित गाव, पाड्यात दुरुस्तीबाबत कौशल्य विकासाचा कार्यक्रम राबविण्यात यावा. यामुळे स्थानिक बेरोजगार युवक युवतींना रोजगारही उपलब्ध होईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले.

## सचिन अहिर शिंदे सेनेत

तभा वृत्तसेवा

मुंबईः विधान परिषदेच्या उपसभापतीपदासाठी महायुतीकडून सचिन अहिर यांनी अर्ज दाखल केला आहे. कालपर्यंत शिवसेना उबाठामध्ये असलेल्या सचिन अहिर यांनी आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला. यानंतर शिंदे यांनी पत्रकार परिषद घेत त्यांचं पक्षात स्वागत केलं.

शिवसेना कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. त्यामुळेच आज बरेच जण पक्षात स्वतःहून येत असल्याचं त्यांनी सांगितलं. आज आमदार सचिन तेंडुलकर, असं म्हणत एकनाथ शिंदे यांनी पत्रकार परिषदेला सुरुवात केली. यानंतर त्यांनी आपली चूक दुरुस्त करत आमदारसचिन अहिर अशी सुधारणा केली. अहिर यांनी सचिन प्रमाणेच आज षटकार मारल्याचं म्हणत शिंदेंनी त्यांचं कौतुक केलं. गेल्या आठवड्यात ६ खासदारांनी शिवसेनेत प्रवेश केला. त्यांनी षटकार ठोकले. आज सचिन अहिर यांनी षटकार ठोकल्याचं शिंदे म्हणाले. सहा खासदार आमच्या पक्षात येताच काही लोक त्यांच्या मतदारसंघात गेले. तुडवण्याची भाषा केली. पण आम्ही जोडण्याची भाषा करतो. आम्ही तोडकाम नाही, जोडकाम करतो, अशा शब्दांत शिंदे यांनी उद्धव ठाकरेंवर नाव न घेता टीका केली.

विधानसभेचे तीन टर्मचे आमदार, एक टर्म विधान परिषदेचे सदस्य, कामगारांचे नेते, गिरणी कामगारांच्या, कोळ्यांच्या समस्यांशी जाण असलेले नेते असलेले सचिन अहिर अशा शब्दांत शिंदे यांनी सचिन अहिरयांचं कौतुक केलं. २२ जून २०२२ रोजी आम्ही शिवसेनेत उठाव केला. बाळासाहेबांचे विचार जपण्यासाठी, धनुष्यबाण जपण्यासाठी आम्ही उठाव केला. त्या उठावानंतर ३० जून २०२२ रोजी मी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. योगायोग म्हणजे आज त्याला ४ वर्षे पूर्ण झाली आहेत. आज ३० जून आहे. त्याच दिवशी सचिन अहिर यांनी शिवसेनेत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. त्याबद्दल मी त्यांचं अभिनंदन करतो, असं शिंदे म्हणाले.

## इलेक्ट्रीक स्कुटीचा स्फोट

गिरगाव : गिरगाव येथील छत्रपती संभाजीनगर परिसरात मंगळवारी ( दि.३०) सकाळी इलेक्ट्रिक स्कुटीचा अचानक स्फोट होऊन आग लागल्याची धक्कादायक घटना घडली. विशेष म्हणजे, ही स्कुटी चार्जिंगला लावलेली नसतानाही तिच्या बॅटरीचा स्फोट झाल्याने इलेक्ट्रिक वाहनांच्या सुरक्षिततेबाबत पुन्हा एकदा गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. गिरगाव येथील रहिवासी वैभव त्र्यंबक कऱ्हाळे यांनी इलेक्ट्रिक स्कुटी नेहमीप्रमाणे सोमवारी रात्री घरासमोर उभी केली होती. मंगळवारी सकाळी सुमारे आठ वाजण्याच्या सुमारास स्कुटीच्या बॅटरीचा अचानक मोठा स्फोट झाला. त्यानंतर स्कुटीने पेट घेतला आणि आगीच्या प्रचंड ज्वाला उसळल्या.

आगीची तीव्रता इतकी होती की, शेजारी उभ्या असलेल्या वाहनांनाही आग लागण्याचा धोका निर्माण झाला होता. मात्र, स्फोटाचा आवाज ऐकताच परिसरातील नागरिक तातडीने घटनास्थळी धावून आले. त्यांनी प्रसंगावधान राखत आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केल्याने मोठा अनर्थ टळला. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी स्कुटी पूर्णपणे जळून खाक झाली.

## ईशान्य भारतात पावसाचा कहर

गुवाहाटी : ईशान्य भारतात मुसळधार पावसाने थैमान घातले असून आसाम आणि अरुणाचल प्रदेशात पूर व भूस्खलनामुळे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. आसाममध्ये नद्या धोक्याच्या पातळीवरून वाहत असून अनेक गावे पाण्याखाली गेली आहेत. या महापुरामुळे सुमारे २२ हजार नागरिकांना घरे सोडावी लागली असून रस्ते, पूल, शेती आणि घरे जलमय झाली आहेत.आसाममधील धेमाजी जिल्ह्यातील अर्चीपाथर आणि सिमेन स्थानकांदरम्यानचा १९६५ मध्ये बांधलेला महत्त्वाचा रेल्वे पूल पुराच्या पाण्यात वाहून गेला. मुसळधार पाऊस आणि नदीकाठावरील तीव्र धूप यामुळे पुलाचा पाया कमकुवत झाल्याने ही दुर्घटना घडल्याची माहिती नॉर्थईस्ट फ्रंटियर रेल्वेने दिली आहे.धेमाजी जिल्ह्यात अवघ्या २४ तासांत ११० मिमीपेक्षा अधिक पावसाची नोंद झाली असून या दुर्घटनेमुळे रेल्वे वाहतुकीवर मोठा परिणाम झाला आहे. अनेक गाड्यांचे वेळापत्रक विस्कळीत झाले असून काही मार्गांवरील सेवा तात्पुरती स्थगित करण्यात आली आहे

## MPSC परीक्षा आता 'CBT' पद्धतीने होणार



तभा वृत्तसेवा

मुंबई : महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणारी भरती प्रक्रिया अधिक जलद, पारदर्शक आणि आधुनिक करण्यासाठी शासनाने एक अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. यापुढे चझडउ च्या परीक्षा संगणकाधारित (उेर्ज्ञीिशी इरीशव ढशीीं - उइढ) पद्धतीने घेतल्या जातील, अशी घोषणा सामान्य प्रशासन विभाग मंत्री ड. आशिष शेलार यांनी आज विधान परिषदेत केली. विधान परिषदेत नियम २६० अन्वये उपस्थित केलेल्या सामान्य प्रशासन विभागाच्या चर्चेला उत्तर देताना त्यांनी सरकारच्या या आधुनिक धोरणाची सविस्तर माहिती दिली.सभागृहात बोलताना मंत्री ड. आशिष शेलार यांनी सांगितले की, राज्य शासनाने ५ मे २०२० रोजी घेतलेल्या धोरणात्मक निर्णयानंतर विविध विभागांतील मोठ्या प्रमाणावरील पदे आता चझडउ कडे वर्ग करण्यात आली आहेत. पूर्वी आयोगामार्फत दरवर्षी सुमारे ७ ते ७.५ हजार पदांची भरती होत असे, मात्र आता ही संख्या वाढून दरवर्षी अंदाजे ५० ते ६० हजार पदांपर्यंत पोहोचली आहे. त्यामुळे ही महाभरती प्रक्रिया अधिक वेगवान आणि कार्यक्षम करणे गरजेचे झाले आहे. सध्याच्या ऑफलाइन परीक्षा पद्धतीसाठी शाळा आणि महाविद्यालयांच्या उपलब्धतेवर अवलंबून राहावे लागते. तसेच, केंद्र सरकार, इतर राज्ये, बँका आणि विविध संस्थांच्या स्पर्धा परीक्षा याच कालावधीत येत असल्याने परीक्षा केंद्रांची उपलब्धता मिळवणे हे मोठे आव्हान ठरते. या सर्व अडचणींवर मात करण्यासाठी आणि वाढलेल्या पदसंख्येचा ताण लक्षात घेता उइढ पद्धती अत्यंत उपयुक्त ठरेल, असे मंत्री शेलार यांनी स्पष्ट केले.शासनाचे मुख्य उद्दिष्ट हे स्पर्धा परीक्षा देणाऱ्या उमेदवारांचा वेळ वाचवणे हे आहे. विद्यार्थ्यांना परीक्षेच्या निकालासाठी आणि नियुक्तीसाठी अनावश्यक प्रतीक्षा करावी लागू नये, तसेच शासकीय विभागांमधील रिक्त पदे दीर्घकाळ प्रलंबित राहू नयेत, यासाठी भरती प्रक्रियेला गती दिली जात आहे. ज्या वर्षात परीक्षा होईल, त्याच वर्षात पात्र उमेदवारांना नियुक्ती मिळवून देण्याचा मानस शासनाने ठेवला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या अडचणींचाही प्रशासनाने सखोल विचार केला आहे. आज देशभरातील ग्रामीण व शहरी भागांतील विद्यार्थी उ-ढ, गएए, डडउ, ठठइ, खइझड, णऋड-छएढ आणि चक-उएढ यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या परीक्षा उइढ पद्धतीने यशस्वीपणे देत आहेत. त्यामुळे चझडउ मध्येही ही संगणकीय पद्धत प्रभावीपणे आणि यशस्वीपणे राबविणे पूर्णतः शक्य आहे, असेही मंत्र्यांनी सांगितले.

## आसाराम बापूला सर्वोच्च न्यायालयाचा झटका



वृत्तसंस्था

नवी दिल्ली : अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याप्रकरणी जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या स्वयंघोषित अध्यात्मिक गुरु आसाराम बापूला सर्वोच्च न्यायालयाकडून दिलासा मिळालेला नाही. राजस्थान उच्च न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या त्याच्या याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने जामीन देण्यास नकार दिला. केवळ आसारामची प्रकृती गंभीर झाल्यास किंवा त्याच्या जीवाला धोका निर्माण झाल्यासच जामिनाबाबत विचार केला जाईल, असेही न्यायमूर्ती एम.एम. सुंदरेश आणि न्यायमूर्ती शील नागू यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले.

मंगळवारी झालेल्या सुनावणीदरम्यान, न्यायमूर्ती एम.एम. सुंदरेश आणि न्यायमूर्ती शील नागू यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, या टप्प्यावर शिक्षेला स्थगिती दिली जाणार नाही. न्यायालयाने कारागृह प्रशासनाला आसारामला आवश्यक वैद्यकीय सुविधा पुरवण्याची खात्री करण्याचे निर्देश दिले. पुढील निर्णय राज्य सरकारची बाजू ऐकून घेतल्यानंतरच घेतला जाईल. न्यायालयाने राजस्थान सरकारला दोन आठवड्यांच्या आत आपले उत्तर दाखल करण्यास सांगितले आहे.

## स्कुलबसवर झाड कोसळून १० विद्यार्थी जखमी; एक ठार



तभा वृत्तसेवा

मुंबई :मुंबईच्या चेंबूर येथून मोठी बातमी समोर येत आहे. चेंबूरमध्ये शाळेच्या बसवर झाड कोसळल्याची घटना घडली आहे. संबंधित घटना ही चेंबूरमधील ११ नंबर रोडवर घडली आहे. घटना घडली तेव्हा बसमध्ये शाळकरी मुले होती. या दुर्घटनेत १० शाळकरी मुले गंभीर जखमी झाल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. घटनेनंतर मुलांचे रेस्क्यू करुन गाडीतून बाहेर काढण्यात आलं. पण तरीही एक मुलगा गाडीतच अडकल्याची माहिती आहे. त्याला गाडीतून बाहेर काढण्याचे प्रयत्न शर्थीने सुरु आहेत. पण भलंमोठं वृक्ष बसवर कोसळल्याने बसची अवस्थादेखील वाईट झाली आहे. बसचं वरचं छत खालच्या दिशेला दबलं गेल्याने या मुलाच्या बचावकार्यात अडथला येत असल्याची माहिती मिळत आहे. सध्या बचावकार्य युद्ध पातळीवर सुरु आहे. प्राथमिक माहितीनुसार, या बसमध्ये एकूण १३ शाळकरी मुलं होती. एका नामांकीत शाळेची ही बस होती. बस चेंबूरच्या ११ नंबर रोडवरुन जात असताना अचानक भलं मोठं झाड हे या बसवर उन्मळून पडले. या घटनेत बसमधील १० शाळकरी मुले गंभीर जखमी झाले. यापैकी दोघांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे. सर्व जखमी मुलांना जवळील खासगी रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले आहे. तर एक मुलगा हा बसमध्ये अडकला आहे. या मुलाला बाहेर काढण्यासाठी युद्ध पातळीवर प्रयत्न केले जात आहेत. दरम्यान, या दुर्घटनेत एका विद्यार्थिनीचा मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे.घटनेनंतर परिसरातील नागरिक घटनास्थळी मोठ्या संख्येने दाखल झाले.पोलिसांनाया घटनेची तातडीने माहिती देण्यात आली. परिसरातील नागरिकांनी शक्य होईल तशी मदतीला सुरुवात केली. यानंतर अग्निशमक दलाचे कर्मचारी, महापालिकेचे कर्मचारी आणि पोलीस घटनास्थळी दाखल झाले. सर्वांकडून मुलांना बाहेर काढण्याचं काम आधी करण्यात आलं.

## दुर्गम गावांना 'लालपरी'चाच आधार !



तभा वृत्तसेवा

पुणे : ग्रामीण आणि विशेषतः दुर्गम भागातील नागरिकांसाठी एसटीची मुक्कामी बस हाच जगण्याचा आणि प्रवासाचा मोठा आधार ठरत आहे. राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) एसटी विभागाने जिल्ह्यातील ग्रामीण मार्गांवर २६० मुक्कामी बस सुरू केल्या आहेत. एसटीच्या या निर्णयामुळे दुर्गम भागातील हजारो प्रवाशांच्या, विशेषतः महिलांच्या सुरक्षित प्रवासाला मोठे बळ मिळाले आहे. पुणे एसटी विभागातून राज्याच्या कानाकोपऱ्यात बस धावतात. पुणे विभागाकडे सध्या ९२०बस असून, त्यापैकी ८५० बस मार्गावर असतात. यातूनएसटीला दररोज सव्वादोन कोटी रुपयांपेक्षा जास्त उत्पन्नमिळते. एसटीकडून लांब पल्ल्याबरोबरच जिल्ह्यातील छोट्या-मोठ्या गावांना 'शटल बस'मार्फत सेवा दिली जाते. पुणे जिल्ह्यात अजूनही अनेक गावे दुर्गम भागात असल्यामुळे त्यांना तालुका व जिल्ह्याशी जोडणारा महत्त्वाचा दुवा 'लालपरी'च आहे. त्यामुळेच एसटी महामंडळाने रात्री उशिरा गावी जाण्यासाठी आणि सकाळी परत येण्याची सोय व्हावी म्हणून अनेक गावात मुक्कामी बसची संख्या वाढवली आहे. त्याचा दुर्गम भागातील अनेक गावांना मोठा फायदा होत आहे. स्वारगेट, बारामती, दौंड, शिरूर, सासवड, नारायणगाव अशा आगारांतून रात्रीच्या मुक्कामी बसची संख्या मोठी आहे.दुर्गम भागात रात्रीच्या वेळी प्रवास करणे आजही एक मोठे आव्हान असते. खासगी वाहने रात्रीच्या वेळी जादा पैसे उकळतात, शिवाय सुरक्षिततेची कोणतीही हमी नसते. अशा परिस्थितीत, रात्रीच्या वेळी गावाची वेस ओलांडून मंद प्रकाशात गावात येणारी एसटी ग्रामीण जनतेला मोठा दिलासा देते. शाळा-कॉलेज सुटल्यानंतर अंधारात घरी परतणाऱ्या विद्यार्थिनी असोत, की कामावरून उशिरा घरी येणारे चाकरमानी, एसटी गावात मुक्कामी येत असल्याने पालकांची चिंता मिटली आहे. सकाळी लवकर दूध, भाजीपाला घेऊन शहरात जाणारे शेतकरी आणि शाळा गाठणारे विद्यार्थी यांच्यासाठी ही मुक्कामी बस आधार ठरत आहे. वाहतुकीची आधुनिक साधने कितीही वाढली, तरी गाव आणि 'लालपरी' यांचे नाते अतूट आहे. पुणे विभागाने वाढवलेल्या या मुक्कामी फेऱ्या केवळ वाहतुकीची सोय नसून, दुर्गम भागातील शेवटच्या घटकाला सुरक्षित प्रवासाची दिलेली खात्री आहे.मुक्कामी एसटीचे हे चक्र अविरत चालवण्यासाठी चालक आणि वाहक आपल्या कुटुंबापासून दूर राहून सेवा देतात. दुर्गम भागात रात्री थांबताना त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. एसटी महामंडळ त्यांना विशेष'रात्रीचा मुक्काम भत्ता'देते. सध्या चालकाला ८० रुपये भत्ता दिला जात असून, तो देखील वाढवण्याची मागणी होत आहे. या भत्त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या जेवणाची सोय होते. वाहक व चालकांना काही ठिकाणी राहण्यासाठी शाळेची खोली दिली जाते, तर काही ठिकाणी चालक-वाहकांना बसमध्येच रात्र काढावी लागते.




MGM UNIVERSITY
CHHATRAPATI SAMBHAJINAGAR
॥ अप्पो दीपो भव ॥
MGM UNIVERSITY

Join A Research-Driven University
ADMISSIONS OPEN 2026-27

Join Our UG, PG & Ph.D. Programs

JAWAHARLAL NEHRU ENGINEERING COLLEGE
- B.Tech.: Computer Science and Engg., Electrical and Computer Engg., Electronics and Computer Engg., Artificial Intelligence and Data Science, Mechanical Engg., Mechanical and Mechatronics Engg. (Additive Manufacturing), Robotics & Artificial Intelligence, Chemical Engg., Civil Engg.
- B. Architecture • M. Arch.: Environmental Architecture, Interior Design
- M.Tech.: CSE (Digital Transformation), Mechanical Engineering, VLSI &ES, Electrical Power System, Structural Engg.
- MCA: Master of Computer Applications

INSTITUTE OF INFORMATION & COMMUNICATION TECHNOLOGY
- B. Tech.: Information Technology, AI & ML, Data Science, Computer Science and Engg. (AI) with IBM • M. Tech.: Data Science, AIML

SCHOOL OF ENGINEERING & TECHNOLOGY
- Integrated B.Tech. (After 10th, 6 years): Computer Science and Engg. (IoT, Cyber Security Including Block Chain Technology), Computer Science and Engg. (Data Science), Robotics and Artificial Intelligence, Civil Engg.
- B.Tech.: Computer Science and Engg. (IoT, Cyber Security Including Block Chain Technology), CS and Engg. (Cyber Security), Electronics Engg. (Semiconductor), Robotics and Automation, Electrical Engg.

UNIVERSITY DEPT. OF INSTRUMENTATION & CONTROL ENGG.
- B.Tech.: Instrumentation & Control Engineering

UNIVERSITY DEPARTMENT OF PHARMACEUTICAL SCIENCES
- B. Pharmacy • D. Pharmacy

INSTITUTE OF MANAGEMENT & RESEARCH
- BBA: Business Analytics, General, Fin Tech
- MBA • Executive MBA (1 year) • B.Com | M.Com

INSTITUTE OF HOTEL MANAGEMENT
- B.Sc.: Hotel Operations Catering Services, Culinary Arts
- B.B.A.: in Aviation, Hospitality and Travel & Tourism Studies
- M. Sc.: Hotel Operations Catering Services

DR. G.Y. PATHRIKAR COLLEGE OF CS & IT
- B. Sc.: Computer Science, Information Technology, Animation, Artificial Intelligence and Machine Learning (IBM)
- BCA: Science, Digital Marketing
- Integrated M.Sc.Data Science (5 Years)
- M. Sc.: Computer Science, Information Technology, Data Science

INSTITUTE OF BIOSCIENCE & TECHNOLOGY
- B. Tech.: Biotechnology, Food Processing Tech., Biomedical, Bioinformatics
- M. Tech.: Biotechnology, Food Technology
- B. Sc.: Biotechnology, Bioinformatics, Microbiology, Food Nutrition & Dietetics
- M. Sc.: Biotechnology, Bioinformatics, Microbiology / Virology

SCHOOL OF BASIC AND APPLIED SCIENCES
- B.Sc.: Physics, Chemistry, Mathematics, Statistics, Forensic Science, Geology, Environmental Science, Community Science
- M.Sc.: Physics, Chemistry, Mathematics, Community Science Applied Geology, Forensic Science, Environmental Science, Geoinformatics, Digital and Cyber Forensic Science, Quantum Technology • B.Tech. | M.Tech.: Cosmetic Technology

COLLEGE OF COMMUNICATION, CULTURE AND MEDIA
- B.A.: Multimedia Journalism, International Journalism and Electronic Media
- M.A.: Mass Communication, Broadcast Communication

DEPARTMENT OF PHOTOGRAPHY
- B.A.: Photography • M.A.: International photography
- PG Diploma

INSTITUTE OF INDIAN & FOREIGN LANGUAGES
- B.A.: English • M.A.: English, Marathi, Hindi, Urdu, Sanskrit
- Diploma (1 year): French, German, Japanese

INSTITUTE OF SOCIAL SCIENCES
- BSW • B.A.: Psychology, Economics • MSW
- M.A.: Clinical Psychology, Economics Sustainable Entrepreneurship, Economics, Political Science, Sport Psychology, Child Psychology, History & Archaeology

SCHOOL OF LEGAL STUDIES & RESEARCH
- LL.B • BBA-LL.B. • LLM

MAHĀGĀMI GURUKUL CENTER FOR PERFORMING ARTS
- BPA: Kathak Dance Kalā Vid Kathak, Odissi Dance Kalā Vid Odissi, Kalā Vid Bharatanatyam • MPA: Kathak Kalā Kovid, Odissi Kalā Kovid • M.A.: Musicology, Indology

LEONARDO DA VINCI SCHOOL OF DESIGN
- BFA.: Applied Art, Drawing & Painting
- B. Des.: Interior Design, Fashion Design, Textile Design, Visual Communication, UI/UX Design, Industrial Design
- M. Des.: Textile Design, UI/UX Design
- MFA.: Drawing & Painting • M.F.M Fashion Management

SCHOOL OF FILM ARTS
- B.Des. | M.Des. Filmmaking

SCHOOL OF INTERDISCIPLINARY STUDIES
- M.LISc. • M.A: Philosophy, Women and Gender Studies, Gandhian Studies, Buddhist Studies

DEPT. OF SPORTS, PHYSICAL EDUCATION & YOG SCIENCE
- BPES • M.A: Physical Education, Yog Science

DEPT. OF EDUCATION
- B.A | M.A: Education

DEPT. OF MUSIC & THEATER
- BPA.: Theatre, Music

90676 12000 | 0240 6481111 | mgmu.ac.in
MGM Campus, N-6, Cidco, Chhatrapati Sambhajinagar, Maharashtra.
Scan To Apply

# पैठणला सापडला 15 किलोचा सिल्वर मासा



तभा वृत्तसेवा

**पैठण दि ३० :-** मराठवाड्यात प्रसिद्ध असलेल्या मासे खवय्येसाठी पैठणला नाथसागर जलाशयात 15 किलोचा सिल्वर मासा मच्छिमार रवी पल्लारे यांच्या जाळ्यात मिळाला असून हा मासा बघण्यासाठी नागरिकांनी एकच गर्दी केली होती.

जून जुलै महिन्यात माशांचा प्रजनन काळ असल्याने नाथ सागर जलाशयात मोठे मासे आता पाण्याचे वर आलेले दिसत आहे. मंगळवारी नाथ सागर जलाशयात मासेमारी करणारे मासे विक्रेते रवी पल्लारे यांना 15 किलोचा सिल्वर मासा गावला वजन जास्त असल्याने मासा खाण्यास चविष्ट लागतो असे मासे खवय्येयांच म्हणणे आहे. जायकवाडी जलाशयात शासनाच्या वतीने मत्सबीज सोडण्यात यावे अशी मागणी स्थानिक मच्छीमार बांधवांनी केली आहे. दरम्यान नाथसागरत सापडलेल्या 15 किलोचा सिल्वर मासा पाहण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती.

# एमजीएममध्ये कबीर जयंती निमित्त 'कहत कबीर' कार्यक्रमाचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर, दि.३० :** संत कबीर यांच्या जयंतीनिमित्ताने महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या वतीने कबीरांच्या रचनेवर आधारित कहत कबीर..' या गीत गायनाच्या कार्यक्रमाचे आयोजन गुरूवार, दिनांक २ जून २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता रुक्मिणी सभागृह येथे करण्यात आले आहे. या कार्यक्रमास कुलपती अंकुशराव कदम, कबीर मठाचे मठाधिपती महंत शांतीदास, कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, स.भू. महाविद्यालय संगीत विभागाचे प्रमुख डॉ.संजय मोहोड आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमात राहुल खरे हे कबीरांच्या रचना गाणार असून त्यांना साथसंगत सतीश जोगदंड, गौरव ढोले, कन्हैया लाटे, सचिन राठोड हे करतील तर निवेदन राजू सोनवणे यांचे असणार आहे. या कार्यक्रमास सर्वांना खुला प्रवेश असून कार्यक्रमाचा रसिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# बीएसव्ही कंपनीकडून '4ए' मोहिमेला प्रारंभ

जालना – देशभरात आता पावसाला सुरुवात झाली आहे. ग्रामीण भागांत पावसाच्या दिवसांत अनेकांना सर्पदंश होतो. या घटनांमध्ये आता वाढ होऊ लागली आहे. सर्पदंशाच्या वाढत्या घटना हा सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेसमोरील मोठे आव्हान बनले आहे. या समस्येवर मात करण्यासाठी बीएसव्ही- मॅनकाईंड ग्रुप कंपनीने पुढाकार घेतला आहे. ही कंपनी गेल्या वीस वर्षांपासून उच्च दर्ज्याच्या सर्पदंश प्रतिबंधक औषधाची निर्मिती करत आहे. सर्पदंशाच्या या देशव्यापी समस्येचा सामना करण्यासाठी कंपनीने आता सर्वसमावेशक '4ए' मोहिमेचा शुभारंभ केला आहे. देशभरात या मोहिमेचा व्यापक प्रचाक सुरु असून, ग्रामीण भागातील नागरिकांचे प्राण वाचवण्यासाठी कंपनीने आपले सर्वतोरिपरि प्रयत्न सुरु केले आहेत.

# सोनी पल वर रामानंद सागर यांची 'रामायण' मालिका आधुनिक काळातील तणावावर उत्तर

मुंबई- भारतातील लोकप्रिय फ्री-टू-एअर मनोरंजन वाहिनी सोनी पल , जी आपल्या वैविध्यपूर्ण आणि दर्जेदार कार्यक्रमांसाठी तसेच व्यापक पोहोचीसाठी ओळखली जाते, अभिमानाने रामानंद सागर यांची कालजयी मालिका 'रामायण' प्रेक्षकांसाठी घेऊन येत आहे. १९८७ मध्ये प्रथम प्रसारित झालेल्या या मालिकेने भारतीय दूरचित्रवाणीच्या इतिहासात सांस्कृतिक पर्व निर्माण केले होते. प्रत्येक रविवारी सकाळी संपूर्ण देश या मालिकेसाठी थांबत असे. ७८ भागांच्या या अमर गाथेने दूरचित्रवाणीच्या चौकटीपलीकडे जाऊन भारतातील असंख्य कुटुंबांना श्रद्धा, भक्ती आणि संस्कारांच्या धाग्यात बांधले. हनुमान आणि यशोमती मय्या यांच्या यशानंतर, सोनी पल आता आपल्या भक्तिमय कार्यक्रमांच्या मालिकेला अधिक बळ देत मूळ 'रामायण' प्रेक्षकांसमोर सादर करत आहे. प्रभू श्रीरामांची ही दिव्य गाथा आजच्या धकाधकीच्या जीवनात प्रेक्षकांना मनःशांती, स्थैर्य आणि स्पष्ट विचारांची प्रेरणा देईल. श्रद्धा आणि ज्ञानाच्या चिरंतन शक्तीची आठवण करून देणारी ही मालिका आजही तितकीच प्रेरणादायी आहे.

# दीर्घकालीन भागीदारी अधिक मजबूत

**छत्रपती संभाजीनगर ::** भारतातील सर्वात मोठी आणि जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या एकात्मिक वाहतूक सेवा कंपन्यांपैकी एक असलेल्या अदाणी पोर्ट्‌स अँड स्पेशल इकॉनॉमिक झोन (एपीएसईझेड) आणि जगातील सर्वात मोठ्या वाहतूक व लॉजिस्टिक्स समूहांपैकी एक असलेल्या एमएससी समूहाने महत्त्वपूर्ण करार केला आहे. या करारानुसार, एमएससी समूहाची कंटेनर टर्मिनल संचालन व गुंतवणूक करणारी कंपनी टर्मिनल इन्व्हेस्टमेंट लिमिटेड विजिंजम बंदराचे सवलतधारक असलेल्या एव्हीपीपीएल मध्ये 49 टक्के हिस्सा खरेदी करण्यासाठी गुंतवणूक करणार आहे. हा व्यवहार नियामक मंजुरींसह आवश्यक सर्व मंजुरी मिळाल्यानंतर पूर्ण होईल. या कराराअंतर्गत टीआईएल कंपनी 2.85 अब्ज अमेरिकी डॉलर मूल्याच्या एकूण व्यवहारातील आपल्या 49 टक्के हिस्स्याप्रमाणे 1.397 अब्ज रिकी डॉलरची गुंतवणूक करणार आहे.

# एचडीएफसी बँकेच्या अध्यक्षपदी राजीव कुमार

**मुंबई :** एचडीएफसी बँकेने माजी वित्तीय सेवा सचिव राजीव कुमार यांची अंशकालीन बिगर कार्यकारी अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली आहे. बँकेच्या संचालक मंडळाने आज झालेल्या बैठकीत या नियुक्तीला मंजुरी दिली. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मंजुरीनंतर तसेच भागधारकांच्या संमतीनंतर ही नियुक्ती प्रभावी होणार आहे.राजीव कुमार यांची जून २०२६ पासून चार वर्षांच्या कालावधीसाठी अतिरिक्त (स्वतंत्र) संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानंतर त्यांची तीन वर्षांच्या कालावधीसाठी अंशकालीन अध्यक्ष म्हणून नियुक्ती होणार असून ती भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मंजुरीच्या अधीन असेल. तसेच, स्वतंत्र संचालक म्हणून नियुक्तीसाठी भागधारकांची मंजुरीही आवश्यक असेल, असे बँकेने सांगितले आहे.

# एचझेडएल व्हिजन 2.0 अंतर्गत उत्पादन दुप्पट करून 2 एमटीपीए करण्याचे उद्दिष्ट

**छत्रपती संभाजीनगर :** वेदांता समूहातील कंपनी, जगातील सर्वात मोठी एकात्मिक झिंक उत्पादक आणि जागतिक स्तरावरील अव्वल १० सिल्व्हर उत्पादकांपैकी एक असलेल्या हिंदुस्थान झिंक लिमिटेडने आपल्या ६० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला. कंपनीने आपल्या कार्याची सहा दशके साजरी करतानाच 'हिंदुस्थान झिंक २.०' हा दृष्टिकोन अधिक दृढ केला असून, भविष्यासाठी सज्ज असलेल्या मल्टी-मेटल एंटरप्राइझमध्ये कंपनीचे वेगाने रूपांतर होत आहे. आर्थिक वर्ष २०२६ मध्ये कंपनीने विक्रमी कामगिरी नोंदवली आहे. १.१ दशलक्ष टनांपेक्षा जास्त खाणकाम करून सर्वाधिक धातू उत्पादन आणि दुसऱ्या क्रमांकाचे रिफाइंड धातू उत्पादन गाठत असतानाच, कंपनीने जागतिक स्तरावर सर्वात कमी खर्चाचे मॉडेल राखले आहे. उत्कृष्ट कार्यप्रणाली आणि शिस्तबद्ध खर्च व्यवस्थापनाच्या बळावर ५०% पेक्षा जास्त ईबीआयटीडीए मार्जिन, विक्रमी महसूल आणि निव्वळ नफ्यासह आर्थिक वर्ष २०२६ हे हिंदुस्थान झिंकच्या इतिहासातील सर्वात मजबूत आर्थिक वर्षांपैकी एक ठरले आहे.

# जिल्हा बँक निवडणुकीसाठी भाजपची मोर्चेबांधणी; नगरसेवकांना किशोर शितोळे यांचे नियोजनाचे धडे

## प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचून मतदान सुनिश्चित करण्याचे आवाहन; संघटनशक्तीच्या बळावर विजयाचा निर्धार




तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** आगामी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपने निवडणूक तयारीला वेग दिला असून, विभागीय कार्यालयात पक्षाच्या नगरसेवकांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत भाजपचे जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे यांनी नगरसेवकांना निवडणुकीचे बारकावे समजावून सांगत प्रत्येक मताचे प्रभावी नियोजन करण्याचे आवाहन केले.

यावेळी शितोळे यांनी मतदारांचा संपर्क, त्यांच्यापर्यंत वेळेत पोहोचणे, मतदानाच्या दिवशी मतदान सुनिश्चित करणे, कार्यकर्त्यांची जबाबदारी, पक्षाची भूमिका आणि पुढील निवडणूक रणनीती याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. संघटित आणि नियोजनबद्ध काम केल्यास जिल्हा बँक निवडणुकीत भाजप निश्चित यश मिळवेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

बैठकीत कॅबिनेट मंत्री अतुल सावे, माजी खासदार डॉ. भागवत कराड आणि महापौर समीर राजूरकर यांनीही कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करत संघटनशक्ती, समन्वय आणि मतदारांशी सातत्यपूर्ण संपर्क ठेवण्यावर भर दिला. संघटनेचे बळ, कार्यकर्त्यांची एकजूट आणि प्रभावी नियोजनाच्या जोरावर आगामी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक निवडणुकीत विजय संपादन करण्याचा निर्धार यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला.

बैठकीस मनपा स्थायी समितीचे सभापती अनिल मकरिये तसेच नगरसेवक शिवाजी दांडगे, संजय चौधरी, दिलीप थोरात, जालिंदर शेंडगे, सुरेंद्र कुलकर्णी, राजू शिंदे, शंकर म्हात्रे, विजय औताडे, कैलास गायकवाड, राजगौरव वानखेडे, सागर निळकंठ आणि विक्रम पवार उपस्थित होते.

# न्यू हायस्कूल पाल विद्यार्थी पालकांचा गौरव पत्र व रोख पारितोषिक देऊन सत्कार कार्यक्रम संपन्न



फुलंब्री (प्रतिनिध)दरवर्षी प्रमाणे याही वर्षी न्यू हायस्कूल पाल येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परीक्षेत प्रथम,दुतीया,तृतीय आलेल्या विद्यार्थी व पालकांचा गौरव पत्र व रोख पारितोषिक देऊन गुणगौरव करण्यात आला आहे.

माध्यमिक शालांत परीक्षेत प्रथम क्रमांक हर्षल ज्ञानेश्वर जाधव,दुतीया क्रमांक श्रद्धा शंकर गोल्हारे,तृतीय क्रमांक सुनील आजिनाथ लहाने यांनी असे प्राविण्य मिळवलेले असून उच्च माध्यमिक शालांत परीक्षेत प्रथम क्रमांक गायत्री बाबासाहेब बहादुरे,दुतीया क्रमांक विशाखा सुनील बचुटे,दुतीया क्रमांक कल्याणी राजू सोनवणे यांनी असे प्राविण्य मिळवलेले आहे.

यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती चंद्रकांत जाधव,शालेय समिती अध्यक्ष चंद्रशेखर भगवान जाधव,उपाध्यक्ष कैलास दगडू जाधव,शालेय समिती सन्मानीय सदस्य सारंगधर मारोती जाधव,ग्रामपंचायत माजी उपसरपंच ज्ञानेश्वर तेजराव जाधव त्याचप्रमाणे जगन्नाथ काका जाधव,सुभाष सुलताने,धोंडूराज ढेपले, उत्तम पांडू जाधव, शंकर गोल्लारे,ज्ञानेश्वर सूर्यभान जाधव, एकनाथ इंगळे,सोनवणे मिस्तरी,ज्ञानेश्वर सोनवणे श्री. सुरडकर आदी पाल गावातील ग्रामस्थ तसेच प्रमुख पाहुणे गजानन मरकड,मिटूसिंह बहुरे,देशमुख सर, मनोज सूर्यवंशी हे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन करणारे ज्ञानेश्वर बोरसे बाबासाहेब बोरसे व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते यावेळी

विद्यार्थी व पालकांचा गौरव पत्र व रोख पारितोषिक देऊन गुणगौरव करण्यात आला आहे,या कार्यक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक यांनी अत्यंत उत्कृष्ट असे नियोजन केले शेळके मॅडम यांनी सूत्रसंचालन केले असून शाळेचे सर्व शिक्षकवृंद,शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी स्वातंत्र्य दिनाचा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मोठ्या प्रमाणात परिश्रम घेत मोलाचे योगदान दिले.

# विद्यार्थी हिताला प्राधान्य; एमजीएम विद्यापीठाकडून 4,543 अभियांत्रिकी पुस्तकांचे शैक्षणिक संस्थांना वाटप

## कुलपती अंकुशराव कदम यांच्या हस्ते पुस्तक वितरण



तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** विद्यार्थ्यांना दर्जेदार संदर्भ साहित्य सहज उपलब्ध व्हावे आणि ग्रामीण व निमशहरी भागातील शैक्षणिक संस्थांनाही समृद्ध ग्रंथसंपदेचा लाभ मिळावा, या उद्देशाने महात्मा गांधी मिशन (एमजीएम) विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीतर्फे ग्रंथालयातील अभ्यासासाठी उपयुक्त असलेली तब्बल ४,५४३ अभियांत्रिकी पुस्तके विविध शैक्षणिक संस्थांना वितरित करण्यात आली.

एमजीएमच्या विश्वस्त कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमात विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम यांच्या हस्ते संबंधित संस्थांच्या प्राचार्यांना प्रातिनिधिक स्वरूपात पुस्तकांचे वितरण करण्यात आले. यावेळी कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, संचालिका डॉ. परमिंदर कौर, विभागप्रमुख प्रा. पियुष काळे, ग्रंथपाल सखाराम हारकळ, उज्ज्वला इंगोले यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

एमजीएमच्या ग्रंथालयातील हजारो पुस्तकांचे विषयानुसार वर्गीकरण करून विविध अभियांत्रिकी शाखांतील उपयुक्त पुस्तके संबंधित संस्थांना देण्यात आली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना अद्ययावत संदर्भ साहित्य उपलब्ध होण्यास मोठी मदत होणार असून शैक्षणिक गुणवत्तेलाही चालना मिळणार आहे.

या उपक्रमाअंतर्गत यशोदीप इन्स्टिट्यूट ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन (एमसीए) ला संगणक व विद्युत अभियांत्रिकी शाखेतील पुस्तके, तर आर. जी. इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीला स्थापत्य, यांत्रिकी, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन तसेच अप्लाईड सायन्स शाखेतील मोठ्या प्रमाणावर पुस्तके देण्यात आली. तसेच एमजीएम क्लोव्हर डेल स्कूल, एमजीएम ज्युनिअर कॉलेज आणि एमजीएम संस्कार विद्यालय यांनाही विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन पुस्तकांचे वितरण करण्यात आले.

पुस्तकांचा स्वीकार प्राचार्य प्रवीण माळी, प्राचार्य सागर पवार, प्राचार्या सविता नरवडे, मुख्याध्यापिका उषा जाधव आणि उपमुख्याध्यापिका वर्षा पोतदार यांनी केला.

# आ प्रशांत बंब यांच्या वतीने मौजे खांडी पिंपळगाव येथील अभ्यासिकेसाठी पुस्तके भेट



तभा वृत्तसेवा

खुलताबाद प्रतिनिधी खांडपिंपळगाव तालुका खुलताबाद येथील क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले अभ्यासिका व मौजे जाफरवाडी येथील धर्मवीर अभ्यासिकेसाठी एम पी एस सी पूर्व परीक्षा तयारी त्याचप्रमाणे पोलीस भरती प्रशिक्षण तयारीसाठी लागणारे मोफत पुस्तके उपलब्ध करून देण्यात आले यावेळी भारतीय जनता पार्टी जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे खुलताबाद आर पी आय तालुका अध्यक्ष फकीरराव भालेराव. भागचंद जोनवाळ माजी सरपंच सज्जनसिंग झाला तुकाराम महालकर प्रेमसिंग जोनवाळ अशोक महालकर अशोक पवार सिंग जोनवाळ अनिल भालेराव चरण सर बाबासाहेब भालेराव राहुल झाला प्रकाश सिंग झाला दुर्गा सिंग झाला अंबर सिंग राजपूत चंदू सिंग राठोड संजीव सिंग राजपूत अरविंद झाला मनीषाबाई राजपूत आदी उपस्थित होते

# पैठण काँग्रेस पक्षाच्या शहराध्यक्षपदी हस्नोद्दीन कट्यारे



तभा वृत्तसेवा

**पैठण दि ३० :-** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या वतीने राज्यभरातील ब्लॉक अध्यक्षांची निवड करण्यात आली असून पैठण चे नगरसेवक हसनोद्दीन कट्यारे यांना पक्षाने पुन्हा एकदा संधी दिली असून त्यांची पैठण ब्लॉक अध्यक्ष (शहराध्यक्ष) पदावर नियुक्ती केली आहे.

पैठण काँग्रेस पक्षात मोठ्या प्रमाणात गटबाजी असून अश्या प्रतिकूल परिस्थितीत पैठण शहरासह तालुक्यात काँग्रेस पक्ष वाढीसाठी मागच्या अनेक वर्षापासून हसनोद्दीन कट्यारे हे काम करत आहे. त्याच्या कामाची दखल घेत पक्षाने त्यांना पैठण शहराध्यक्ष पदाची जबाबदारी सोपवली होती. पैठण नगर पालिका निवडणुकीत अत्यंत विपरीत परिस्थितीत त्यांनी चार नगरसेवक निवडून आणले होते. पक्षाने त्याच्या या कामाची दखल घेत हसनोद्दीन कट्यारे यांना पुन्हा एकदा पैठण काँग्रेस शहराध्यक्ष पदाची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली आहे.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या वतीने नुकतेच राज्यातील ब्लॉक अध्यक्ष जाहीर करण्यात आले. या यादीत हसनोद्दीन कट्यारे यांना पैठण शहर ब्लॉक अध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल खासदार कल्याण काळे यांच्या सह काँग्रेस पक्षाच्या जिल्हा व शहरातील पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# बिडकीन येथे मुस्लिम समाजाकडून पोलिसांना निवेदन



तभा वृत्तसेवा

**बिडकीन दि. ३० जून :** पैठण तालुक्यातील बिडकीन येथे मुस्लिम समाजाच्या वतीने मंगळवारी बिडकीन पोलीस ठाण्यात निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, नाजीया इलाही खान यांनी काही दिवसांपूर्वी हजरत मोहम्मद पैगंबर यांच्याविषयी आक्षेपार्ह वक्तव्य केल्याचा आरोप असून, त्यामुळे मुस्लिम समाजाच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्या आहेत. संबंधित महिलेवर कायदेशीर कारवाई करून तात्काळ अटक करण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. यासाठी बिडकीन बसस्थानकापासून बिडकीन पोलीस ठाण्यापर्यंत मुस्लिम समाजाच्या वतीने शांततेत मोर्चा काढण्यात आला. त्यानंतर सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांना निवेदन सादर करण्यात आले. यावेळी संबंधित महिलेवर कठोर कायदेशीर कारवाई करून तिला तात्काळ अटक करण्यात यावी, अशी मागणी मुस्लिम समाजाच्या वतीने करण्यात आली.

# प्रख्यात गायिका आशा भोसले व प्रख्यात भारतीय संगीतकार आर डी बेर्मन यांना स्वर स्वामी कला साधना ग्रुप तर्फे स्वरमयी मानवंदना



*"खुल्लम खुल्ला प्यार करेंगे हम दोनों"*

*'स्वर स्वामी कला साधना'*- प्रस्तुत *"खुल्लम खुल्ला प्यार करेंगे हम दोनों"* हा हिंदी व मराठी गीतांचा बहारदार कार्यक्रम शनिवार दिनांक २७ जून २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजता सायन येथील सरस्वती ऑडिटोरियम, गोकुळ हॉल येथे अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात आणि जल्लोषात संपन्न झाला. प्रख्यात गायिका आशा भोसले व प्रख्यात भारतीय संगीतकार आर डी बर्मन यांना स्वर स्वामी कला साधना ग्रुप तर्फे स्वरमयी मानवंदना देण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे आयोजक *श्री. गणेश हातगे सर*, *सौ. प्रियंका हातगे मॅडम*, *श्री. राजेश हुन्नरी सर* आणि *कु. सौरव हातगे* यांनी कार्यक्रमाचे नियोजन अतिशय शिस्तबद्ध आणि उत्कृष्ट पद्धतीने केले. त्यांच्या अथक परिश्रमांमुळे संपूर्ण कार्यक्रम सुरळीतपणे पार पडला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन *तन्वी मॅडम* यांनी आपल्या सुमधुर आवाजात, आकर्षक शेरो-शायरी आणि प्रभावी निवेदन शैलीत केले. त्यांच्या ओघवत्या सूत्रसंचालनामुळे रसिक प्रेक्षक कार्यक्रमाच्या शेवटपर्यंत खिळून राहिले.

कार्यक्रमातील प्रत्येक गायक आणि गायिकेने आपल्या सुरेल आवाजात हिंदी व मराठी गाण्यांचे अप्रतिम सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. प्रत्येक गाण्यानंतर रसिक प्रेक्षकांनी टाळ्यांचा कडकडाट करून कलाकारांना भरभरून दाद दिली आणि प्रोत्साहन दिले.

ध्वनिक्षेपणाची जबाबदारी सांभाळणारे *श्री.निखिल सर* यांनी उत्कृष्ट दर्जाची ध्वनी व्यवस्था उपलब्ध करून दिली. त्यामुळे प्रत्येक कलाकाराचा आवाज स्पष्टपणे आणि प्रभावीपणे प्रेक्षकांपर्यंत पोहोचला.

तसेच व्हिडिओ एडिटर व कराओके क्षेत्रात २५०० गाण्यांचे मोफत कराओके ट्रॅक बनवून देणारे *श्री. सुनिल मांजरेकर सर* यांनी आपल्या कलात्मक कौशल्याचा सुंदर आविष्कार सादर केला. प्रत्येक गाण्यानुसार योग्य चित्रे, फोटो आणि दृश्ये स्क्रीनवर दाखवून त्यांनी कार्यक्रमाची रंगत आणखी वाढवली.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून संगीत क्षेत्रातील नामवंत व्यक्तिमत्त्व व समाजसेवक *श्री. गिरीशजी परमार सर*, ए.सी. पी. *श्री. किशोरजी शिंदे साहेब* आणि फिल्म डायरेक्टर *श्री. प्रकाश भालेकर* सर उपस्थित होते. त्यांचा *'स्वर स्वामी कला साधना'* परिवाराच्या वतीने यथोचित सन्मान व सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचे आणखी एक विशेष वैशिष्ट्य म्हणजे कार्यक्रम वेळेवर सुरू झाला आणि नियोजित वेळेतच संपन्न झाला. कार्यक्रम हाऊसफुल्ल झाला असूनही रसिक प्रेक्षकांनी शेवटपर्यंत उपस्थित राहून कलाकारांना भरभरून प्रतिसाद दिला. त्यामुळे हा कार्यक्रम खऱ्या अर्थाने सदाबहार, संस्मरणीय आणि अविस्मरणीय ठरला.

प्रत्येक गायक-गायिकेचे फोटो व व्हिडिओ शूटिंग *श्री. चरण सिंग सर* यांनी अत्यंत समर्थपणे पार पाडले. त्यांच्या उत्कृष्ट छायाचित्रणामुळे कार्यक्रमातील सुंदर क्षण कायमस्वरूपी जतन झाले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी योगदान देणारे सर्व आयोजक, गायक-गायिका, मान्यवर पाहुणे, रसिक प्रेक्षक, सरस्वती ऑडिटोरियम गोकुळ हॉलचे व्यवस्थापक व कर्मचारी यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

शेवटी *सुरेल मेलडी गीतांनी* कार्यक्रमाचा सुंदर समारोप करण्यात आला आणि आनंददायी वातावरणात कार्यक्रमाची सांगता झाली.

स्वर स्वामी कला साधना या मंचाद्वारे महानगरपालिका आजी माजी कर्मचारी, निवृत्त इंजिनीअर, डॉक्टर, विद्यार्थी, जेष्ठ नागरिक, उद्योगपती अशा समाजातील विविध स्तरातील गायक गायिका यांना आपली कला सादर करता येते हेच या ग्रुप चे वैशिष्ट्य आहे.

*"खुल्लम खुल्ला प्यार करेंगे हम दोनों"* हा कार्यक्रम संगीतप्रेमींच्या हृदयात कायमस्वरूपी घर करून गेला. उत्कृष्ट नियोजन, सुरेल सादरीकरण, दर्जेदार ध्वनी व्यवस्था आणि रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद यामुळे हा कार्यक्रम खरोखरच सदाबहार आणि अविस्मरणीय ठरला.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### सुनिल वाकळे यांचे निधन



**जिंतूर,/प्रतिनिधी :** येथील सुनील देवीदासराव वाकळे (४२) वर्ष यांचे अल्पशा आजाराने छत्रपती संभाजी नगर येथील खाजगी रुग्णालयात आज निधन झाले. त्यांचा अंत्यसंस्कार जिंतूर येथील स्मशानभूमीत करण्यात आला..

दिवंगत सुनील वाकळे हे एलआयसीच्या जिंतूर शाखेत सहाय्यक प्रशासकीय अधिकारी म्हणून कार्यरत होते. त्यांच्या पश्चात आई-वडील पत्नी दोन मुले एक भाऊ व तीन बहिणी असा परिवार आहे.

### महापालिकेच्या स्वीकृत सदस्यपदासाठी अंबिका डहाळे, विनोद कदम यांचे अर्ज दाखल : काँग्रेसमध्ये स्वीकृत सदस्याच्या नावावरून वाद; प्रदेश काँग्रेसच्या वरिष्ठ उपाध्यक्षांचे आयुक्तांना पत्र

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी महानगरपालिकेच्या स्वीकृत सदस्य पदासाठी सोमवारी अर्ज दाखल करण्याच्या अंतिम दिवशी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाकडून सौ. अंबिका डहाळे, तर काँग्रेस पक्षाकडून विनोद कदम यांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. अर्ज स्वीकारण्यासाठी सकाळी ११ ते दुपारी १ अशी वेळ निश्चित करण्यात आली होती. विहित मुदतीत दोन्ही उमेदवारांनी महानगरपालिका आयुक्तांकडे अर्ज सादर केले.

परभणी महानगरपालिकेच्या सभागृहात एकूण ६५ नगरसेवक असून स्वीकृत सदस्यांच्या सहा जागा आहेत. त्यापैकी शिवसेना (उबाठा) गटाच्या वाट्याला दोन जागा, तर काँग्रेस, भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) आणि शहर विकास आघाडीच्या वाट्याला प्रत्येकी एक जागा आली आहे.

यापूर्वी भाजपाकडून शिवाजी भरोसे, राष्ट्रवादी काँग्रेसकडून शेख फहाद शालिमार आणि शहर विकास आघाडीकडून राहुल मुरकुटे यांनी अर्ज दाखल केले होते. सोमवारी शिवसेना (उबाठा) गटाच्या वतीने अंबिका डहाळे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी आमदार डॉ. राहुल पाटील, मनपा गटनेते दिलीप ठाकूर, सभागृह नेते सय्यद समी उर्फ माजू लाला, महानगरप्रमुख डॉ. विवेक नावंदर, विकास राजापुरे, अनिल डहाळे, बाळराजे तळेकर आणि नवनित पाचपोर आदी उपस्थित होते. तर काँग्रेस पक्षाच्या वतीने विनोद कदम यांनी आपला अर्ज दाखल केला. यावेळी काँग्रेसचे गटनेते गुलमीर खान उपस्थित होते.

दरम्यान, स्वीकृत सदस्य निवडीवरून काँग्रेस पक्षात वाद निर्माण झाल्याचे समोर आले आहे. महापालिकेतील गटनेत्यांनी पक्षश्रेष्ठींशी कोणतीही चर्चा न करता स्वीकृत सदस्याचे नाव निश्चित केल्याचा आरोप करण्यात आला आहे. संबंधित नाव ग्राह्य धरू नये, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे वरिष्ठ उपाध्यक्ष ॲड. गणेश पाटील यांनी महानगरपालिका आयुक्तांना दिलेल्या पत्राद्वारे केली आहे. या वेळी मुद्दसीर खान, अबरार इलाही, अकबर जहागीरदार आदी पदाधिकारी उपस्थित होते. काँग्रेसमधील या घडामोडींमुळे स्वीकृत सदस्य निवडीच्या प्रक्रियेकडे राजकीय वर्तुळाचे विशेष लक्ष लागले आहे.

### केमिस्ट ॲन्ड ड्रगिस्ट असोसिएशनच्या तालुकाध्यक्षपदी सुरेशकुमार लोढा तर उपाध्यक्षपदी श्रीकांत मेहत्रे यांची निवड; सोनपेठ तालुका कार्यकारिणीची घोषणा

**सोनपेठ,/प्रतिनिधी :** सोनपेठ येथील प्रतिष्ठित व्यापारी तथा औषध विक्रेते सुरेशकुमार लोढा यांची केमिस्ट ॲन्ड ड्रगिस्ट असोसिएशनच्या तालुकाध्यक्षपदी फेरनिवड करण्यात आली आहे. तर उपाध्यक्षपदी श्रीकांत मेहत्रे यांची निवड करण्यात आली.

सोनपेठ तालुका केमिस्ट ॲन्ड ड्रगिस्ट असोसिएशनच्या नूतन कार्यकारिणीच्या निवडीसाठी रविवार २८ जून रोजी विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत सर्वानुमते नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली. निवडीनुसार सचिवपदी गणेश मुंडे यांची निवड करण्यात आली असून शहराध्यक्षपदी लहुकुमार वाकणकर यांची फेरनिवड करण्यात आली आहे. नूतन पदाधिकाऱ्यांच्या निवडीचे सदस्यांनी स्वागत करत त्यांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी केमिस्ट ॲन्ड ड्रगिस्ट असोसिएशनचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. नव्याने निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांनी औषध विक्रेत्यांच्या समस्या सोडविणे, संघटना अधिक बळकट करणे तसेच ग्राहकांना दर्जेदार सेवा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचा विश्वास व्यक्त केला.

### नशामुक्त युवक ही काळाची गरज : पोलीस निरीक्षक भुषण कांबळे

कै. रमेश वरपूडकर महाविद्यालयात नशाविरोधी दिनानिमित्त भित्तिपत्रक स्पर्धा व बक्षीस वितरण

**परभणी,/प्रतिनिधी :** समाजातील बहुतांश गुन्हे हे अमली पदार्थ व विविध प्रकारच्या व्यसनांच्या प्रभावाखाली घडत असल्याने सामाजिक, आर्थिक आणि बौद्धिक स्तरावर देशाचे मोठे नुकसान होत आहे. त्यामुळे नशामुक्त युवक घडविणे ही आजच्या काळाची अत्यंत महत्त्वाची गरज असल्याचे प्रतिपादन सोनपेठ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक भुषण कांबळे यांनी केले.

ते कै. रमेश वरपूडकर महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय नशाविरोधी दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत सातपुते होते. यावेळी प्राचार्य डॉ. शेख शकिला, प्रा. डॉ. मुकुंदराज पाटील, प्रा. डॉ. गोविंद वाकणकर आणि प्रा. डॉ. संतोष रणखांब यांची प्रमुख उपस्थिती होती.

सोनपेठ पोलीस ठाणे आणि महाविद्यालयाच्या प्राणीशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने 'नशामुक्त भारत' या विषयावर जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त विद्यार्थ्यांसाठी भित्तिपत्रक स्पर्धा घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्ती आणि सामाजिक जागृतीचा संदेश देणारी प्रभावी भित्तिपत्रके सादर केली. स्पर्धेतील विजेत्यांना पोलीस ठाण्याच्या वतीने रोख पारितोषिके प्रदान करण्यात आली. प्रथम पारितोषिक सानिका शास्त्री व अनुराधा मस्के यांना ३०१ रुपये, द्वितीय पारितोषिक निखिल वाघमारे यांना २०१ रुपये, तर तृतीय पारितोषिक धीरज साठे व सोपान जोगदंड यांना प्रत्येकी १०१ रुपये मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अनिता जिंतूरकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. अजय जाधव यांनी मानले. कार्यक्रमास शिस्तपालन समितीचे प्रा. डॉ. अंगद फाजगे, रसायनशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. संदीपकुमार देवराये, प्रा. डॉ. विकास रागोले, ग्रंथपाल प्रा. डॉ. अनंत सरकाळे, प्रा. सतीश वाघमारे यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वस्सा सर्कलच्या विकास कामासाठी कमी पडणार नाही- पालकमंत्री

**रामप्रसाद कंठाळे**
**जिंतूर,/प्रतिनिधी-:** वसा सर्कलच्या विकासाच्या कामासाठी कमी पडणार नाही पालकमंत्री मेघना बोर्डीकर जिंतूर प्रतिनिधी जिंतूर तालुक्यातील वसा येथे रविवारी दिनांक २८ रोजी सिद्धेश्वर देवस्थान या ठिकाणी मन की बात या कार्यक्रमाचे वसायेथील पंचायत समिति सदस्य सारिका ताई राजेंद्र नागरे यांनी आयोजन केले होते.

याप्रसंगी परभणी जिल्ह्याच्या कार्यसम्राट पालकमंत्री तथा राज्यमंत्री यांनी या कार्यक्रमास उपस्थिती लावून देशाचे पंतप्रधान नरेंद्र भाई मोदी यांनी मन की बात या कार्यक्रमातून देशवासीयांना संबंधित केले याप्रसंगी त्यांनी अनेक विषयावर मन की बात मधून जनतेला अनेक विषयावर आपण काय करावे काय नाही याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली त्यानंतर परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री तथा राज्यमंत्री मेघनाताई साकोरे बोर्डीकर मन की बात कार्यक्रम संपल्यानंतर वसई येथील महिला व नागरिकांनी संबंधित करताना म्हणाल्या की आपल्या देशाचे लाडके पंतप्रधान नरेंद्र भाई मोदी यांनी आत्ताच आपल्याला मन की बात मधून संबोधित केले आहे त्यांनी शेवटच्या नागरिकांपर्यंत विकासाचे कामे करण्यात



येतील असे आश्वासन दिले तसेच पालकमंत्री म्हणाल्या की मी वसा सर्कलच्या विकासासाठी कमी पडणार नाही त्यामध्ये आडगाव फाटा ते आसेगाव पर्यंत या रस्त्याच्या कामासाठी आपण लवकरात लवकर निधी उपलब्ध करून देऊ तसेच या सर्कलच्या विकासासाठी मी कटिबद्ध आहे यामध्ये जनतेने बोर्डीकर परिवारावर जो विश्वास टाकला त्या विश्वासाला मी कुठल्याही प्रकारचा तडा जाऊ देणार नाही तसेच घरकुल योजना असो सिंचन विहिरी असो पांदण रस्ते असो किंवा शेत रस्ते असो यासारख्या अनेक योजनांना मी व माझे सरकार कमी पडणार नाही असे आश्वासन त्यांनी दिले आहे जिंतूर चे तहसीलदार शितलताई कचवे पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री भोसले साहेब तालुका कृषी अधिकारी घुगे साहेब जिल्हा परिषद सदस्य मनीषा ताई पारवे, जिल्हा परिषद सदस्य डॉक्टर देवराव कराळे माजी जिल्हा परिषद सदस्य अविनाश काळे माजी जिल्हा परिषद सदस्य नानासाहेब राऊत बोरी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती आत्माराम जी पवार तसेच पंचायत समिती सदस्य सारिता ताई राजेंद्र नागर जिंतूर पंचायत समितीचे सभापती किशोर भाऊ खिस्ते उपसभापती माधवरावजी दराडे बोर्डी येथील शिवाजीराव कदम माजी जिल्हा परिषद सदस्य अविनाश काळे तसेच सारिका ताई राऊत जिल्हा भाजप महिला मोर्चा परभणी यासह राजेंद्र नागरे वसायेथील नागरिक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या या कार्यक्रमास वसातील वसा सर्कल मधील आजी-माजी लोकप्रतिनिधी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिंतूर तालुक्यातील रोहिला पिंपरीकसर सिमेंट रस्त्याचे पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या हस्ते भूमिपूजन

**परभणी,/प्रतिनिधी:** ग्राम सडक योजना टप्पा२ () अंतर्गत रोहिला पिंपरी ते कसर या महत्त्वपूर्ण सिमेंट रस्ता विकासकामाचे भूमिपूजन आज पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या हस्ते करण्यात आले.



या रस्त्याचे महत्त्व अधोरेखित करताना पालकमंत्री यांनी सांगितले की, या कामामुळे परिसरातील नागरिकांना सुरक्षित, सुलभ आणि दर्जेदार दळणवळणाची सुविधा उपलब्ध होईल. तसेच विद्यार्थी, शेतकरी, रुग्ण आणि व्यापाऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून शिक्षण, आरोग्य, शेती व व्यापार क्षेत्राला चालना मिळेल.

मजबूत आणि दर्जेदार पायाभूत सुविधा उभारण्यावर शासनाचा भर असून या रस्त्यामुळे स्थानिक विकासाला नवी गती मिळेल. गावांच्या सर्वांगीण प्रगतीसह ग्रामीण भागातील संपर्क व्यवस्था अधिक सक्षम होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमास जिंतूरच्या तहसीलदार शितलताई कचवे जिंतूर तालुका कृषी अधिकारी श्री घुगे वसा सर्कलच्या जिल्हा परिषद सदस्य मनीषाताई पारवे पंचायत समिती सदस्य सरिता ताई राजेंद्र नागरे पंचायत समितीचे सभापती किशोर भाऊ खिस्ते उपसभापती माधवराव दराडे शिवाजीराव कदम सारिका ताई राऊत जिल्हाध्यक्ष भाजप महिला मोर्चा परभणीमाजी जिल्हा परिषद सदस्य अविनाश काळे माजी जिल्हा परिषद सदस्य नानासाहेब राऊत लोकप्रतिनिधी, अधिकारी यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ज्येष्ठ नागरीक उत्तमराव कुलकर्णी यांचे निधन

**परभणी,/प्रतिनिधी :** एसटी महामंडळातील सेवानिवृत्त कर्मचारी उत्तमराव किशनराव कुलकर्णी कुंडीकर यांचे रविवार २८ जून रोजी सायंकाळी ६.३० वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८५ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थीवावर सोमवार २९ जून रोजी सकाळी १०.३० वाजता जिंतूर रोडवरील वैकुंठधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मुलगा किरण कुंडीकर व सतिश कुंडीकर, मुलगी संगिता बारबिंड, सूना व नातवंड असा मोठा परिवार आहे. त्यांचा स्वभाव हा सर्वांसाठी प्रेमळ,व मयाळू होता.

### मानवतमध्ये राष्ट्रीय पल्स पोलिओ अभियान उत्साहात; ५,११० बालकांचे लसीकरणाचे उद्दिष्ट

**मानवत,/प्रतिनिधी :** राष्ट्रीय पल्स पोलिओ अभियानांतर्गत रविवारी (दि. २८ जून) मानवत शहरात ० ते ५ वर्षे वयोगटातील बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजण्याचा उपक्रम उत्साहात राबविण्यात आला. शहरातील १७ ठिकाणी पोलिओ बूथ उभारण्यात आले असून ५ हजार ११० बालकांना पोलिओ लसीचा लाभ देण्याचे उद्दिष्ट आरोग्य विभागाने ठेवले आहे.

या मोहिमेच्या अनुषंगाने छत्रपती संभाजीनगर परिमंडळ आरोग्य सेवा उपसंचालक डॉ. कांचन वानरे यांनी मानवत ग्रामीण रुग्णालय, बौद्ध विहार आणि इकरा उर्दू स्कूल येथील पोलिओ केंद्रांना भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजून मोहिमेचा शुभारंभ केला. त्यांच्यासमवेत मलेरिया विभागाच्या सहाय्यक उपसंचालक डॉ. रेखा भंडारी यांचीही उपस्थिती होती.

राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी ग्रामीण रुग्णालय प्रशासनाने नगरपरिषद व गटशिक्षणाधिकारी कार्यालयाला पूर्वसूचना देत आवश्यक सहकार्याची मागणी केली होती. नगरपरिषद प्रशासनाने त्यांच्या अखत्यारीतील समाजमंदिर व केंद्रांवर टेबल, खुर्च्या व अन्य साहित्य उपलब्ध करून देत सहकार्य केले.

### नशामुक्त युवक ही काळाची गरज-कांबळे

**परभणी,/प्रतिनिधी :** समाजातील बहुतांश गुन्हे हे अमली पदार्थ व विविध प्रकारच्या व्यसनांच्या प्रभावाखाली घडत असल्याने सामाजिक, आर्थिक आणि बौद्धिक स्तरावर देशाचे मोठे नुकसान होत आहे. त्यामुळे नशामुक्त युवक घडविणे ही आजच्या काळाची अत्यंत महत्त्वाची गरज असल्याचे प्रतिपादन सोनपेठ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक भुषण कांबळे यांनी केले.

ते कै. रमेश वरपूडकर महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय नशाविरोधी दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत सातपुते होते. यावेळी प्राचार्य डॉ. शेख शकिला, प्रा. डॉ. मुकुंदराज पाटील, प्रा. डॉ. गोविंद वाकणकर आणि प्रा. डॉ. संतोष रणखांब यांची प्रमुख उपस्थिती होती.सोनपेठ पोलीस ठाणे आणि महाविद्यालयाच्या प्राणीशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने 'नशामुक्त भारत' या विषयावर जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

### चोरीचा टिप्पर तोडून विक्रीचा प्रयत्न

**परभणी,/प्रतिनिधी :**परभणी शहरातील नवा मोंढा पोलीस ठाण्याच्या हद्दीतून चोरीस गेलेला टिप्पर फोडून त्याची विक्री करण्याचा प्रयत्न उघडकीस आला असून, स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने या प्रकरणी एका आरोपीला ताब्यात घेतले आहे. आरोपीकडून टिप्परचे तुकडे जप्त करण्यात आले असून पुढील तपास सुरू असून अशा प्रकारच्या घटनांवर आळा घालणे गरजेचे आहे.



परभणी- पल्स पोलिओ लसीकरण मोहीम २०२६ चे जिल्हास्तरीय उदघाटन ना.मेघना साकोरे आरोग्य राज्य मंत्री तथा पालकमंत्री परभणी यांच्या हस्ते उपकेंद्र वसा अंतर्गत महात्मा फुले विद्यालय येथे पार पडला. त्याप्रसंगी जिल्हा परिषद सदस्या मनिषा पारवे, राजेंद्र नागरे, माधवराव दराडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ संजय कुमार पांचाळ, तहसीलदार शीतल कछवे,तालुका आरोग्य अधिकारी जिंतूर डॉ. आबासाहेब जाधव, वैद्यकीय अधिकारी डॉ. सिराज शेख व समुदाय आरोग्य अधिकारी ,आरोग्य सेवक दिसत आहेत.



## अवैधरित्या गौण खनिज उत्खनन व वाहतूक; दोन टिप्पर जप्त,२८/३८ मुद्देमाल जप्त चौघांवर गुन्हा

**जिंतूर,/प्रतिनिधी-:** परभणी जिल्ह्यातील जिंतूर तालुक्यातील इटोली शिवारात अवैधरित्या गौण खनिजाचे उत्खनन व वाहतूक केल्याप्रकरणी जिंतूर पोलिसांनी मोठी कारवाई करत दोन टिप्पर जप्त केले असून चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी २७ जूनच्या मध्यरात्री विशेष पथकासह कारवाई या कारवाईची फिर्याद जिंतूर पोलीस स्टेशनचे सपो उपनिरीक्षक दत्तात्रेय गुंगाने यांनी दिली. यावेळी त्यांच्यासोबत माननीय जिल्हा पोलीस अधीक्षक साहेब यांचे विशेष पथक मधील कर्मचारी व उपनिरीक्षक टर्के साहेब पो ह वाघमारे पो ह चुडावकर पोह ताटी कुंडलवार पो ह सय्यद इर्शाद यांनी संबंधित वाहनधारकांनारॉयल्टी व() विचारले असता त्यांनी उडवा उडवी चे उत्तर दिल्याने त्यांनी अवैध्य गौण खनिजाची वाहतूक करणारे दोन टिप्पर ताब्यात घेण्यात आले. व जप्त केले वाहनांमध्ये -२२--५६८८ व -२१--४०१८ या टिप्परचा समावेश असून, दोन्ही वाहनांतील गौण खनिजासह एकूण ₹२८.३८ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी सोपान भगवान कुटे, नवनाथ शाहाजी डोबे, अशोक गणपत गव्हडे आणि मनोहर पुंजाराम मुंडे यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता, पर्यावरण संरक्षण अधिनियम तसेच महाराष्ट्र जमीन महसूल संहितेच्या विविध कलमान्वये जिंतूर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३५६/२०२६ दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास जिंतूर पोलीस करीत आहेत.

# अन्न सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन करा-तुकाराम मुंढे

## परभणीतील खाद्य व्यावसायीकांना मार्गदर्शन, खबरदारी घेण्याचे आवाहन

**परभणी,/प्रतिनिधी-:** महाराष्ट्र राज्यातील नागरिकांना सुरक्षित व दर्जेदार अन्न उपलब्ध व्हावे आणि सुरक्षित अन्न - निरोगी महाराष्ट्र हा उद्देश साध्य व्हावा यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाने राज्यातील सर्व खाद्य व्यवसाय चालकांसाठी व्यापक अन्न सुरक्षा अनुपालन आदेश जारी केला आहे. अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी २४ जून २०२६ रोजी हा आदेश जारी केला असून राज्यातील सर्व खाद्य व्यावसायिकांना त्याचे काटेकोर पालन करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

या आदेशानुसार हॉटेल, रेस्टॉरंट, ढाबे, कॅन्टीन, स्वीट मार्ट, बेकरी, केटरिंग आस्थापना तसेच इतर सर्व खाद्य व्यवसायांनी अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ अंतर्गत निर्धारित नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. व्यवसायस्थळी मूळ एफएसएसएआय परवाना किंवा नोंदणी प्रमाणपत्र दर्शनी भागात लावणे, परिसरात उच्चस्तरीय स्वच्छता राखणे, कीटक नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजना करणे, ग्राहकांना सुरक्षित व मोफत पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे आणि वापरलेल्या खाद्यतेलाचा पुनर्वापर टाळणे याबाबत स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच अन्नपदार्थ वर्तमानपत्र किंवा अन्य छापील कागदामध्ये देणे अथवा पॅक करणे पूर्णपणे बंद करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. खाद्य व्यवसायातील कर्मचाऱ्यांची नियमित वैद्यकीय तपासणी तसेच ऋडढरउ प्रशिक्षण पूर्ण करणेही अनिवार्य करण्यात आले आहे.



विशेष बैठकीद्वारे जिल्ह्यातील खाद्य व्यवसायिकांना मार्गदर्शन..

या आदेशाच्या अनुषंगाने अन्न व औषध प्रशासन विभागाचे सहायक आयुक्त अ. ए. चौधरी यांनी २५ जून रोजी परभणी येथे खाद्य व्यावसायिकांची विशेष बैठक घेतली. नारायण चाळ परिसरातील हॉटेल राधिका पॅलेस येथे झालेल्या या बैठकीस जिल्ह्यातील हॉटेल, रेस्टॉरंट, ढाबे, कॅन्टीन, स्वीट मार्ट, बेकरी व केटरिंग व्यावसायिक उपस्थित होते. यावेळी व्यापक अन्न सुरक्षा अनुपालन आदेशाची सविस्तर माहिती देत त्याच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत मार्गदर्शन करण्यात आले. अन्न व औषध प्रशासन विभागाकडून राज्यभर विशेष अन्न सुरक्षा मोहीम राबविण्यात येत असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांविरुद्ध अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ अंतर्गत दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. गंभीर प्रकरणांमध्ये परवाना निलंबित करणे किंवा रद्द करण्याची कार्यवाहीही केली जाऊ शकते, असा इशाराही विभागाने दिला आहे. जिल्ह्यातील सर्व खाद्य व्यवसाय चालकांनी अन्न सुरक्षा नियमांचे तात्काळ व काटेकोर पालन करून ग्राहकांना सुरक्षित व गुणवत्तापूर्ण अन्न उपलब्ध करून द्यावे, असे आवाहन अन्न व औषध प्रशासन विभाग, परभणी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## अग्रलेख

# नसरापूरचा निकाल अपवाद नव्हे, नियम व्हावा...

पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथे साडेतीन वर्षांच्या चिमुरडीवर बलात्कार करून तिची निर्घृण हत्या करणाऱ्या आरोपीला अवघ्या दोन महिन्यांत फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. भारतीय न्यायव्यवस्थेच्या इतिहासात ही अत्यंत दुर्मिळ आणि ऐतिहासिक घटना. गुन्हा १ मे रोजी घडतो, १५ दिवसांत शेकडो पानांचे दोषारोपपत्र दाखल होते, ५५ साक्षीदारांची साक्ष नोंदवली जाते आणि २९ जून रोजी विशेष न्यायालय आरोपीला फाशीची शिक्षा सुनावते. लेटलतिफीची सवय झालेल्या समाजाचा या वेगावर विश्वास बसणे कठीण आहे. पण, हे वास्तवात घडले आहे आणि संपूर्ण व्यवस्थेने इच्छाशक्ती दाखवली तर न्याय किती वेगाने मिळू शकतो याची प्रचीती देणारी ही घटना आहे.

न्यायालयाच्या या निर्णयामुळे पीडित कुटुंबाला न्याय मिळाल्याची भावना निर्माण झाली असेल. मात्र, अस्वस्थ करणारे अनेक प्रश्न समाजासमोर उभे आहेत. त्यांचाही विचार केला पाहिजे. हा खटला दोन महिन्यांत निकालात निघू शकतो, तर देशभरातील हजारो बलात्कार आणि लैंगिक अत्याचारांच्या खटल्यांना वर्षानुवर्षे का लागतात? काही प्रकरणांमध्ये पीडित मुलगी मोठी होते, तिचे आयुष्य बदलते, ती तोंड लपवत फिरते, पण तिचा खटला संपत नाही. अनेकदा आरोपी जामिनावर बाहेर फिरत असतो आणि पीडितेला दर सुनावणीला न्यायालयात जाऊन पुन्हा पुन्हा त्या वेदनांचे पाढे म्हणावे लागतात. त्या प्रत्येक प्रसंगी न्यायाचा पराभव होत असतो. बलात्कारासारख्या घृणास्पद प्रकरणाच्या खटल्यात प्रत्येक तहकुबी ही पीडितेच्या जखमेवर पुन्हा पुन्हा मीठ चोळण्यासारखे असते. अनेक महिला तर केवळ या छळवादी प्रक्रियेमुळे तक्रार मागे घेतात, साक्ष बदलतात किंवा मानसिकदृष्ट्या कोलमडून जातात. काही जीवही देतात. नसरापूर प्रकरणात तसे झाले नाही. पण, त्या चिमुकलीचा जीव गेला तो गेलाच. आरोपीला फाशीची शिक्षा ठोठावली गेली. आता ती वरिष्ठ न्यायालयांतही टिकली पाहिजे आणि अंतिमतः तो नराधम फासावर लटकला पाहिजे, असेच कोणताही संवेदनशील नागरिक म्हणेल. तसे झाले तरी त्या चिमुकलीचा जीव काही परत येणार नाही. पण, नसरापूर प्रकरणासारखाच वेग प्रत्येक प्रकरणाला मिळाला तर आपली एकूणच व्यवस्था संवेदनशील आहे, असे म्हणता येईल.

या प्रकरणात विशेष न्यायाधीशांनी आरोपीचे वय, त्याचा पूर्वेतिहास, गुन्ह्याची क्रूरता आणि चिमुरडीवर झालेल्या अमानुष अत्याचाराचा सर्वंकष विचार केला. दुर्मिळातील दुर्मिळ अपराधाच्या निकषानुसार मृत्युदंडाची शिक्षा सुनावली. न्यायालयाने स्पष्ट शब्दांत सांगितले की, वयाच्या आधारे देखील दया दाखवावी अशी या आरोपीची पात्रता नाही. हा दृष्टिकोन समाजाच्या भावनेशी सुसंगत आहे. या प्रकरणात पोलिसांचे विशेष कौतुक केले पाहिजे. अनेकदा पोलिसांवर ढिसाळपणासाठी टीका केली जाते; पण त्यांनी प्रामाणिकपणे, वेळेत आणि व्यावसायिक पद्धतीने तपास केला असेल तर त्यांचे अभिनंदन करणेही तितकेच आवश्यक आहे. मात्र, असे प्रत्येक बलात्काराच्या प्रकरणात घडते काय, या प्रश्नाचे उत्तर नकारार्थीच आहे. असंख्य बलात्काराच्या प्रकरणांत तपास महिनेच नव्हे तर अनेक वर्षे अपूर्ण राहतो. पुरावे नष्ट होतात. दोषारोपपत्रात त्रुटी राहतात. साक्षीदारांचे जबाब नीट नोंदवले जात नाहीत. तपास अधिकारी बदलतात. मग दोषारोप सिद्ध होत नाही आणि आरोपींच्या सुटकेचे मार्ग प्रशस्त होतात. प्रश्न केवळ कठोर शिक्षेचा नाही; प्रश्न आहे निश्चित शिक्षेचा. गुन्हेगाराला शिक्षा होणारच आहे, हा विश्वास निर्माण झाला तर त्याचा प्रतिबंधात्मक परिणाम अधिक प्रभावी होतो.

यातील दुसरा मुद्दा असा की, अशा घटनेत कठोर शिक्षा आवश्यक आहे, पण तो एकमेव उपाय नाही. कठोर शिक्षा हे उत्तम समाजाचे लक्षण नाही. अपराध घडल्याशिवाय शिक्षा देता येत नाही. असे अपराध घडणार नाहीत, यासाठी आपण काय करू शकतो, हा खरा मुद्दा आहे. बलात्कार हा निव्वळ कायद्याने हाताळावयाचा प्रश्न नाही. समाजाच्या मानसिकतेचाही हा प्रश्न आहे. स्त्रीकडे माणूस म्हणून नव्हे तर भोग्य वस्तू म्हणून पाहण्याची विकृत मानसिकता अजूनही कायम आहे. घरापासून चित्रपटांपर्यंत, सोशल मीडियापासून मित्रांच्या गप्पांपर्यंत स्त्रीचा अपमान करणारी भाषा अनेकदा सामान्य मानली जाते. पोर्नोग्राफीचे तर पेवच फुटलेले आहे. उद्दीपनाला भरपूर वाव देणारे वातावरण आहे. त्यावर तोडगा म्हणून संयमाची शिकवण आणि कायद्याचा धाक अशा दोन्ही गोष्टी हव्यात. प्रत्येक मुलीच्या किंवा महिलेच्या मागे पोलिस उभे करता येणार नाहीत. समाज म्हणजे सामान्य नागरिक हेच सुरक्षिततेच्या कामातील भागीदार झाले तरच परिस्थिती बदलेल. वास्तव असे की, नागरी कर्तव्यापासून आपण दूर जात आहोत. डोळ्यादेखत एखाद्या महिलेवर अत्याचार होत असताना अनेक लोक केवळ बघ्याची भूमिका घेतात. याचा सरसकट अर्थ असा काढला जातो की, माणुसकी संपली आहे. प्रत्यक्षात माणुसकी जिवंत असल्याचा प्रत्यय देणाऱ्या घटना रोज घडत असतात. पण, प्रत्येकाचा जीवन संघर्ष इतका कठीण आहे की, नवी कटकट कुणालाच नको असते. लोक पोलिस आणि न्यायालयीन प्रक्रियेतील गुंतागुंतीला आणि त्यातील विलंबाला घाबरतात. तक्रार करायला गेलो आणि आरोपीकडून आपल्याच जिवाला काही झाले तर, ही भीतीही असतेच. याउपर एखादी व्यक्ती मदतीला धावली तर तिला पोलिसांकडून त्रास दिला जातो. 'चलो बुलाते' म्हणत वारंवार पोलिसवाले दाराशी येतात. ठाण्यात दीर्घ काळ थांबवतात, धमकावतात, कोर्टात वारंवार हजर राहावे लागते. कामधंदा बुडतो, पैसा खर्च होतो. वर्षानुवर्षे प्रकरण चालते. तेवढा काळ ताणही सहन करावा लागतो. त्यामुळे 'आपण कशाला यात पडायचे?', असा विचार करून लोक पुढे येण्यास घाबरतात. आपण या घटनेत मदत केली नाही, हे त्यांनाही खटकत असतेच. सामाजिक जबाबदारीचे निर्वहन म्हणून त्यांचे वर्तन चुकीचे असले तरी त्यामागील अनुभव खरा असतो. समाजाने पुढे यावे असे वाटत असेल तर साक्षीदार संरक्षण, डिजिटल साक्षीची व्यवस्था, वेळेवर सुनावणी, साक्षीदारांना आर्थिक भरपाई यासाठी सारी व्यवस्थाच दुरुस्त करावी लागेल. कायद्यांची नावे बदलली असली तरी पोलिस आणि न्यायपालिकेत इंग्रजांच्या क्लिष्ट, त्रासदायक आणि वेळखाऊ पद्धती सुरूच आहेत. नागरिकांना त्रास न होता त्यांचे सहकार्य मिळवण्याची प्रणाली विकसित झाली तर अनेक गुन्हे रोखणे आणि सिद्ध करणे अधिक सोपे होईल.

नसरापूर प्रकरणात आरोपीचा पूर्वेतिहासही गंभीर होता. यापूर्वीही त्याने महिलांवर आणि अल्पवयीन मुलींवर अत्याचार करण्याचा प्रयत्न केला होता. अशा व्यक्ती समाजात मुक्तपणे फिरत राहतात, ही आपल्या व्यवस्थेची मोठी उणीव आहे. लैंगिक गुन्हेगारांचा प्रभावी डेटाबेस, नियमित देखरेख, मानसोपचार, पुनर्वसन किंवा आवश्यक तेथे कठोर नियंत्रण याकडेही लक्ष दिले पाहिजे. नसरापूरचा निकाल आदर्श ठरू शकतो. पण तो अपवाद न राहता नियम झाला पाहिजे. व्यवस्थेतील सर्व घटकांनी एकत्रितपणे काम केले तर न्याय मिळण्याचा वेग वाढू शकतो. हे सारे झाले म्हणून या खटल्यात एका चिमुरडीला न्याय मिळाला, असे म्हणू शकतो. परंतु देशभरात अशा हजारो-लाखो महिला आहेत, ज्या आजही न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत. न्यायालयाच्या तारखा बदलतात; पण त्यांना जिवंतपणी मिळालेली शिक्षा मात्र संपत नाही. नसरापूरचा निकाल ऐतिहासिक आहेच. पण, त्याचे खरे महत्त्व तेव्हाच सिद्ध होईल, जेव्हा अशा प्रत्येक पीडितेला वेळेत न्याय मिळेल, प्रत्येक गुन्हेगाराला कायद्याची भीती वाटेल आणि कोणत्याही स्त्रीला कोणत्याही वेळी घराबाहेर पडताना सुरक्षित वाटेल. सारांश, नसरापूर हा नियम व्हावा, अपवाद नव्हे! ■

## आंतरराष्ट्रीय

# पाकिस्तानच्या राजकीय स्थैर्यालाच आव्हान

**प्रा. जयसिंग यादव**

व्याप्त काश्मीर पुन्हा एकदा आंदोलनाच्या ज्वाळांनी पेटले आहे. गेल्या काही दिवसांपासून रावळकोटसह अनेक भागांमध्ये हजारो नागरिक रस्त्यावर उतरले असून महागाई, बेरोजगारी, आर्थिक संकट, प्रशासनाची उदासीनता आणि राजकीय अधिकारांच्या मागणीसाठी आवाज उठवत आहेत. या आंदोलनामुळे पाकिस्तानमधील अंतर्गत राजकारण ढवळून निघाले असून आंतरराष्ट्रीय स्तरावरही या प्रदेशातील परिस्थितीकडे नव्याने लक्ष वेधले जात आहे. पाकिस्तान अनेक दशकांपासून काश्मीर प्रश्नावर आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतावर टीका करत आला आहे; मात्र व्याप्त काश्मीरमध्ये सुरू असलेल्या आंदोलनाने पाकिस्तानलाच अस्वस्थ करणारे अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. एका बाजूला काश्मिरी जनतेच्या अधिकारांचा पुरस्कार करण्याचा दावा केला जात असताना, दुसऱ्या बाजूला स्वतःच्या प्रशासनाखालील प्रदेशातील नागरिक रस्त्यावर उतरून मूलभूत सुविधा, आर्थिक न्याय आणि राजकीय प्रतिनिधित्वाची मागणी करत आहेत, ही परिस्थिती पाकिस्तानच्या अधिकृत भूमिकेतील विरोधाभास अधोरेखित करते. आंदोलनाचे नेतृत्व 'अवामी ॲक्शन कमिटी'कडे असल्याचे सांगितले जाते. या संघटनेच्या माध्यमातून हजारो नागरिकांनी रावळकोट येथे मोठी सभा घेतली. आयोजकांनी या सभेत मोठ्या संख्येने लोक सहभागी झाल्याचा दावा केला आहे. या संख्येची स्वतंत्र पुष्टी उपलब्ध नसली, तरी आंदोलनाचा विस्तार आणि त्यामागील असंतोष दुर्लक्षित करता येणार नाही.

या आंदोलनामध्ये लोकांचा सहभाग वाढत असल्याचे विविध वृत्तांमधून दिसून येत आहे. या आंदोलनाची मुळे केवळ राजकीय नाहीत, तर आर्थिक वास्तवाशी घट्ट जोडलेली आहेत. पाकिस्तान गेल्या काही वर्षांपासून गंभीर आर्थिक संकटाचा सामना करत आहे. महागाई, परकीय चलनाचा तुटवडा, वाढते कर्ज, ऊर्जासंकट आणि बेरोजगारी यांचा परिणाम या देशातील सर्वच भागांवर झाला आहे. व्याप्त काश्मीर त्याला अपवाद नाही. जीवनावश्यक वस्तूंच्या वाढलेल्या किमती, रोजगाराच्या मर्यादित संधी आणि विकासकामांचा अभाव यामुळे सामान्य नागरिकांचे जीवन अधिक कठीण झाले आहे. त्यामुळे आर्थिक असंतोषाने आता राजकीय स्वरूप धारण केले आहे. आंदोलन करणाऱ्यांचा आरोप आहे, की त्यांच्या समस्यांकडे सातत्याने दुर्लक्ष करण्यात आले. काश्मीरच्या भवितव्याशी संबंधित निर्णय स्थानिक नागरिकांच्या इच्छेविना घेतले जातात, अशी त्यांची भावना आहे. त्यामुळे अधिक राजकीय स्वायत्तता, लोकशाही प्रक्रिया बळकट करणे आणि स्थानिक जनतेच्या सहभागातून निर्णय घेण्याची मागणी अधिक तीव्र झाली आहे. ही मागणी केवळ प्रशासनाविरोधातील प्रतिक्रिया नसून लोकशाही मूल्यांवरील विश्वासाची अभिव्यक्तीही आहे. या आंदोलनाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे महिलांचा आणि 'सोशल मीडिया'चा वाढता सहभाग. पारंपरिक आंदोलनांच्या तुलनेत आजच्या डिजिटल युगात माहितीचा प्रसार अतिशय वेगाने होतो. त्यामुळे स्थानिक 'सोशल मीडिया' प्लॅटफॉर्मवरून नागरिक आपले अनुभव, अडचणी आणि आंदोलनाशी संबंधित माहिती सातत्याने मांडत आहेत.



महिलांनीही या आंदोलनात सक्रिय भूमिका घेतल्यामुळे या संघर्षाला सामाजिक स्वरूप प्राप्त झाले आहे. समाजातील विविध घटकांचा सहभाग वाढतो, तेव्हा संबंधित आंदोलनाची व्याप्ती आणि परिणामकारकता अधिक वाढते. दुसरीकडे, आंदोलनकर्त्यांनी प्रशासनावर आवश्यक वस्तूंच्या पुरवठ्यामध्ये अडथळे निर्माण केल्याचा आरोप केला आहे. काही ठिकाणी जीवनावश्यक वस्तूंनी भरलेले ट्रक सीमावर्ती भागात अडवून ठेवण्यात आल्याचे दावे 'सोशल मीडिया'वर करण्यात आले आहेत. या दाव्यांची स्वतंत्र पुष्टी झाली नसली, तरी अशा बातम्यांमुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होणे स्वाभाविक आहे. कोणत्याही प्रदेशात अन्नधान्य, औषधे आणि अत्यावश्यक वस्तूंचा पुरवठा खंडित होण्याची शक्यता निर्माण झाल्यास त्याचे दूरगामी सामाजिक परिणाम होऊ शकतात. या प्रकरणी सरकारी कर्मचाऱ्यांवर कारवाई झाल्याचे आणि काही निवृत्त सैनिकांवर आंदोलनापासून दूर राहण्यासाठी दबाव टाकल्याचेही आरोप करण्यात आले आहेत. या आरोपांची अधिकृत पुष्टी होत नसली तरी, अशा बातम्या लोकशाही व्यवस्थेतील अभिव्यक्ती स्वातंत्र्याबाबत प्रश्न उपस्थित करतात. लोकशाहीमध्ये नागरिकांना शांततापूर्ण आंदोलन करण्याचा अधिकार असतो. प्रशासनाने कायदा आणि सुव्यवस्था राखणे आवश्यक असले, तरी त्याचबरोबर नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण करणेही तेवढेच महत्त्वाचे असते. पाकिस्तान सरकारचा दावा मात्र वेगळा आहे.

पाकिस्तानी प्रशासनाचे म्हणणे आहे, की कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्धच कारवाई केली जात आहे आणि शांतता आणि सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक ती पावले उचलली जात आहेत. कोणत्याही आंदोलनात प्रशासन आणि आंदोलनकर्ते यांच्यातील दाव्यांमध्ये मोठी तफावत असते. त्यामुळे स्वतंत्र चौकशी आणि विश्वासार्ह माहितीच्या आधारेच वस्तुस्थितीचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन होऊ शकते. या आंदोलनाचे राजकीय पडसादही उमटू लागले आहेत. पाकिस्तानचे संरक्षणमंत्री ख्वाजा आसिफ यांनी संसदेत आंदोलकांवर टीका केली. त्यांच्या वक्तव्यामुळे राजकीय वाद निर्माण झाला आणि आंदोलनकर्त्यांनी त्याला विरोध दर्शवला. यावरून स्पष्ट होते, की व्याप्त काश्मीरमधील असंतोष हा आता केवळ स्थानिक प्रश्न राहिलेला नाही, तर पाकिस्तानच्या राष्ट्रीय राजकारणातला महत्त्वाचा विषय बनला आहे. या आंदोलनामुळे १९४८ नंतरच्या व्याप्त काश्मीरच्या राजकीय प्रवासावरही पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. या प्रदेशातील लोकांना कितपत राजकीय स्वायत्तता आहे, स्थानिक प्रशासन किती प्रभावी आहे आणि लोकप्रतिनिधींना निर्णयप्रक्रियेत किती अधिकार आहेत, या प्रश्नांवर नव्याने विचार केला जात आहे. अनेक दशकांपासून हे प्रश्न कायम आहेत. त्यामुळे आजचे आंदोलन ही अचानक उद्भवलेली घटना नसून, दीर्घकाळ साचलेल्या असंतोषाचा उद्रेक असल्याचे अनेक अभ्यासक मानतात. यातून पाकिस्तानसमोर दोन महत्त्वाची आव्हाने उभी राहिली आहेत. एक म्हणजे आर्थिक संकटावर प्रभावी उपाय योजणे आणि दुसरे म्हणजे नागरिकांचा विश्वास पुन्हा जिंकणे.

केवळ आंदोलन दडपून किंवा सुरक्षा उपाय वाढवून प्रश्न सुटत नाहीत. त्यासाठी संवाद, पारदर्शक प्रशासन आणि लोकांच्या अपेक्षांना न्याय देणाऱ्या धोरणांची गरज असते. भारताच्या दृष्टीनेही हा घटनाक्रम महत्त्वाचा आहे. भारत सातत्याने संपूर्ण जम्मू-काश्मीर हा आपला अविभाज्य भाग असल्याची भूमिका मांडत आला आहे. या पृष्ठभूमीवर व्याप्त काश्मीरमधील घडामोडींकडे भारत बारकाईने लक्ष ठेवून आहे; मात्र या विषयाकडे पाहताना संवेदनशीलता आणि वस्तुनिष्ठता आवश्यक आहे. कारण काश्मीरसारख्या गुंतागुंतीच्या प्रश्नात भावनिक प्रतिक्रिया किंवा राजकीय आरोप-प्रत्यारोपांपेक्षा शांतता, स्थैर्य आणि लोककल्याण अधिक महत्त्वाचे असते. लोकशाही व्यवस्थेची खरी कसोटी संकटाच्या काळात लागते. नागरिकांचा आवाज ऐकून घेणे, त्यांच्या समस्यांवर संवादाद्वारे तोडगा काढणे आणि प्रशासनावर विश्वास निर्माण करणे ही कोणत्याही सरकारची जबाबदारी असते. लोकांना आपल्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरावे लागते, तेव्हा ती केवळ आंदोलनकर्त्यांची नाही, तर संपूर्ण प्रशासन व्यवस्थेचीही परीक्षा असते. आज व्याप्त काश्मीरमध्ये सुरू असलेले आंदोलन हा केवळ एका प्रदेशाचा प्रश्न नाही. तो शासनव्यवस्था, आर्थिक न्याय, लोकशाही आणि नागरी अधिकार यांच्यातील संतुलनाचा प्रश्न आहे. इतिहास सांगतो, की लोकांच्या आकांक्षा आणि असंतोषाकडे दीर्घकाळ दुर्लक्ष केल्यास अधिक गंभीर परिणाम होतात. त्यामुळे या परिस्थितीत सर्व संबंधित पक्षांनी संयम, संवाद आणि लोकशाही मार्गाचा स्वीकार करणे हीच काळाची गरज आहे. ■

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**नितीन शिरसाट**

# शासनाचा महिलांना भक्कम आधार

देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेला शेतकरी आजही असंख्य समस्यांशी दोन हात करत आहे. स्वातंत्र्यानंतर सात दशकांहून अधिक काळ उलटून गेला, तंत्रज्ञान विकसित झाले, शेतीचे आधुनिकीकरण झाले, पीकपद्धती बदलल्या तरी शेतकऱ्यांच्या आयुष्यातील अस्थिरता कायम राहिली. निसर्गाचा लहरीपणा, उत्पादन खर्चातील सातत्याने होणारी वाढ, हमीभावाचा प्रश्न, बाजारपेठेतील अस्थिरता, कर्जाचा बोजा, विमा योजनांतील त्रुटी आणि धोरणात्मक विसंगती यामुळे शेतकरी आजही संकटात आहे.

या पृष्ठभूमीवर महाराष्ट्रात पुन्हा एकदा शेतकरी प्रश्न केंद्रस्थानी आला आहे. राज्यातील शेतकरी प्रश्नावर शेतकरी युवा नेते रविकांत तुपकर यांनी बुलढाणा येथे अन्नत्याग आंदोलन छेडले. मंत्री गिरीश महाजन यांच्या मध्यस्थीने हे आंदोलन मागे घेण्यात आले होते. सरकार त्यांच्या मागण्यांबाबत सकारात्मक चर्चा येत्या आठवडाभरात करेल असे आश्वासन दिल्याने आंदोलन मागे घेण्यात आले होते. राष्ट्रवादी काँग्रेस (शप) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी छत्रपती संभाजीनगर येथील केंब्रिज चौकात एल्गार अन्नदात्याचा आंदोलन आणि रास्ता रोको केले. भूमिहीन महिलांना शेतकऱ्यांचा दर्जा देण्याची मागणी, कर्जमाफीवरील जाचक अटी हटविण्याची अपेक्षा या सर्व प्रश्नांसाठी शेतकरी युवा नेते रविकांत तुपकर यांनी केलेले अन्नत्याग आंदोलन या घडामोडींनी राज्यातील कृषी धोरणांवर नव्याने चर्चा सुरू केली आहे. शेती म्हणजे केवळ जमिनीचा सात-बारा नाही. श्रम, कष्ट आणि निसर्गाशी चालणारा अखंड संघर्ष. प्रत्यक्ष शेतात राबणाऱ्या लाखो महिलांचे नाव मात्र जमीन अभिलेखावर नसते. त्या सकाळपासून संध्याकाळपर्यंत शेतीची प्रत्येक जबाबदारी पार पाडतात. पेरणी, निंदण, कापणी, जनावरांची देखभाल, घराची जबाबदारी, शेतीतील आर्थिक व्यवस्थापन अशा अनेक भूमिका आयुष्यभर निभावतात. तरीही शासनाच्या नोंदींमध्ये त्यांना शेतकरी म्हणून मान्यता मिळत नाही. परिणामी अनेक शासकीय योजनांपासून त्या वंचित राहतात. भारतीय कृषी व्यवस्थेतील ही सर्वांत मोठी विसंगती मानावी लागेल. ज्यांच्या श्रमावर शेती उभी आहे, त्यांनाच अधिकृत ओळख नाही. शेतीतील महिलांचे योगदान राष्ट्रीय स्तरावर मान्य केले जाते, परंतु धोरणे आखताना त्यांना दुय्यम स्थान दिले जाते. महिला शेतकरी या संकल्पनेला कायदेशीर स्वरूप मिळाले तर ग्रामीण अर्थव्यवस्थेत मोठा बदल घडू शकतो. आज महाराष्ट्रातील अनेक कुटुंबांमध्ये पुरुष शहरात रोजगारासाठी स्थलांतरित झाले आहेत. गावात असलेल्या महिलाच शेती सांभाळतात. अनेक एकल महिला, परित्यक्ता किंवा शेतमजुरीसोबत भाडेतत्त्वावर शेती करणाऱ्या महिलांचे जीवन पूर्णपणे शेतीवर अवलंबून आहे. परंतु जमीन त्यांच्या नावावर नसल्याने बँक कर्ज, पीकविमा, कृषी अनुदान, सिंचन योजना, कृषी प्रशिक्षण, शासकीय मदत यांचा लाभ त्यांना सहज मिळत नाही. त्यामुळे भूमिहीन महिला शेतकरी ही संकल्पना केवळ सामाजिक न्यायाचा विषय नसून आर्थिक विकासाचाही विषय आहे. महिलांना शेतकऱ्यांचा दर्जा देण्याची मागणी ही कोणत्याही प्रकारची सवलत नाही तर त्यांच्या श्रमाचा अधिकृत सन्मान आहे. मंत्रिमंडळ बैठकीत या विधेयकाच्या मसुद्याला मान्यता देण्यात आली आहे. प्रस्तावित कायद्यात शेती व पूरक उपक्रम करणाऱ्या महिलांना शेतकरी म्हणून मान्यता देण्यात येणार आहे.

मंत्रिमंडळ बैठकीतील दुसरा महत्त्वाचा विषय म्हणजे महाराष्ट्रात बालविवाह रोखण्यासाठी वयाची पडताळणी सोपी करण्यासाठी राज्य सरकारने लग्नपत्रिकेवर वधू आणि वराची जन्मतारीख छापणे बंधनकारक करण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्राने हा निर्णय राजस्थान सरकारच्या धर्तीवर घेतला आहे. राजस्थानमध्ये हा नियम लागू केल्यामुळे बालविवाह रोखण्यात मोठे यश आले. महिला व बाल विकास विभागांतर्गत कार्यरत चाईल्ड हेल्पलाईन आणि जिल्हा बाल संरक्षण कक्ष बुलढाणा यांच्या संयुक्त प्रयत्नातून मागील एका महिन्यात जिल्ह्यातील तब्बल २४ बालविवाह रोखण्यात यश आले आहे. राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी प्रत्येक जिल्ह्याला महिला सक्षमीकरणासाठी आणि सुरक्षेसाठी थेट गावपातळीपर्यंत पोहोचण्याचे आवाहन केले आहे. 'महिला आयोग तुमच्या दारी' या मोहिमेअंतर्गत त्यांनी सर्व जिल्ह्यांतील पोलिस व प्रशासकीय अधिकाऱ्यांना महिलांच्या तक्रारींवर संवेदनशीलतेने विनाविलंब कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. यामुळे बालविवाह रोखण्यास मदत होणार आहे. ■

९८८१७१७८२८

## प्रासंगिक

# हे असेच चालू द्यायचे का?

**विजय पांढरीपांडे**

सद्यःस्थिती पाहता आता यापुढे लग्न संस्था, कुटुंब व्यवस्था टिकेल की नाही अशी शंका येते. आपण निसर्गाला अव्हेरले. पृथ्वीचे पाणी प्रमाणाबाहेर शोषले. काँक्रिट जंगले बांधायच्या नादात झाडे, जंगले नष्ट केली. रान ओसाड झाले. प्रदूषण प्रमाणाबाहेर वाढले. ग्लोबल वार्मिंगने परिसीमा गाठली. जे बाहेर तेच घरात. प्रेम, माया, जिव्हाळा, आपुलकी, सहानुभूती, करुणा या भावना, संवेदना हळूहळू नष्ट व्हायला लागल्या. संवाद थांबला. त्याची जागा वादाने घेतली. द्वेष, मत्सर, राग, संताप या विकृतींनी डोके वर काढले. लहान मोठे, तरुण, वृद्ध सारेच या मनोविकाराचे शिकार. वय, लहान मोठा न बघता अपमान करणे, हात उगारणे, शिव्याशाप देणे सर्रास चालू आहे. सगळे एका माळेचे मणी असल्यासारखे वागताहेत. काहीही बोलायचे, कसेही वागायचे कुठेच कशाला धरबंध राहिला नाही. मर्यादा नाही. फ्री फॉर ऑलसारखे मोकाट रान मिळाले जणू सगळ्यांना.

शिक्षणाची घडी बिघडली अन् हे सारे सुरू झाले. आधी आपण इंग्रजांना दोष द्यायचो. आता जुने लोक म्हणतात तेच बरे होते. जुने शिक्षण, त्या चालीरीती, ते एकत्र राहणे, शेजारी पाजारी यांनी मदतीला धावून येणे.. तेच बरे होते म्हणतात. तेव्हा तक्रार होती. मुलींना शिक्षण नाही, बालवयात लग्न, फक्त घर एके घर बायकासाठी.. आता तर समान संधी आली. हवे ते सगळे, किंबहुना नको तितके स्वातंत्र्य मिळाले. काय फायदा नेमका कुणाला? उलट स्त्रियांवरील अत्याचार वाढले. उलट पक्षी स्त्रियांचे मार्दव जाऊन तिथेही हिंसा, सूडबुद्धी आली. पूर्वी चित्रपटात खलनायक असायचे. आता खलनायिकांचा जमाना आला आहे. खलनायक फार कमी. सर्वांत मोठा विनोद म्हणजे हे असे लेखन-दिग्दर्शन करणाऱ्या देखील स्त्रियाच.

दोन ताजा घटना बघा. एका चांगल्या प्ले स्कूलमध्ये चार पाच वर्षांचे मूल दोन तीन वर्षांच्या मुलाला वीसेक मिनिटे बेदम मारहाण करतं. न तिथे कुणी दाई न कुणी शिक्षक. हे स्कूल मुले सांभाळायला हजारो रुपये फी घेतात. दुसऱ्या प्रसिद्ध घटनेची चिरफाड अजूनही वाहिन्यांवर चालू आहे. पुण्यातील सिया-चेतनने केलेलं केतन खून प्रकरण. आता स्वातंत्र्य, हसणे खिदळणे, गंमती जमतीच्या व्याख्याही बदलल्या आहेत. सैल झाल्या आहेत. मुला-मुलीत हे चालतेच या सैल धोरणामुळे या मिळालेल्या स्वातंत्र्याचा गैरफायदा घेण्याची नव्या पिढीची विकृती वाढली आहे.

पूर्वी एकत्र कुटुंब होते. घरात, आपसात कुठे काही घडले की पटकन तो धूर पसरायचा. सगळ्यांना कळायचे. त्यामुळे थोडातरी धाक होता. भीती होती. आता सगळेच संकुचित झाले आहे. लहानसे कुटुंब. सगळे आपापल्या कामात, विश्वात बिझी. कुणालाच कुणाशी देणे घेणे नाही. बरे थोडे कुणी मोठ्याने बोलले, काही खडसून विचारले तर कोण कसे रिअक्ट होईल ही भीती! सगळ्यांचा पारा केव्हा किती चढेल नेम नाही. प्रत्येक जण एकमेकांच्या दडपणाखाली! प्रत्येक जण तणावग्रस्त. कुणाला नोकरीचा ताण, कुणाला घरकामाचा, कुणाला नैराश्याचा, कुणाला स्वप्नभंगाचा.. आजकाल ताण तणावाला कारण लागत नाही. चिंता काळजी ही मंडळी न बोलावताच येतात प्रत्येकाच्या आयुष्यात! त्यामुळे स्वस्थ, आनंदी, समाधानी, तृप्त असा कुणीच नाही. सगळेच अभावग्रस्त... तणावग्रस्त!

मुलांचा बहुतेक वेळ बाहेर शाळा-कॉलेजात जातो. तिथे मित्र कसे, शिक्षक कसे यावर सगळे अवलंबून. तिथेही शिस्त, संस्कार, चांगुलपणा ही मंडळी केव्हाच हद्दपार झालेली. पूर्वी शिक्षकांचा धाक वाटायचा. आता शिक्षकच धाकात असतात. त्यांनाच भीती वाटते केव्हा काय होईल, कुणी आपल्याला दोषी ठरवेल याची! वयात आलेल्या तरुण-तरुणींमध्ये स्वैराचाराचे प्रमाण वाढले आहे.घ रची बंधने शिथिल झाली आहेत. अमाप पैसा हाती आहे प्रत्येकाच्या... त्या खर्चावर नियंत्रण राहिले नाही. तुम्ही प्रश्न विचारणारे कोण, आम्हाला रोखणारे कोण असे तुम्हालाच प्रश्न विचारले जातील. तुम्हालाच निरुत्तर केले जाईल.

नीतिमत्ता ही पुस्तकी धड्यातून येत नाही. ती कृतीतून येते. आपल्यासमोर असलेल्या आदर्शातून येते. आपल्यापुढे कसले आदर्श आहेत. आम्ही गल्लोगल्ली चौकाचौकात थोर पुरुषांचे, उंचीची स्पर्धा करणारे, वाटचालीत अडथळा निर्माण करणारे पुतळे उभारले फक्त. पण ती व्यक्ती कोण होती, तिचे आदर्श काय, विचार संस्कार काय याचा शोध ग्रंथालयात जाऊन कुणी घेतलाय? आम्ही फक्त पुतळ्यांचे राजकारण केले. त्यांचे विचार, संस्कार, त्यांचे आदर्श, सगळे खुंटीला टांगून फाशी दिले! त्यामुळे आता या पिढीपुढे कसले उदात्त ध्येय, आदर्श असे काही राहिलेच नाही. मौज मजा, पॅकेज, कष्ट न करता अल्पावधीत यश हीच त्यांची उद्दिष्टे आहेत. समजावून काही फायदा नाही. कारण तुम्हालाच प्रश्न विचारले जातील. तुमचीच कोंडी केली जाईल. तुम्हालाच निरुत्तर केले जाईल. कारण तुम्हीही त्याच माळेचे मणी आहात! तुमच्याही चुका दाखवून तुमचे तोंड बंद केले जाऊ शकते. हे प्रत्येकाला माहिती आहे. प्रत्येकाचा पाय दगडाखाली आहे!

जोपर्यंत कायद्याने कडक धोरण स्वीकारले जात नाही, गुन्हेगारी प्रवृत्तीला धाक भीती वाटत नाही, प्रत्येक गुन्ह्याला विना विलंब सार्वजनिक कडक शिक्षा होत नाही, तोपर्यंत काही खरे नाही. हे असेच चालायचे! हे असेच चालू द्यायचे का, हे तुम्ही आम्ही ठरवायचे! ■

७६५९०८४५५५

## वाचक पत्रे

### ऑनलाईन केवायसी सोयीस्कर

'केवायसी'चा अर्थ नो युवर कस्टमर, असा आहे. हे सर्व मराठी ग्राहकांना व ज्या संस्थांना केवायसी पाहिजे आहे त्यांना माहीत आहे असे सर्व गृहीत धरलेले असते. जिथे जिथे तुमचे अकाऊंट आहेत, त्या सर्वांना तुमचे केवायसी दर तीन वर्षांनी पाहिजे असतात. असे आदेश रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने दिलेले आहे असे इतर संस्था व बँकेकडून सांगण्यात येतं. ग्राहक विनातक्रार आपले केवायसी सादर करत असतो. कारण आपले खाते बंद होण्याची त्याला भीती वाटते. केवायसी सादर करण्याच्या दोन पद्धती आहेत. एक ऑफलाईन आणि दुसरी ऑनलाईन. ज्येष्ठ नागरिक बहुधा ऑफलाईन केवायसी सादर करतात, कारण त्यांना ऑनलाईन पद्धत कठीण वाटते. जशी बँक ग्राहकाला केवायसी मागते तसेच आजकाल गॅस कंपनी पण केवायसी मागत आहे. एक ज्येष्ठ नागरिक ऑफलाईन केवायसी सादर करण्यासाठी गॅस कंपनीच्या ऑफिसमध्ये गेले. तेथे त्यांना त्यांची माहिती घेऊन नंतर चेहरा ओळखीसाठी दोनदा डोळे उघड बंद करायला सांगितले. त्याप्रमाणे त्यांनी केल्यानंतर त्यांची केवायसीचे काम पूर्ण झाले असे त्या गॅस कंपनीच्या अधिकाऱ्याने सांगितले. ही झाली केवायसीची ऑफलाईन पद्धत. गॅस कंपनीच्या ऑफिसमध्ये जाऊन केवायसी सादर करणे वयोमानाप्रमाणे शक्य नसल्याने त्या गॅससाठी केवायसी ऑनलाईन सादर करण्याचा प्रयत्न घरी करण्याचे ठरवले. त्याप्रमाणे मोबाईलवर गॅस कंपनीचे ॲप डाऊनलोड करून त्यांना आवश्यक ती माहिती दिल्यानंतर ते म्हणाले की चेहरा ओळखीसाठी अजून एक ॲप तुम्हाला डाऊन करावा लागेल. त्याप्रमाणे चेहरा ओळखीसाठी आणखी एक ॲप डाऊनलोड केले. त्यातील सूचनांप्रमाणे मोबाईल तुमच्या चेहऱ्यासमोर धरून तुम्हाला डोळे दोनदा उघडबंद करा अशा सूचना त्यात आल्या. त्याप्रमाणे केल्यानंतर केवायसी झाले असे वाटले, पण खात्री करण्याकरिता पुन्हा एकदा डोळे उघडबंद केले. तेव्हा मेसेज आला की तुमचे केवायसी आधी झालेले आहे. अशा प्रकारे ऑनलाईन केवायसी यशस्वी झाले. त्याबद्दल अतिशय आनंद झाला. सबब सर्व ज्येष्ठ नागरिकांना विनंती आहे की त्यांनी गॅससाठी ऑफिसमध्ये न जाता ऑनलाईन केवायसी सादर करण्याचा प्रयत्न करावा.




**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

■■■

### कोकणाला पावसाने रडवले

कोकणामध्ये अतिवृष्टीसारखा पडणारा पाऊस गेल्या पंधरा दिवसात अजिबात न पडल्याने सगळीकडे रखरखाट झाला होता आणि कालच पावसाचे रत्नागिरीमध्ये आगमन झाले आहे. कोकणात शेती हा प्रकार कमी असल्याने, जे शेती करतात त्यांची वेळेवर पाऊस न पडल्याने अवस्था बिकट झाली आहे. कोकणात पाऊस पडायला लागला की तो अतिवृष्टीसारखा पडतो आणि असा पडायला लागल्यावर तो शेतकऱ्यांचे नुकसान करतो. एक तर जून महिना संपायला येईपर्यंत पाऊस पडलेला नाही आणि आजपासूनच पाऊस अतिवृष्टी सारखा पडेल अशी कोकणात चिन्ह दिसायला लागली आहे, त्यामुळे पाऊस कोकणी माणसाला हसवतो की रडवतो हा मोठा प्रश्न पडतो तरी कोकणी माणूस शांत असतो. कोकणात पाण्याचे दुर्भिक्ष अजिबात नाही. शेती कमी प्रमाणात करत असल्याने त्या शेतीच नुकसान झालं म्हणून बोंबाबोंब नाही, परंतु आता पाऊस रडतोय की अतिवृष्टी होते की काय अशी चिन्हे दिसत आहेत हा कोकणी माणसाला पडलेला प्रश्न आहे

**शिरीष बने**/९२२४२९९२३०

■■■

### महाराष्ट्रातील वाढत्या वाहनांची समस्या गंभीर

आपणाकडे राज्य तसेच राष्ट्रीय महामार्गावर विविध प्रकारच्या चारचाकी वाहनांची संख्या झपाट्याने वाढत आहे. सण असो की जोडून आलेल्या सुट्या असो, आता प्रत्येकाला कुठेना कुठे प्रवासाला जावे असे वाटते. सध्या पावसाचे दिवस सुरू झाले आहेत. काही रस्ते सुस्थितीत असतात तर काही रस्त्यांची दुरवस्था दिसते. वाढत्या वाहन संख्येमुळे महामार्गावर अनेक ठिकाणी वाहतूक कोंडी ही नित्याची बनली आहे. त्याचा परिणाम म्हणून प्रवासाच्या वेळेत वाढ होत आहे. वाहतूक कोंडी आणि इंधनाचा अपव्यय, त्यामुळे होणारे वाढते प्रदूषण अशा समस्येमुळे शारिरीक तसेच आर्थिक नुकसान अशा समस्या वाढू लागल्या आहेत. वाढती लोकसंख्या, वाढती वाहने, त्या तुलनेत रस्ता रुंदीकरण या बाबत राज्य शासनाने मूलभूत सुविधा पुरविणे, त्याबाबत ठोस उपाययोजना केल्याचे चित्र अनेक ठिकाणी दिसून येत नाही. पुढील काही उपाययोजना शासन पातळीवर आखल्यास वाहनचालकांना काही प्रमाणात प्रवासाच्या बाबतीत दिलासा मिळू शकेल. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करणे, खाजगी वाहनांवर काही प्रमाणात नियंत्रण आणणे, वाहतूक पोलिसांच्या २४ तास ड्युटीबाबत विचार करणे, गरजेनुसार रस्ता रुंदीकरण करणे, पर्यावरणपूरक वाहनांचा वापर वाढविणे, वाहनांचा वापर आणि नागरिकांमधील जागरूकता बाबत मोहीम राबविणे. ■

**नितीन कुंभार**/पिंपरी पुणे

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८

RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## वारकरी सांप्रदायाची शिकवण गरजेची आहे - माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर



नेकनूर :- संत ज्ञानेश्वर माऊलींचा वारसा महादेव महाराज उत्तमरित्या चालवत आहेत. माऊलींचे दर्शन घेण्यासाठी जिल्हयासह राज्यातून भाविक येतात. चाकरवाडी हे भव्य-दिव्य क्षेत्र आहे. मोफत 365 दिवस अन्नदान सुरू असणारे राज्यातील हे एकमेव देवस्थान आहे. सध्या परिस्थितीत वारकरी सांप्रदायाची शिकवण गरजेची असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.

सद्गुरू संत श्री ज्ञानेश्वर महाराज श्री क्षेत्र चाकरवाडी यांच्या 26 व्या पुण्यस्मरणानिमित्त भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. या सप्ताहाची सांगता ह.भ.प. जगन्नाथ महाराज पाटील यांच्या काल्याच्या किर्तनाने झाली. यावेळी ह.भ.प. महादेव महाराज चाकरवाडीकर, नारायण महाराज उत्रेश्वरपिंप्री, नाना महाराज कदम, माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, बदामराव पंडीत, मनोज जरांगे पाटील, गंगाधर काळकुटे, चंद्रकांत नवले, परमेश्वर सातपुते, रमेश आडसकर, अक्षय मुंदडा, विलास बडगे, अरूण डाके, अरूण बोंगाणे, भारत काळे, सतीश शेळके, राजेंद्र फुटाणे, सखाराम मस्के, नानासाहेब काकडे, सुभाष क्षीरसागर, ऋषिकेश बेद्रे, हरिदास जोगदंड, नवनाथ कुलकर्णी आदिंची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, संत ज्ञानेश्वरांनी नाथ आणि दत्त यांना एकत्र करून संत नामदेवांनी वारकरी सांप्रदाय मोठा केला. अनेक पिढ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी संतांनी ग्रंथ लिहिले, संत एकनाथांनी मराठीला महत्व प्राप्त करून दिले. संत बंकटस्वामींनी राज्यात मंदीरे बांधली त्यांनी बालाघाटचा वारसा जोपासला.

# हिंदू धर्म संस्कृतीचा आदर्श सांगणारा अमृत-आनंद सोहळा : राष्ट्र सेविका समितिच्या प्रमुख संचालिका शांताक्का

## निस्वार्थ भावनेतून हेबाळकर परिवाराचे सेवाकार्य - सुहासराव हिरेमठ; ज्येष्ठ समाजसेविका सौ.शरयू शरदराव हेबाळकर यांचा जीवनगौरव

**अंबाजोगाई :** राष्ट्र सेविका समितीच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या, समाजसेविका तथा दिनदयाळ बँकेच्या पूर्व अध्यक्षा सौ.शरयू शरदराव हेबाळकर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त नंदादीप या विशेष कार्यक्रमाचे रविवारी अंबाजोगाईत आयोजन करण्यात आले होते.

रविवार, दि.२८ जून २०२६ रोजी साधना मंगल कार्यालय, अंबाजोगाई - लातूर रोड, अंबाजोगाई येथे अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत अमृत-आनंद सोहळा साजरा करण्यात आला. या अमृत महोत्सव सोहळ्यास राष्ट्र सेविका समितिच्या प्रमुख संचालिका शांताक्का यांचे आशीर्वाद लाभले, तर यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य सुहासराव हिरेमठ यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी व्यासपीठावर ज्येष्ठ इतिहास तज्ज्ञ प्रा. शरद हेबाळकर, गौरवमूर्ती सौ.शरयू शरदराव हेबाळकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी ओजस्वी मनोगत व्यक्त



करताना सुहासराव हिरेमठ यांनी सांगितले की, शरदराव आणि संध्याताई यांच्यावर घरातूनच संघ विचाराचे संस्कार झाले. प्रचारक, विस्तारक म्हणून हेबाळकर परिवार हा सेवाकार्य करीत आहे. त्यांचे कार्य व जीवन आदर्शवत, प्रेरणादायी आहे. राष्ट्राप्रती निष्ठा व विशाल अंतःकरण ठेवून हेबाळकर परिवार हा पारिजातकाच्या झाडाप्रमाणे समर्पित, निस्वार्थ भावनेतून सेवाकार्य करीत आहे. अमृत महोत्सवी शुभेच्छा देणं म्हणजे त्यांच्या कार्याची प्रेरणा घेऊन अनुकरण करणे होय असे ओजस्वी विचार हिरेमठ यांनी व्यक्त केले. तर आशीर्वचन देताना आदरणीय शांताक्का म्हणाल्या की, सौ.शरयूताई व शरदराव हेबाळकर यांचे दाम्पत्य जीवन आदर्शवत आहे. माणूस म्हटले की, वय वाढणार. हेबाळकर दाम्पत्याचे जीवन सार्थकी लागले आहे. सौ.शरयूताई या खरोखरच एक नंदादीप आहेत. निस्वार्थ भावनेने सेवाकार्य करून त्यांनी अनेकांचे जीवन प्रकाशमय केले आहे. संपूर्ण हेबाळकर परिवार प्रेरणादायी कार्य करीत आहे. कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळत समयदान करून राष्ट्र निर्माण करण्याची भूमिका हेबाळकर परिवाराने धारण केली आहे. म्हणून हा धारिणी परिवार वैशिष्ट्येपूर्ण आहे. त्यांच्या जीवनात साधेपणा आणि वागण्यात संघ विचार आहे. सर्वांप्रती मातृभाव जोपासत वसुधैव कुटुंबकम् याचे अनुकरण हेबाळकर परिवार करीत आहे. भारतीय हिंदू धर्म संस्कृतीचे आचरण व संरक्षण करण्याचा वसा आणि संदेश या अमृत महोत्सवी सोहळ्यातून मिळतो. एका अर्थाने हिंदू धर्म संस्कृतीचा आदर्श सांगणारा हा अमृत-आनंद सोहळा असल्याचे गौरवोद्गार राष्ट्र सेविका समितिच्या प्रमुख संचालिका शांताक्का यांनी काढले. सुरूवातीला मान्यवरांकडून दीपप्रज्ज्वलन आणि भारतमाता पूजन करण्यात आले. त्यानंतर अमृत महोत्सव समितीकडून गजेंद्र भागवत आणि सौ.गिताश्री गजेंद्र भागवत यांनी मान्यवरांचे स्वागत केले. यावेळी सौ.कल्याणी सचिन पेशवे-हेबाळकर यांनी प्रास्ताविक केले. तसेच दृकश्राव्य माध्यमातून गौरवमूर्ती सौ.शरयू शरदराव हेबाळकर यांचा सेवाकार्य परिचय करून देणाऱ्या चित्रफीतीतून ज्येष्ठ प्रचारक, विस्तारक, प्रचारिका, विद्यार्थी, सहकारी, नातेवाईक, मुली, जावाई, विविध संस्था, संघ परिवार आणि सहकार भारतीचे कार्यकर्ते यांनी आपल्या शुभेच्छापर मनोगतातून हेबाळकर बाईंचा जीवनप्रवास उलगडून दाखवला. यानंतर कु.शबरी, कु.रिध्दी व चि.पलाक्ष यांनी गौरवमूर्ती सौ.शरयूताई व शरदराव हेबाळकर या आजोबा आजींचे औक्षण केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते व अमृत महोत्सव सन्मान समितीचे संयोजक ॲड.मकरंद पत्की, ॲड.राजेश्वर देशमुख, दत्तप्रसाद रांदड, अशोक थोरात आदी सदस्यांनी सौ.शरयूताई व शरदराव हेबाळकर यांचा गौरव केला. त्यानंतर सत्काराला उत्तर देताना सौ.शरयूताई यांनी आपल्या मनोगतातून संघ शाखा, राष्ट्र सेविका समितिचे कार्य, शिक्षिका, कार्यकर्ता म्हणून आठवणींना उजाळा दिला. तर याप्रसंगी बोलताना प्रा.शरदराव हेबाळकर यांनी समाजाने स्त्रियांचे योगदान आणि कार्य याला जाणले पाहिजे, स्त्रियांचा सन्मान केला पाहिजे असे आवाहन करून अंबाजोगाईचे संस्कार हे वेगळेपण जपणारे आहेत. धारिणी परिवारावर प्रेम करून आशीर्वाद देणाऱ्या सर्वांच्या आम्ही कायम ऋणात आहोत असे प्रा.हेबाळकर म्हणाले. वैयक्तिक पद्य सौ.संपदा काटे यांनी सादर केले. शैलेश कंगळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व पाहुण्यांचा परिचय करून दिला. तर उपस्थित सर्वांचे आभार अमृत महोत्सव सन्मान समितीचे संयोजक ॲड.मकरंद पत्की यांनी मानले. पसायदानाने सोहळ्याची सांगता झाली. यावेळी महाराष्ट्रासह देशातील विविध क्षेत्रातील मान्यवर, संघ परिवार, राष्ट्र सेविका समिति, सहकार भारती, दीनदयाळ बँक, भारतीय शिक्षण प्रसारक संस्था यांच्यासह संघ परिवारात विविध प्रकोष्ठातील कार्यकर्ते, सेविका, स्वयंसेवक तसेच नातेवाईक व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सोहळ्याच्या यशस्वितेसाठी अमृत महोत्सव समितीचे सर्व सन्माननीय पदाधिकारी व सदस्य आणि धारिणी परिवार, सौ.कल्याणी सचिन पेशवे - हेबाळकर, सौ.अदिती धर्मराज कट्यारे - हेबाळकर, विवस्वान शरदराव हेबाळकर, गजेंद्र माधवराव भागवत यांनी पुढाकार घेतला.

# माजलगाव खून प्रकरणातील आरोपीला 12 तासांत अटक

## तालखेड येथील घटना; जुन्या वादातून चाकूने वार करून विकास वाघमोडे यांचा केला होता खून, स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी

माजलगाव | माजलगाव ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीत येणाऱ्या तालखेड गावात घडलेल्या एका धक्कादायक खून प्रकरणाचा छडा लावण्यात स्थानिक गुन्हे शाखा, बीडच्या पथकाला अवघ्या १२ तासांच्या आत यश आले आहे. वैयक्तिक भांडणाची आणि जुन्या रागाची कुरापत काढून एका तरुणाचा चाकूने सपासप वार करून निर्घृण खून करणाऱ्या आरोपीला पोलिसांनी अत्यंत शिताफीने अटक केली आहे. विकास दत्तात्रय वाघमोडे (वय ३३ वर्षे, रा. तालखेड) असे खून झालेल्या मृत व्यक्तीचे नाव असून, आदित्य बारवाळ असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, २९ जून २०२६ रोजी मृत विकास वाघमोडे यांचा मृतदेह त्यांच्या शेताजवळ संशयास्पद अवस्थेत आढळून आला होता. याप्रकरणी माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा रजिस्टर नंबर २९३/२०२६ कलम १०३(१) भा.न्या.सं अन्वये खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. घटनेचे गांभीर्य ओळखून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक (पोउपनि) महेश विघ्ने यांच्या पथकाने समांतर तपास सुरू केला. तपासादरम्यान गोपनीय माहिती मिळाली की, काही दिवसांपूर्वी मृत विकास वाघमोडे आणि आदित्य बारवाळ यांच्यात जोरदार भांडण झाले होते आणि आदित्यने विकासला जीवे मारण्याची धमकी दिली होती.

**या संशयावरून पोलिसांनी तातडीने आदित्य बारवाळ याला ताब्यात घेऊन चौकशी सुरू केली. पोलिसांच्या खाक्या दाखवताच त्याने गुन्ह्याची कबुली दिली. आरोपी आदित्यने सांगितले की, मृत विकासने त्याला पूर्वी पुणे येथे मारहाण केली होती. तसेच पंधरा दिवसांपूर्वी तालखेडफाटा येथे पुन्हा भांडण करून विकास अंगावर कुऱ्हाड घेऊन धावला होता व जीवे मारण्याची धमकी दिली होती. याच दोन्ही भांडणाचा राग मनात धरून आरोपीने विकासचा काटा काढण्याचे ठरवले. २८ जून २०२६ रोजी रात्री ११:००** वाजताच्या सुमारास, विकास शेताकडे जात असताना एकटा पाहून आदित्यने त्याला वाटेत अडवले. त्यानंतर त्याच्या पोटावर दोन आणि गळ्यावर एक असे चाकूने सपासप वार करून त्याचा निर्घृण खून केला आणि तो घरी निघून गेला.

गुन्हा कबूल केल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेने अज्ञात आरोपीचा छडा लावून त्याला अवघ्या १२ तासांच्या आत निष्पन्न करत अटक केली आणि पुढील कारवाईसाठी माजलगाव ग्रामीण पोलिसांच्या स्वाधीन केले आहे. ही धडाकेबाज कामगिरी बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, पोलीस उपाधिक्षक ऋषीकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, पो.स्टे. माजलगाव ग्रामीणचे प्रभारी पोनि विजयकुमार रामोड, पोउपनि महेश विघ्ने, पोह/ बप्पासाहेब घोडके, पोह/महेश जोगदंड, पोह/जफर पठाण, पोह/ दिलीप गित्ते आणि चापोह/ गणेश मराडे यांच्या पथकाने केली आहे.

## जन शिक्षण संस्थान बीड द्वारे MSME दिवस उत्साहात साजरा

कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय, भारत सरकार च्या अंतर्गत कार्यरत जन शिक्षण संस्थान, बीडच्या वतीने बहिरवाडी येथे सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग (MSME) दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन संचालक श्री गंगाधरजी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून खादी ग्रामोद्योग अधिकारी श्री डी. फताटे उपस्थित होते. त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात स्वावलंबनासाठी कौशल्य प्रशिक्षण अत्यंत आवश्यक असल्याचे सांगितले. जन शिक्षण संस्थान बीड जिल्ह्यात कौशल्य विकासासाठी प्रामाणिकपणे कार्यरत असून, अनेकांनी येथे प्रशिक्षण घेऊन जिल्हा उद्योग केंद्र व खादी ग्रामोद्योग मंडळाच्या सहकार्याने




बँकांच्या माध्यमातून अर्थसहाय्य मिळवून स्वतःचे उद्योग यशस्वीपणे उभारले आहेत, असे त्यांनी नमूद केले. तसेच प्रशिक्षणार्थींनीही या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करत पी.एम.ई.जी.पी व सी.एम.ई.जी.पी योजनांअंतर्गत ग्रामीण व शहरी भागासाठी उपलब्ध असलेल्या विशेष अनुदानाची माहिती त्यांनी दिली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी सहाय्यक कार्यक्रम अधिकारी श्री सुदाम पालकर यांनी प्रास्ताविक करताना पं.दीनदयाल उपाध्याय व भारतरत्न नानाजी देशमुख यांच्या कार्याचा आढावा घेऊन

दीनदयाल शोध संस्थानच्या देशभरातील प्रकल्पांची माहिती देत जन शिक्षण संस्थान बीडच्या माध्यमातून स्वावलंबी झालेल्या लाभार्थ्यांच्या यशोगाथा मांडल्या. यामुळे उपस्थित प्रशिक्षणार्थींना उद्योग उभारणीसाठी प्रेरणा मिळाली.

याच प्रसंगी मागील तीन महिन्यांत यशस्वी प्रशिक्षण पूर्ण केलेल्या लाभार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

## अंबाजोगाई न.प.च्या नवीन इमारतीसह भुयारी गटार योजनेच्या प्रस्तावाला तत्काळ मंजुरी द्या - आ. नमिता मुंदडा

**अंबाजोगाई :** केज मतदारसंघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी पावसाळी अधिवेशनात अंबाजोगाई नगर परिषदेच्या प्रशासकीय नवीन इमारतीच्या बांधकामासह शहरातील भुयारी गटार योजनेच्या प्रस्तावाला तत्काळ मंजुरी देण्याची मागणी केली आहे.

विधानसभेत मांडला मुद्दा

विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात बोलताना आ. मुंदडा म्हणाल्या की, अंबाजोगाई हे शैक्षणिक, धार्मिक व वैद्यकीय क्षेत्राचे महत्त्वाचे केंद्र आहे. शहराची वाढती लोकसंख्या व विस्तार पाहता सध्याची नगर परिषदेची इमारत अपुरी पडत आहे.तसेच सदरची ईमारत जुनी व जिर्ण झाली आहे. नागरिकांना एकाच छताखाली सर्व सुविधा मिळाव्यात व प्रशासकीय कामकाज अधिक गतिमान व्हावे यासाठी सुसज्ज व आधुनिक नवीन प्रशासकीय इमारतीची नितांत आवश्यकता आहे.

भुयारी गटार योजनेला मंजूरी द्या

तसेच शहरातील सांडपाणी व्यवस्थापनाचा प्रश्न गंभीर बनला आहे. अनेक भागात उघडी गटारे असल्याने आरोग्याचा प्रश्न निर्माण होतो. पावसाळ्यात पाणी तुंबण्याच्या समस्याही वारंवार उद्भवतात. त्यामुळे भुयारी गटार योजनेचा प्रस्ताव अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे. या योजनेला तत्काळ मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून द्यावा, जेणेकरून शहराचा सर्वांगीण विकास साधता येईल, अशी आग्रही मागणी आ. मुंदडा यांनी सभागृहात केली.

नागरिकांना दिलासा मिळणार

या दोन्ही प्रस्तावांना मंजुरी मिळाल्यास अंबाजोगाई शहराच्या पायाभूत सुविधांमध्ये मोठी भर पडणार आहे. प्रशासकीय कामकाज सुलभ होण्यासोबतच शहर स्वच्छ व सुंदर होण्यास मदत होईल, असा विश्वास आ. मुंदडा यांनी व्यक्त केला. शासनाने या मागणीची तातडीने दखल घेऊन सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा अंबाजोगाईकरांकडून व्यक्त होत आहे.

# लाच घेताना सहकारी अधिकाऱ्यासह दोघे एसीबीच्या जाळ्यात

## सावकारकीचे लायसनसाठी मागतिली लाच;जालना एसीबी पथकाची कारवाई

माजलगाव(प्रतिनिधी) बीड जिल्ह्यामध्ये मागील काही महिन्यात लाचखोरीच्या प्रमाणात वाढ झाली असून शासकीय निमशासकीय कर्मचारी अधिकारी हे पैसे घेतल्याशिवाय कामच करत नसल्याचे चित्र पहावयास मिळत आहे अशा लाचखोरावर लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कारवाई करत असून देखील लाचखोरीच्या प्रमाण काही कमी होताना दिसत नाही.

माजलगाव येथील सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था कार्यालयातील सहाय्यक निबंधक सूरज जगदाळे आणि सहकार अधिकारी श्रेणी-२ सतीश शेरखाने यांना १३ हजार रुपयांची लाच स्वीकारताना जालना येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) पथकाने मंगळवारी दुपारी रंगेहात पकडल्याची खळबळजनक घटना घडली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदाराकडून सावकारी परवाना (लायसन्स) मंजूर करून देण्यासाठी दोन्ही अधिकाऱ्यांनी १३ हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. तक्रारीची पडताळणी झाल्यानंतर जालना एसीबीचे उपअधीक्षक (डीवायएसपी) जाधवर यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा रचण्यात आला. त्यानुसार, मंगळवारी (३० जून) दुपारी सुमारे २.३० वाजता लाचेची रक्कम स्वीकारताना दोन्ही अधिकाऱ्यासह एक. खाजगी




फफाळ नामक व्यक्तीला रंगेहात ताब्यात घेण्यात आले.

कारवाईनंतर तिन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, पुढील तपास एसीबीकडून करण्यात येत आहे.

दरम्यान, बीड जिल्ह्यात अलीकडच्या काळात लाचखोरीच्या प्रकरणांमध्ये वाढ होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून सातत्याने कारवाया केल्या जात असल्या, तरी अशा घटनांमध्ये अपेक्षित घट होत नसल्याने नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे.सुरु आह.

ही कामगीरी श्रीमती माधुरी केदार कांगणे, पोलीस अधीक्षक, ला. प्र. वि. छत्रपती संभाजीनगर, मा. श्री. शशिकांत सिंगारे, अपर पोलीस अधीक्षक, ला. प्र. वि. छत्रपती संभाजीनगर, यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस उपअधीक्षक बी.एस. जाधवर यांनी व पथकातील पोहेकॉ/गजानन घायवट पोअं./गणेश चेके, मनोहर भुतेकर लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना यांनी केली,

# विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी आंबेजोगाई शहर पोलीसांची विशेष बैठक; कोचिंग क्लास चालकांना सूचना

**आंबेजोगाई :** मा. पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कावत यांच्या सूचनेनुसार तसेच मा. अप्पर पोलीस अधीक्षक सौ. चेतना मॅडम व मा. सहाय्यक पोलीस अधीक्षक श्री. ऋषिकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली दि. 29/06/2026 रोजी दुपारी 13.00 ते 14.00 या वेळेत अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशन येथे शहरातील सर्व कोचिंग क्लास चालकांची बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीचा उद्देश विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसंदर्भात आवश्यक उपाययोजना व शासनाच्या नियमांचे पालन सुनिश्चित करणे हा होता.

**बैठकीत क्लास चालकांना विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने खालील महत्त्वपूर्ण सूचना देण्यात आल्या :**

क्लास चालविण्यासाठी आवश्यक असलेले सर्व शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था व इतर सक्षम प्राधिकरणांचे परवाने वैध ठेवावेत व त्यांचे वेळोवेळी नूतनीकरण करावे.

क्लासची इमारत संरचनात्मकदृष्ट्या सुरक्षित असल्याची खात्री करून घ्यावी. स्ट्रक्चरल स्टॅबिलिटी प्रमाणपत्र तसेच वापरात असलेल्या मजल्यासंदर्भातील आवश्यक कागदपत्रे उपलब्ध ठेवावीत.

अग्निसुरक्षा नियमांचे पालन



करून फायर एक्स्टिंग्विशर, फायर अलार्म व इतर आवश्यक अग्निशमन उपकरणे कार्यरत स्थितीत ठेवावीत व त्यांची नियमित तपासणी करावी.

वर्गखोल्यांच्या क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थी प्रवेशित अथवा बसवू नयेत. विद्यार्थ्यांना पुरेशी जागा, हवा व प्रकाश मिळेल याची दक्षता घ्यावी.

कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत विद्यार्थ्यांना सुरक्षितरीत्या बाहेर काढण्यासाठी अडथळामुक्त आपत्कालीन बाहेर पडण्याचे मार्ग (Emergency Exit) उपलब्ध ठेवावेत.

विद्यार्थ्यांसाठी स्वच्छ पिण्याचे पाणी, स्वच्छ व स्वतंत्र स्वच्छतागृहे उपलब्ध करून परिसराची नियमित स्वच्छता राखावी.

क्लास परिसरातील प्रवेशद्वार, जिने, कॉरिडॉर व महत्त्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवून त्यांचे किमान एक महिन्याचे रेकॉर्डिंग सुरक्षित ठेवावे.

**अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशनतर्फे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येत असून भविष्यातही अशा जनजागृतीपर व प्रतिबंधात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.**

**– अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशन, जिल्हा बीड**

विद्युत यंत्रणा, वायरिंग व इतर उपकरणांची नियमित तपासणी करून ती सुरक्षित ठेवावी. वीजपुरवठा खंडित झाल्यास पर्यायी प्रकाश व्यवस्थेसाठी जनरेटर अथवा यूपीएसची व्यवस्था ठेवावी.

महिला विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसाठी विशेष उपाययोजना कराव्यात. क्लास परिसरात कोणतीही संशयित व्यक्ती अथवा संशयास्पद हालचाल आढळल्यास तात्काळ अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा.

विद्यार्थ्यांच्या येण्या-जाण्याची नियमित नोंद ठेवावी. प्रथमोपचार पेटी (First Aid Kit) व आपत्कालीन संपर्क क्रमांक क्लासमध्ये उपलब्ध ठेवावेत.

विद्यार्थ्यांना छेडछाड, धमकी, रॅगिंग, सायबर गुन्हे, सोशल मीडियावरील त्रास किंवा इतर कोणतीही अनुचित घटना घडल्यास ती तात्काळ पोलीसांच्या निदर्शनास आणून द्यावी.

यावेळी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेमध्ये कोणतीही तडजोड होणार नाही, यासाठी सर्व क्लास चालकांनी शासनाच्या नियमांचे व पोलीस प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले. तसेच सुरक्षित, शिस्तबद्ध व विश्वासार्ह शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यासाठी सर्व क्लास चालकांनी पोलीस प्रशासनास सहकार्य करावे, असेही सांगण्यात आले.

उपविभागीय कार्यालय : आदर्श नगर, गणपती मंदिराजवळ, पांगरी रोड, बीड. मो. 9403264930, ई-मेल - jagannathdeshmukh2020@gmail.com

CMYK

# लातूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.**

## लातूर जिल्ह्यातील शाळा आजपासून नियमित वेळेत

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ३० जून : जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर यांच्या आदेशानुसार जिल्ह्यातील सर्व शाळा १ जुलै २०२६ पासून पुन्हा नियमित वेळेत भरविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. एल निनोच्या प्रभावामुळे यावर्षी पावसाअभावी वाढलेल्या उष्णतेमुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर परिणाम होऊ नये, यासाठी २३ जूनपासून शाळांची वेळ सकाळी ८ ते १२.३० अशी करण्यात आली होती. हा निर्णय आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अंतर्गत घेण्यात आला होता. मात्र भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार सध्या तापमानात घट होऊन ३० ते ३२ अंश सेल्सिअस दरम्यान राहिले आहे तसेच जिह्ययात हलका ते मध्यम पाऊस झाल्याने उष्णतेची तीव्रता कमी झाली आहे. या पार्श्वभूमीवर, लातूर जिल्ह्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनाच्या शाळा १ जुलैपासून पूर्ववत वेळेत सुरू करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच २३ जून ते ३० जून या कालावधीत कमी झालेल्या अध्यापन तासांची भरपाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.



## विविध वृत्त...

### लातूर जिल्ह्यात चोवीस तासांत सरासरी ५.२ मिलीमीटर पावसाची नोंद

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ३० जून : जिल्ह्यात ३० जून रोजी सकाळी आठ वाजता संपलेल्या चोवीस तासांत सरासरी ५.२ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. यामध्ये लातूर तालुक्यात सर्वाधिक १३ मिलीमीटर, तर जळकोट तालुक्यात सर्वात कमी ०.३ मिलीमीटर पाऊस झाला आहे.

तालुकानिहाय पावसाची आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे- लातूर- १३, औसा- ७.९, अहमदपूर- १.१, निलंगा- ३, उदगीर- ४, चाकूर- २.८, रेणापूर- ३.३, देवणी- ६.१, शिरूर अनंतपाळ- २.३ आणि जळकोट- ०.३ मिलीमीटर.

### रस्त्यासाठी नागरिकांचे अर्धनग्न आंदोलन



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ३० जून : लातूर शहरापासून जवळच असलेल्या हरंगुळ खुर्द येथील गावातल्या मुख्य रस्त्याची गेल्या अनेक दिवसांपासून दुरावस्था झाली आहे. या रस्त्याच्या दुरुस्तीच्या मागणीसाठी नागरिकांनी सोमवारी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयासमोर अर्धनग्न आंदोलन केले.

हरंगुळ खुर्दच्या मुख्य रस्त्याची अवस्था रस्त्यात खड्डे की खड्ड्यांचा रस्ता अशी झाली आहे. पावसाळ्यात तर या खड्ड्यांत पाणी साचून अनेक अपघात होत आहेत.

या रस्त्याचे उद्घाटनदेखील झाले. मात्र, बांधकाम विभागाच्या

ढिम्म आणि उदासीन कारभारामुळे रस्त्याचा प्रश्र्न मार्गी लागत नाही, वेळोवेळी निवेदने दिली, मात्र त्याची दाखल घेतली जात नाही. त्यामुळे गावातील संतापलेल्या युवकांनी बांधकाम विभागाच्या कार्यालयासमोरच चक्क अर्धनग्न आंदोलन करत प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. यानंतरही प्रशासनाला जाग नाही आल्यास बेमुदत उपोषणाचा इशारा देण्यात आला आहे.

### नाट्यगृह उभारणीचे काम लवकरच

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ३० जून : निधी अभावी गेल्या अनेक महिन्यांसून लातूरच्या नाट्यगृहाचे बांधकाम रखडले होते. त्यातच कंत्राटदाराने नाट्यगृहाचे काम अर्धवट सोडले होते. जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी नाट्यगृह उभारणीसाठी २५ कोटींची तरतूद केल्याचे आता नाट्यगृहाच्या उभारणीला लवकरच सुरुवात होणार आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय

परिसरातील जागेत नाट्यगृह उभारणी सुरु देखील करण्यात आली होती. मात्र नाट्यगृहचे काम अर्धवट सोडून कंत्राटदराने पाठ फिरवली.

२५ कोटींची त्यामुळे नाट्यगृह उभारणीचे काम राखडलं होते, मात्र आता लातूरचे नाट्यगृह लवकरच उभारण्यासाठी तरतूद करण्यात आली असल्याची माहिती पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिली. त्यामुळे नाट्यप्रेमीना आता दिलासा मिळाला आहे.

## वट सावित्री पौर्णिमा उत्साहात

जन्मोजन्मी हाच पती मिळो : सुवासिनींनी घेतल्या वटवृक्षाभोवती फेऱ्या



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ३० जून : यमाने हिरावून घेतलेल्या पतीला त्याचा पाठलाग करून पतीला जीवंत करणाऱ्या सती सावित्रीची आठवण म्हणून हिंदू धर्मात ज्येष्ठ महिन्यातील पौर्णिमेला साजरा करण्यात येत असलेला वटसावित्रीचा सण शहरासह परिसरात उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्त सुवासिनी महिलांनी साज-श्रृंगार परिधान करीत वट वृक्षाची मनोभावे पूजा करून जन्मोजन्मी हाच पती मिळू दे म्हणून वडाच्या झाडाभोवती दोरे वाहून फेऱ्या घेतल्या.

वनात लाकूड तोडण्यासाठी गेलेल्या सत्यवानाचा झाडावरून

पडून मृत्यू झाल्याचे समजताच पतीव्रता सावित्रीने रेड्यावरील यमराजाचा पाठलाग करून सत्यवानाचा आत्मा परत आणण्याचा पराक्रम केला होता. यातून तिचे पतीवरील प्रेम दिसून येते, अशी अख्यायिका असल्याने दरवर्षी ज्येष्ठ महिन्यातील पौर्णिमेला वटसावित्री पौर्णिमा साजरी केली जाते. सोमवारी (दि.२९), शहरासह जिल्ह्यातील सुवासिनी महिलांनी एकत्र येत घराजवळील वडाच्या झाडाला आंबा, पुरणपोळीचा नैवद्य देण्यात आला. प्रत्येक सुवासिनीने वडाच्या झाडाला दोरा गुंडाळून पूजा केली. जन्मोजन्मी हाच पती मिळो, असे वट वृक्षाला साकडे घातले.

## पानचिंचोली आरोग्य केंद्रास १० लाखांचा निधी

### सभापती यांनी आरोग्य केंद्राची पाहणी करत दर्जेदार कामाच्या दिल्या सुचना



तभा वृत्तसेवा

निलंगा दि. ३० जून : तालुक्यातील पानचिंचोली येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील विकास कामासाठी निलंगा पंचायत समिती च्या सभापती डॉ. सुनीताताई संतोष वाघमारे माध्यमातून १० लाख रूपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला असून त्यातून आरोग्य केंद्रातील परिसरात पेपर ब्लॉक व डेनेज पाईप लाईन च्या कामाला सुरुवात झाली असून रविवार दिनांक २८ जुनं २०२६ रोजी सभापतीनी पानचिंचोली प्राथमिक आरोग्य केंद्रातील कामाची पाहणी केली. व दर्जेदार काम करण्याच्या सुचना दिल्या.

पानचिंचोली प्राथमिक आरोग्य केंद्रात रक्त पदे व विविध मुलभुत सुविधाची दुरावस्था झाल्याने आरोग्य सेवा पुरविण्यात अडथळे येत असल्याचे पानचिंचोली पंचायत समिती गणाच्या सदस्या तथा निलंगा पंचायत समिती च्या सभापती डॉ सुनीताताई संतोष वाघमारे यांनी लातूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे विकास कामे करण्याची मागणी केली होती. व निलंगा विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार माजी मंत्री संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या सुचनेनुसार तात्काळ दखल घेत १० लाख रुपये चा निधी मंजूर केला असुन परिसर स्वच्छ तेसाठी पेव्हर ब्लॉक कामाला सुरुवात झाली व केंद्रातील स्वच्छता गृह पाईपलाईनची ही दुरूस्ती करण्यात आली असून मुलभुत सुविधा च्या कामाची पाहणी निलंगा पंचायत समिती च्या सभापती डॉ सुनिताताई वाघमारे यांनी केली.

यावेळी निलंगा तालुका आरोग्य अधिकारी प्रदीपकुमार जाधव, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य डॉ. संतोष वाघमारे, भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष विकास पाटील, रमेश जाधव, नेताजी पाटील, गोपाळ जाधव, सिध्दु काळे, सुनील बेळंबे, महेश जाधव आदींसह पानचिंचोली गावातील नागरिक उपस्थित होते.

## शिवनेरी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्याची भारतीय सैन्यात निवड

तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. ३० जून : शिवनेरी महाविद्यालयात बी.कॉम. द्वितीय वर्षात शिक्षण घेणारा जोगाळा येथील विद्यार्थी निलेश अशोक विजापुरे याने अथक परिश्रम, जिद्द आणि चिकाटीच्या बळावर भारतीय सैन्यात शिपाई पद मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्याच्या या यशामुळे महाविद्यालयासह परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

भारतीय सैन्यात निवड झाल्याबद्दल शिवनेरी महाविद्यालयात निलेश विजापुरे यांचा सत्कार करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. बी. सूर्यवंशी यांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी प्राचार्यांनी निलेश यांचे अभिनंदन करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच विद्यार्थ्यांनी त्यांच्या यशातून प्रेरणा घेऊन मेहनत, शिस्त आणि चिकाटीच्या जोरावर आपले ध्येय गाठावे, असे प्रतिपादन केले.

## विरोधी पक्षनेते देविदास काळे यांच्या मध्यस्थीने मनपा कर्मचाऱ्यांचे आंदोलन मागे

### न्याय हक्कासाठी शासन व प्रशासनाकडे पाठपुरावा करण्याची ग्वाही



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ३० जून : शहर महानगरपालिकेच्या कर्मचाजयांनी थकीत दोन महिन्यांचे वेतन तत्काळ मिळावे या प्रमुख मागणीसह विविध मागण्यांकरिता मनपा आवारात काम बंद करून ठिय्या आंदोलन केले होते. या आंदोलनाची माहिती मिळताच विरोधी पक्षनेते देविदास काळे यांनी कर्मचारी व प्रशासक यांच्यात यशस्वी मध्यस्थी केल्याने सदर आंदोलन मागे घेण्यात आले आहे. कर्मचाजयांना तात्काळ दोन महिन्याचे वेतन देण्यात येईल, असा शब्द प्रशासनाने दिला असून इतर मागण्यांकरिता आपण स्वत: शासन व प्रशासन स्तरावर पाठपुरावा करू अशी ग्वाही मनपा विरोधी पक्षनेते देविदास काळे यांनी कर्मचाजयांना दिली आहे.

थकीत दोन महिन्याचे वेतन तात्काळ अदा करावे, सातवा वेतन आयोगाची थकीत रक्कम मिळावी आणि लोकप्रतिनिधी व कर्मचारी यांच्यामध्ये समन्वय समिती स्थापन करावी, यासह इतर मागण्यांकरिता शहर महानगरपालिका कर्मचाजयांनी आज काम बंद केले होते. केवळ काम बंद न करता या सर्व कर्मचाजयांना मनपा इमारतीत ठिय्या आंदोलनही केले होते. या आंदोलनाचा माहिती मिळाल्यानंतर मनपा विरोधी पक्षनेते देविदास काळे यांनी मनपा कर्मचाजयांशी संवाद साधला. यावेळी त्र्यांनी कर्मचाजयांना आपल्या मागण्या न्याय असून त्या तात्काळ पूर्ण होणे अपेक्षित असल्याचे काळे यांनी सांगितले. याबाबत आयुक्तांसोबत चर्चा करून यामध्ये मार्ग काढण्यात येईल, असा शब्द दिला. तसेच आगामी काळात कर्मचाजयांचे वेतन थकीत राहू नये, याकरिता जीएसटीचे वाढीव अनुदान व विशेष अनुदान प्राप्त व्हावे, याकरिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पालकमंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांच्याकडे पाठपुरावा करू अशी ग्वाही दिली.

यानंतर देविदास काळे यांनी आयुक्तांसोबत चर्चा करून त्या कर्मचाजयांचे थकीत वेतन अदा करण्यासाठी आवश्यक असणारी कार्यवाही तात्काळ सुरु करावी, अशी मागणी दिली. या मागणीनुसार आयुक्ता मानसी मीना यांनी वेतन अदा करण्यासाठी कार्यवाही करण्याचे निर्देश देवून उद्यापर्यंत या कर्मचाजयांना वेतन प्राप्त होईल, असा विश्र्वास दिला. त्याच बरोबर लोकप्रतिनिधी व कर्मचारी यांच्यातील समन्वयासाठी समिती स्थापन करण्यासाठी आवश्यक प्रक्रिया सुरू करण्याचेही स्पष्ट केले. आगामी सर्व साधारण सभेत सातवा वेतन आयोगाची फरक रक्कम मिळण्याकरिता ठराव मांडण्यात येईल, असेही सांगितले. कर्मचाजयांच्या मागण्यांबाबत झालेल्या चर्चेचा वृत्तांत देविदास काळे यांनी सांगितल्यानंतर कर्मचाजयांनी आपले आंदोलन मागे घेतले. सदर आंदोलनात यशस्वी मध्यस्थी केल्याबद्दल कर्मचाजयांकडून विरोधी पक्षनेते देविदास काळे यांचे आभार व्यक्त करण्यात आले.

## जुगार अड्ड्यावर धाड

### साडेतीन लाखांचा मुद्देमाल जप्त

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ३० जून : उदगीर ग्रामीण पोलिसांनी जुगार अड्ड्यावर धाड टाकून केलेल्या कारवाईत ३ लाख ७३ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून दोन आरोपींना ताब्यात घेण्यात आले, तर चार आरोपी अंधाराचा फायदा घेऊन घटनास्थळावरून फरार झाले आहेत.

जळकोट रोड, इंडिया नगर, उदगीर येथील एका हॉस्पिटलच्या दिशेने जाणाऱ्या रस्त्यालगत झागीरदार यांच्या शेताजवळील पत्र्याच्या शेडमध्ये दि. २८ जून रोजी सायंकाळी ८ वाजण्याच्या सुमारास काही व्यक्ती 'तीरट' नावाचा जुगार खेळत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार उदगीर ग्रामीण पोलिसांनी छापा टाकला. छाप्यामध्ये वसीम दस्तगीर शेख (वय २५, रा. हावगीस्वामी मठ चौक, उदगीर), आमेर बशीर हाश्मी (वय ३२, रा. दर्गा चौक, उदगीर) हे जुगार खेळताना रंगेहाथ मिळून आले. तर शकील राजमहम्मद लदाफ, बबलू खाँजा सय्यद, खाँजा युसुफ शेख, आशपाक बारी पटेल हे चार आरोपी पोलिसांची चाहूल लागताच अंधाराचा फायदा घेऊन घटनास्थळावरून फरार झाले.

कारवाईदरम्यान पोलिसांनी जुगाराचे साहित्य, ४ मोटारसायकली, ३ मोबाईल फोन, १ ऑटो रिक्षा आणि रोख रक्कम असा ३ लाख ७३ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अमलदार केंद्रे हे करीत असून, फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी पथके नियुक्त करण्यात आली आहेत. त्यांच्या अटकेसा-ठी पोलिसांकडून शोधमोहीम सुरू आहे.

## लायन्समध्ये कार्य करणाऱ्या व्यक्तींचे आयुष्य वाढते : प्राचार्य डॉ. गव्हाणे

### लायन्स क्लब ऑफ लातूर सिटी चा पदग्रहण सोहळा २८ जून रोजी दिमाखात संपन्न




तभा वृत्तसेवा

लातूर दि. ३० जून : समाजसेवा, नेतृत्व आणि सेवाभावाची परंपरा जपणाऱ्या लायन्स क्लब ऑफ लातूर सिटीच्या नूतन कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा रविवारी एमआयडीसी येथील हॉटेल अरोमा येथे अत्यंत उत्साहपूर्ण व दिमाखदार वातावरणात पार पडला. लायन्स क्लबच्या ध्वजवंदनाने आणि दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी अध्यक्ष लायन नागनाथ गित्ते यांनी केले. त्यांनी क्लबच्या समाजसेवेच्या उल्लेखनीय वाटचालीचा आढावा घेत नव्या कार्यकारिणीला शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन लायन मनोज देशमुख व लायन संजय राजुळे यांनी केले.

यावेळी इन्स्टॉलेशन ऑफिसर पीडीजी लायन दिलीप मोदी नांदेड यांनी नूतन पदाधिकाऱ्यांना पद व गोपनीयतेची शपथ देत समाजसेवा, नेतृत्व, संघटनशक्ती आणि वर्षभर अधिकाधिक लोकहिताचे उपक्रम राबविण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे राजर्षी शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधवराव गव्हाणे यांनी आपल्या प्रेरणादायी मार्गदर्शनात सांगितले की, लायन्ससारख्या सामाजिक संस्थांमध्ये कार्य करणाऱ्या व्यक्तींचे आयुष्य अधिक समृद्ध, आनंदी आणि अर्थपूर्ण बनते. समाजसेवा, सकारात्मक विचार, सेवाभाव आणि लोकांशी सातत्याने जोडलेले राहिल्यामुळे मानसिक समाधान मिळते, तणाव कमी होतो आणि निरोगी आयुष्य जगण्यास मदत होते.

यावेळी त्यांनी पैसा कमविण्यापेक्षा मुलांवर चांगले संस्कार करा; कारण संस्कार हीच सर्वात मोठी संपत्ती आहे, असा मोलाचा संदेश दिला. तसेच राजाचा गर्व कमी करण्यासाठी सांगितलेल्या सुईच्या उदाहरणाने उपस्थितांना अंतर्मुख केले. समाजहितासाठी अधिकाधिक सेवा प्रकल्प राबवून गरजूंपर्यंत मदतीचा हात पोहोचविण्याचे आवाहनही त्यांनी केले.

नवनिर्वाचित अध्यक्ष लायन अनिलकुमार श्रीरामजी झंवर, सचिव लायन ईश्र्वरप्रसाद व्ही. चांडक आणि कोषाध्यक्ष लायन संजय एन. राजुळे यांनी आगामी कार्यकाळात शिक्षण, आरोग्य, पर्यावरण संवर्धन, रक्तदान, नेत्रतपासणी, युवा विकास तसेच विविध समाजोपयोगी उपक्रम प्रभावीपणे राबविण्याचा संकल्प व्यक्त केला. कार्यक्रमास रीजन चेअरपर्सन लायन पी. विवेकानंद, रीजन चेअरपर्सन (डी) लायन डॉ. अजय नारायणकर, झोन चेअरपर्सन लायन शरद मोरे, झोन चेअरपर्सन (डी) लायन नागनाथ गित्ते, कृषी उत्पन्न बाजार समिती उदगीरचे सभापती शिवाजी हुडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## पल्स पोलिओ लसीकरण अभियान



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ३० जून : महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालय, लातूर येथे पल्स पोलिओ लसीकरण अभियानाचा शुभारंभ प्राचार्य प्रो. डॉ. सिद्राम डोंगरगे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी लसीकरण अभियान केंद्र प्रमुख तथा ग्रंथपाल प्रा. प्रमोद सराफे, प्रा. गणेश बेडगे, प्रा. हेमंत खानापुरे, बालाजी होनराव आणि आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी प्राचार्य प्रो. डॉ. डोंगरगे म्हणाले की, देशाला कायमस्वरूपी पोलिओ मुक्त ठेवण्यासाठी आणि आपल्या प्रत्येक बालकाचे आरोग्यदायी व सुरक्षित भविष्य घडवण्यासाठी हे लसीकरण अत्यंत आवश्यक आहे.

प्रत्येक पालकाने आपल्या परिसरातील पाच वर्षांखालील प्रत्येक बालकाला पोलिओचे दोन थेंब अवश्य पाजून या राष्ट्रीय जनआरोग्य मोहिमेत सहभागी व्हावे, असे आवाहन केले.

## लातूर जिल्ह्यात अनधिकृत होर्डिंग्ज आणि बॅनर्सविरोधात तीव्र मोहीम



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ३० जून : जिल्ह्यातील शहरी आणि ग्रामीण भागांत विनापरवाना लावण्यात येणाऱ्या अनधिकृत होर्डिंग्ज, पोस्टर्स आणि बॅनर्स विरोधात जिल्हा प्रशासन, महानगरपालिका व पोलीस प्रशासनाने संयुक्तपणे तीव्र मोहीम हाती घेतली आहे. माननीय उच्च न्यायालयाच्या आदेशांचे आणि निर्देशांचे तंतोतंत पालन करण्यासाठी ही कडक पावले उचलण्यात येत असल्याची माहिती अधिकृत प्रसिद्धी पत्रकाद्वारे देण्यात आली आहे.

लातूर महानगरपालिका क्षेत्रात विनापरवाना अनधिकृत होर्डिंग लावणाऱ्यांवर प्रशासनाने कायदेशीर बडगा उगारला आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्याऱ्यांविरोधात आतापर्यंत १६ एफआयआर दाखल करण्यात आले असून, अनधिकृत बॅनर लावणाऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात दंड देखील वसूल करण्यात आला आहे.

महानगरपालिकेची रीतसर परवानगी न घेता कोणत्याही प्रकारचे होर्डिंग किंवा बॅनर छपाई केल्यास संबंधित प्रिंटिंग एजन्सीवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल, अशी स्पष्ट नोटीस प्रशासनातर्फे बजावण्यात आली आहे.

उच्च न्यायालयात दाखल जनहित याचिका (पीआयएल १५५) संदर्भात जिल्हा प्रशासन अत्यंत गांभीर्याने काम करत आहे. जिल्हाधिकारी, लातूर यांनी वेळोवेळी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस अधीक्षक, मनपा आयुक्त, मुख्याधिकारी, आणि राष्ट्रीय महामार्गाचे सहाय्यक अभियंता यांच्या उपस्थितीत आढावा बैठका घेऊन कृती आराखडा निश्र्चित केला आहे. या संदर्भात मनपा आयुक्त आणि पोलीस अधीक्षक, लातूर यांना वेळोवेळी विविध पत्रांद्वारे उच्च न्यायालयाच्या आदेशांचे काटेकोर पालन करण्याबाबत कळवण्यात आले आहे.

या मोहिमेअंतर्गत लातूर जिल्ह्यातील सर्व महानगरपालिका, नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या माध्यमातून शहरांमधील मुख्य ठिकाणी नोटीस बोर्ड लावून तसेच वर्तमानपत्रांमध्ये जाहीर आवाहन करून अनधिकृत होर्डिंग संदर्भात मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्यात येत आहे.

लातूर जिल्ह्यातील सर्व नागरिक, राजकीय पक्ष, सामाजिक संस्था आणि जाहिरातदारांना प्रशासनातर्फे जाहीर आवाहन करण्यात येते की, कोणत्याही सार्वजनिक किंवा खाजगी जागेवर अनधिकृतपणे होर्डिंग तसेच बॅनर लावू नयेत. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर यापुढेही फौजदारी व दंडात्मक कारवाई सुरूच राहील.

# तुप्पा येथील आरोग्य केंद्राची दुरावस्था

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि.३० जुन -**
प्राथमिक आरोग्य केंद्र तुप्पा येथील इमारतीची दुरावस्था असून परिसरात घाणीचे साम्राज्य दिसून येते . येथिल आरोग्य केंद्र येथे तीन वैद्यकीय अधिकारी असून देखील येथील इमारत व स्वच्छतेकडे दुर्लक्ष असल्याचे दिसून येते. तेव्हा याकडे जिल्हा कार्यकारी अधिकारी व आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकारी यांनी लक्ष घालून आरोग्य केंद्रास एक वेळेस भेट देऊन समस्या सोडविण्याची मागणी होत आहे.

नांदेड शहरालगत असलेले प्राथमिक आरोग्य केंद्र तुप्पा येथील आरोग्य केंद्रातील एका इमारतीची पडझड गेल्या बऱ्याच वर्षापासून होत आहे. तरी या पडझडीकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येते.या केंद्रात तीन वैद्यकीय अधिकारी असून देखील या केंद्राची योग्य पद्धतीने देखभाल होत नसल्याचे चित्र स्पष्ट दिसून येते . पडझड होत असलेल्या



रूममध्येच लहान बाळांचे लसीकरण होते. लसीकरण चालू असताना एका बाळाच्या डोक्यात खपलीचा छोटा भाग पडला असल्याने सदरील बाळास खूप वेदना सहन कराव्या लागल्या आहेत. तरी देखील येथील वैद्यकीय अधिकारी यांनी या बाबीकडे दुर्लक्ष करून या रूमची कसल्याच प्रकारचे दुरुस्ती करण्यात आलेली नाही. या केंद्रामध्ये पूर्णवेळ वैद्यकीय अधिकारी असून सुद्धा सदरील बाबींची काळजी घेत नसल्याचे दिसून येते. येथील अधिकारी आपली ठराविक ड्युटी वेळेनुसार करणे व निघून जाणे या पलीकडे काहीही लक्ष देत असल्याचे समजते. तसेच आपल्या केंद्रात किती औषधी उपलब्ध आहेत व किती औषधी उपलब्ध नाही याविषयी देखील संबंधित कर्मचाऱ्यांशी चर्चा होत नसल्याने त्या ठिकाणी औषधांचा तुटवडा भासतो असे समजते. या ठिकाणी कुत्रा चावल्या रुग्णास लस उपलब्ध नाही . अशी महत्त्वाची अन्य औषधी उपलब्ध आहेत की नाही ह्यांची शंका नागरिकांना आहे . वैद्यकीय अधिकारी फक्त आपली ओपीडी काढणे या पलीकडे कुठल्याही बाबींचा विचार करत नसल्याचे दिसून येते. तेव्हा याकडे आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकारी यांनी लक्ष घालून या ठिकाणच्या समस्या सोडविण्याची मागणी येथील नागरिकांतून होत आहे.

# किनवट बाजार समितीतील व्यवहारांच्या उच्चस्तरीय चौकशीची मागणी

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि.३० जुन -**
कृषी उत्पन्न बाजार समिती, किनवट येथे १ एप्रिल २०१७ ते ३१ मार्च २०२२ या कालावधीत झालेल्या कथित आर्थिक, प्रशासकीय व कायदेशीर अनियमिततांची उच्चस्तरीय चौकशी करून विशेष लेखापरीक्षण (स्पेशल ऑडिट) करण्यात यावे, अशी मागणी विद्यमान सभापती गजानन गोविंदराव मुंडे यांनी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, किनवट यांच्याकडे सविस्तर तक्रार अर्जाद्वारे केली आहे.



तक्रारीत तत्कालीन सभापती, सचिव, संचालक मंडळ, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संगनमताने सार्वजनिक निधीचा अपहार, नियमबाह्य कर्मचारी भरती, बनावट बिले तयार करणे, बाजार शुल्कातील अनियमितता तसेच जमीन विक्रीतील मंजुरीच्या अटींचे उल्लंघन केल्याचे आरोप करण्यात आले आहेत. या सर्व प्रकरणांची स्वतंत्र चौकशी करून संबंधित दोषींविरुद्ध दिवाणी, फौजदारी व विभागीय कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

तक्रारीनुसार व्यापाऱ्यांकडून वसूल करण्यात आलेली बाजार फी समितीच्या खात्यात नियमि तपणे जमा करण्यात आली नसल्याचा तसेच लाखो रुपयांची खोटी बिले तयार करून निधीचा अपहार झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे संबंधित कालावधीतील सर्व बँक व्यवहार, व्हाउचर, पावती पुस्तके, कॅशबुक व लेखा नोंदींचे विशेष लेखापरीक्षण करण्याची मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय कर्मचारी भरती प्रक्रिया, सेवानिवृत्त सचिवांना देण्यात आलेली मुदतवाढ, अनामत रकमेची उचल तसेच गोकुंदा येथील जमीन विक्रीतून प्राप्त निधीच्या वापराचीही चौकशी करण्याची म ागणी करण्यात आली आहे. चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित अभिलेख सुरक्षित ठेवावेत व दोषी आढळणाऱ्यांकडून आर्थिक नुकसानीची वसुली करावी, अशीही मागणी तक्रार अर्जात करण्यात आली आहे.

## खुरगाव येथे वृक्षारोपण आणि रक्तदान शिबिर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.३० जुन -**
तालुक्यातील खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण केंद्राचे संचालक तथा अखिल भारतीय भिक्खू संघाचे जिल्हाध्यक्ष धम्मगुरू संघनायक भदंत पंय्याबोधी थेरो यांच्या जन्म दिनानिमित्त ६ जुलै रोजी भव्य वृक्षारोपण आणि रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच भिक्खू संघाच्या उपस्थितीत प्रशिक्षण केंद्राच्या पार्किंग परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम, अष्टपुरस्कार प्रदान, चिवरदान, ग्रंथदान, भोजनदान, धम्मदेसना, वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन आदी कार्यक्रम होणार आहेत.

# बँक निवडणुकीत श्रावण भिलवंडे यांची दमदार एन्ट्री

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि.३० जुन -**
नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी (एनडीसीसी) बँकेच्या निवडणुकीच्या रणधुम ाळीला आता चांगलाच वेग आला असून, 'ब' प्रक्रिया व पणन मतदारसंघातून भाजपचे ज्येष्ठ नेते तथा माजी सभापती श्रावण पाटील भिलवंडे नरसीकर यांनी सोमवारी उमेदवारी अर्ज दाखल करून निवडणुकीच्या मैदानात अधिकृत प्रवेश केला. त्यांच्या उमेदवारीमुळे या मतदारसंघातील राजकीय वातावरण अधिक तापले असून, आगामी लढतीकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

उमेदवारी अर्ज दाखल करताना भाजपच्या पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यकर्त्यांमधील उत्साह आणि नेत्यांची एकजूट पाहता या मतदारसंघात भाजपने



विजयासाठी पूर्ण ताकद पणाला लावल्याचे चित्र दिसून आले.

यावेळी भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य राजेश देशमुख कुंटूरकर, प्रदेश कार्यकारिणी सदस्य बालाजी बच्चेवार, युवा नेते रुपेश कुंटूरकर, आनंदराव बावणे भोपाळकर, माजी जिल्हा परिषद सदस्य सूर्याजी चाडकर, ज्येष्ठ पत्रकार भूषण पारळकर, गोविंद नरसीकर, दत्ता पाटील होटाळकर, बालाजी गंगासागरे यांच्यासह भाजपचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'ब' प्रक्रिया व पणन मतदारसंघात श्रावण पाटील भिलवंडे नरसीकर यांच्या उमेदवारीमुळे राजकीय समीकरणांना नवी दिशा मिळाल्याची चर्चा सुरू आहे. सहकार क्षेत्रातील अनुभव, कार्यकर्त्यांशी असलेला संपर्क आणि स्थानिक पातळीवरील प्रभाव यांच्या जोरावर ते या निवडणुकीत महत्त्वाचे दावेदार ठरणार असल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे.

उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर आता प्रचाराला वेग येणार असून, आरोप-प्रत्यारोप, बैठका, संपर्क अभियान आणि राजकीय हालचाली अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. त्यामुळे एनडीसीसी बँकेच्या 'ब' प्रक्रिया व पणन म तदारसंघात विजयाचा गुलाल कोण उधळणार, याकडे सहकार क्षेत्रासह संपूर्ण नांदेड जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# मनरेगातील भ्रष्टाचाराचा आरोप; माहिती अधिकारालाही वर्षभर उत्तर नाही

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.३० जुन -**
नांदेड तालुक्यातील उत्तर मतदार संघातील मनरेगा योजना अंतर्गत कामात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप मनसे तालुकाध्यक्ष दिलीप राठोड यांनी केला

माहिती अधिकार कायद्यांतर्गत मागवलेल्या माहितीला तब्बल एक वर्षाहून अधिक काळ उलटूनही उत्तर देण्यात आले नसल्याचा आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुका अध्यक्ष दिलीप राठोड यांनी केला आहे. २६ जून २०२५ रोजी दाखल केलेल्या माहिती अधिकार अर्जाची कोणतीही दखल गट विकास अधिकारी कार्यालयाने घेतली नसल्याचे त्यांनी म्हटले आहे. मनरेगा अंतर्गत करण्यात आलेल्या विविध कामांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता आणि भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करत राठोड यांनी संबंधित माहिती मागवली होती. मात्र, माहिती अधिकाराचे पत्रच कार्यालयात प्राप्त झाले नसल्याचा खुलासा अधिकाऱ्यांकडून करण्यात येत असल्याने भ्रष्टाचाराला खतपाणी घालण्याचे काम सुरू असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. याबाबत आवक-जावक विभागाकडे तक्रार करूनही कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचे ते म्हणाले.



## नाझिया इलाही यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी

**मुदखेड** -पैगंबर मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांच्याबद्दल अपमानास्पद भाषा वापरणाऱ्या नाझिया इलाही यांच्या विरोधात देशभरात निदर्शने होत आहेत. ११ जून रोजी एका मुलाखतीत त्यांनी पैगंबर मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांच्याबद्दल वापरलेल्या अपमानास्पद भाषेमुळे देशभरातील मुस्लिम समाजाच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्यामुळे देशभरात नाझिया इलाही यांच्या विरोधात गुन्हे दाखल केले जात आहेत. त्या अनुषंगाने दि.२६ जुन रोजी मुदखेड शहरातही मुस्लिम समाजाने नाजिया इलाही विरुद्ध गुन्हा दाखल करण्याची मागणी केली व पोलीस प्रशासनाला सांगितले की,जर नाझिया इलाही यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला नाही, तर आंदोलन केले जाईल असा इशारा मुस्लिम बांधवांच्या वतीने निवेदनाद्वारे केला आहे. यावेळी पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण यांनी आश्वासन दिले की, ते आपल्या वरिष्ठांशी बोलून नाझिया इलाही यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात येईल. यावेळी म ुफ्ती सुलेमान, मुफ्ती नईम, अवेस कुरेशी, मोहम्मद शोएब मुजीब पठाण, मोहम्मद हुसेन, मोहम्मद वाजिद मोहसीन माजीद, लाला अब्दुल,अजीम रिझवान पठाण, आसिफ सेठ, जमीर खालिद खुरेशी, रहीम मौलाना, महंमद बुऱ्हाण, महंमद हकीम, सह मुस्लिम समाज बांधव व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पंडित दिनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे १ जुलै रोजी आयोजन

**नांदेड** -नांदेड जिल्हयातील बेरोजगार उमेदवारांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी, यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्यावतीने बुधवार १ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वाजेपासून जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र , आनंदनगर रोड, बाबा नगर नांदेड येथे पंडीत दिनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या रोजगार मेळाव्यामध्ये नामांकित हॉस्पिटल, बँक तसेच इतर आस्थापनांच्यावतीने मुलाखती घेण्यात येणार आहेत. नांदेड जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांनी बुधवार १ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वा. रोजगार मेळाव्यास उपस्थित राहून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त डॉ.रा.म. कोल्हे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र , आनंदनगर रोड, बाबा नगर नांदेड कार्यालयाचा ई-मेल आयडी परपवशवीक्षसरी०१सारळश्र. ले आणि कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक ०२४६२-२५१६७४ यावर संपर्क साधावा, असेही आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्यावतीने करण्यात आले आहे.

## सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन

**नांदेड** - सामान्य जनतेच्या तक्रारी, अडचणी न्याय व तत्परतेने सोडविण्यासाठी प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिन आयोजित करण्यात येतो. जिल्हा प्रशासनाच्यावतीने लोकशाही दिन सोमवार ६ जुलै २०२६ रोजी दुपारी १ ते ३ वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन भवन येथे आयोजित केला आहे. सकाळी १२ वाजेपासून निवेदनाची नोंदणी सुरु होणार आहे.

# हदगाव- हिमायतनगर तालुका नांदेड जिल्ह्यास कायम ठेवण्यास सकारात्मक प्रतिसाद

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि.३० जुन -**
हदगाव - हिमायतनगर तालुक्यांचा सम ावेश किनवट अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयात न करता नांदेड अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय कडेच कायम ठेवण्याकरिता आ. कोहळीकर यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे निवेदनाद्वारे उपरोक्त मागणी केली असता मंत्री महोदय यांनी जिल्हाधिकारी नांदेड यांना तात्काळ ही विनंती मान्य करावी असे निवेदनावर नमूद केले असून यामुळे दोन्ही तालुक्यातील लाखो नागरिकांच्या मनात जी अस्वस्थता व घालमेळ चालू होती ती या सकारात्मक घटनेमुळे आता कुठे सम ाधान व्यक्त होत आहे.

### आ. कोहळीकरांच्या मागणीस यश

पुढे निवेदनात आ. कोहळीकर यांनी नमूद केले की, दोन्ही तालुके भौगोलिक, प्रशासकीय, शैक्षणिक , वैद्यकीय तसेच व्यावसायिक दृष्ट्या नांदेड शहराशी नैसर्गिक रित्या जोडलेले आहेत. किनवट हे अंदाजे ११० ते १२० किलोमीटर अंतरावर असून शिऊर या गावापासून तर हे अंतर १४२ किलोमीटर दूर असून याचा नागरिकांना शासकीय काम ासाठी मोठा प्रवास, आर्थिक खर्च , वेळेचा अपव्य सहन करावा लागेल त्यामुळे या दोन्ही तालुक्यातील लाखो नागरिकांवर अतिरिक्त भार टाकणे हे न्याय होणार नाही जर या दोन्ही तालुक्यांचा समावेश किनवट अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आला तर नागरिकांमध्ये शासनाविषयी तीव्र नाराजी निर्माण होण्याची शक्यता असून त्याची सर्वस्वी जबाबदारी शासनावर राहील . या उलट नांदेडला खाजगी व सार्वजनिक वाहतुकीची मोठ्या प्रमाणावर सुविधा उपलब्ध आहेत तरी वरील निर्णय तात्काळ मागे घेण्यात यावा अशी मागणी करण्यात आली त्याच महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

# पत्रकारांच्या दुचाकीला धडक देवून पसार झालेल्या कार चालकावर गुन्हा दाखल

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.३० जुन -**
वार्तांकन करण्यासाठी गेलेल्या पत्रकारांच्या दुचाकीला जाणिवपूर्वक धडक देवून पसार झालेल्या अज्ञात कार चालकाविरुध्द कंधार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नांदेड शहरातील पत्रकार प्रविणकुमार देशमुख व पत्रकार यशपाल भोसले दि.२८ जून रोजी वार्तांकन करण्यासाठी कंधार येथे त्यांची मोटारसायकल क्र.एमएच-२६-बीपी-३९६५ वरुन जात असताना लालवाडी जवळ एका पांढर्या रंगाच्या कारने त्यांना जोरदार धडक दिली. हा अपघात अनपेक्षितपणे नव्हे तर जाणिवपूर्वक कार चालकाने धडक दिल्याचे प्रविणकुमार देशम ुख यांनी फिर्यादीत नमुद केले आहे. दरम्यान या अपघातात दुचाकीवरील पत्रकार प्रविणकुमार देशमुख व यशपाल भोसले हे दोघेही जखमी झाले. गावकर्यांनी त्यांना मदत करत कंधार येथील प्राथमिक रुग्णालयात पाठवून दिले. या अपघातात प्रविणकुमार देशम ुख यांच्या दुचाकीचे दहा हजार रुपयांचे नुकसान झाले असून, या प्रकरणी प्रविणकुमार देशमुख यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन कंधार पोलीस ठाण्यात अज्ञात कार चालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# माऊलींच्या नामघोषात नरसीची दिंडी २ जुलैला पंढरपूरकडे प्रस्थान

**तभा वृतसेवा**
**नरसी,दि.३० जुन -**
परमपूज्य सद्गुरू गुंडा (चंद्रशेखर) महाराज देगलूरकर यांच्या कृपाशीर्वादाने श्रीराम मंदिर देवस्थान, नरसी यांच्या वतीने आयोजित पारंपरिक आळंदी-पंढरपूर पायी दिंडी सोहळ्याचे प्रस्थान गुरुवार, २ जुलै रोजी होणार आहे. विठ्ठलनामाच्या अखंड गजरात आणि भक्तिमय वातावरणात निघणाऱ्या या दिंडीत सहभागी होण्यासाठी परिसरातील वारकरी, टाळकरी व भाविकांना आवाहन करण्यात आले आहे.



दिंडी प्रस्थानापूर्वी सकाळी ११ वाजता गुरुपूजन, वारीचे महत्त्व विषद करणारे प्रवचन, आरती आणि महाप्रसादाचा कार्यक्रम होणार असून, त्यानंतर सद्गुरूंच्या शुभहस्ते दिंडी पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ होईल. वारीपूर्वी परळी वैजनाथ, पैठण, नेवासा, शनिशिंगणापूर, शिर्डी, नाशिक, त्र्यंबकेश्वर, भीमाशंकर, देहू आणि आळंदी या प्रमुख तीर्थक्षेत्रांचे दर्शन घेण्याचीही व्यवस्था करण्यात आली आहे.

दिंडीतील प्रत्येक दिवस हरिनामाच्या गजराने भारलेला असणार आहे. हरिपाठ, नामस्मरण, भजन, कीर्तन, प्रवचन आणि भारूड यांच्या माध्यमातून संत परंपरेचा विचार जनमानसापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जाणार असून, विविध भागांतील नामवंत कीर्तनकार आणि प्रवचनकार यांची उपस्थिती लाभणार आहे.

दिंडी प्रमुख ह.भ.प. रामकिशन महाराज (श्रीराम मंदिर देवस्थान, नरसी) यांनी परिसरातील सर्व वारकरी, भजनप्रेमी व विठ्ठलभक्तांनी या पायी वारीत सहभागी होऊन संतसंग, नामस्मरण आणि विठ्ठलभक्तीचा अम ूल्य लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे. वारकरी संप्रदायाची शिस्त, समता आणि भक्तीचा संदेश समाजापर्यंत पोहोचविणाऱ्या या पारंपरिक दिंडीकडे परिसरातील भाविकांचे लक्ष लागले आहे.

# उद्योगपती कवळे गुरुजी यांचा पत्नीचे जिल्हा बँकेसाठी नामांकन पत्र दाखल

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.३० जुन -**
नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणूकीसाठी नामांकन पत्र दाखल करण्यासाठी दिनांक ३० जून शेवटची तारिख आहे. उमरी तालूका सेवा सहकारी सोसायटी मतदार संघातील प्रतिनिधी पदासाठी दिनांक २९जून २०२६ रोजी सहकार क्षेत्राचा दांडगा अनुभव असलेले उद्योजक मारोतराव कवळे गुरुजींनी आपल्या शेकडो समर्थक कार्यकर्ते आणि सेवा सहकारी सोसायटी मतदारांचे साक्षीने त्यांचे नामांकन पत्र जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत निवडणूक अधिकारी यांचेकडे दाखल केले.



सदरील नामांकन पत्र दाखल करतांना दत्ताहारी पाटील चोळाखेकर, श्रीहरी देशमुख, रविंद्र पोतगंटीवार, पिराजी पाटील, श्यामराव पाटील चोळाखेकर, शिवाजीराव पाटील बाभुळगावकर, विठ्ठलराव पाटील, शिवराज गाडीवान, सुर्यकांत राव पाटील जुन्नीकर, अशोक पाटील वडजे, श्रीराम जगदंबे, चंदू पाटील, उमरीचे माजी नगराध्यक्ष संजय कुलकर्णी, सुभाष पेरेवार, श्रीनिवास अनंतवार, डॉ. विक्रम देशमुख, बापुसाहेब कौडगावकर, बाळासाहेब पवार हातनीकर, मल्लिकार्जुन चंदापुरे, अनिल वडजे, संदिप कवळे, प्रभाकर पुयेड, गणेशराव सरसे, संभाजी पाटील सावंत गोरठेकर, साई पाटील ढेरे, व्यंकटराव कवळे, देवराव हस्सेकर, डॉ. अमोल ढगे, ज्ञानेश्वर सावंत, आनंदराव ढगे, आनंद चव्हाण आदीं कार्यकर्ते उपस्थित होते.

# वयोवृद्ध ज्येष्ठ साहित्यिक कलावंतांनी ३१ जुलै पर्यंत ऑनलाईन अर्ज करावेत : भवरे

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.३० जुन -**
राज्यशासनाच्या राजर्षी शाहू महाराज जेष्ठ साहित्यिक व कलावंत मानधन योजना २०२६-२०२७ या आर्थिक वर्षात वयोवृद्ध जेष्ठ कलावंत शाहीर लोक पारंपारीक कलावंताकडून ऑनलाइन अर्ज मागविण्यात येत आहेत.इच्छुक व पात्र लाभार्थ्यांनी १जुलै ते ३१ जुलै पर्यंत आपले सरकार पोर्टल ऑनलाइन अर्ज करावेत असेआवाहन या मानधन निवड समितीचे अध्यक्ष तथा, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व मानधन निवड समितीचे सचिव तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी डी.बी.गिरी यांनी केले आहे.



अर्जदाराचे वय ५० वर्षापेक्षा अधिक असणे गरजेचे आहे.कलाकाराचे सर्व मार्गाने कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ६० हजार रुपयापर्यंत असणे तसेच दिव्यांग करलाकाकिरता वयो मर्यादा ४० वर्षे आहे कलाकार साहित्यिक महाराष्ट्राचा रहिवासी असणे बंधनकारक आहे. अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे वयाचा दाखला ५० पेक्षा जास्त दिव्यांगांना ४० वर्षे वयासाठी मर्यादा, जन्म तारखे करता प्रमाणपत्र,टीसी ची प्रत,निर्गम उतारा,आधार कार्ड ,उत्पन्नाचा दाखला ६०.०००, तहसीलदार रहिवासी दाखला, प्रतिज्ञापत्र इतर कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ घेतल्या नसल्या बाबतचा शंभर रुपयाचा बॉण्ड पेपर,पती-पत्नीचा एकत्र फोटो,बँक पासबुक, अपंगत्त्वाचा दाखला,विधवा परित्यक्ता दाखला,राज्य केंद्र सरकारचे पुरस्कार प्रमाणपत्र,नामांकित संस्था व्यक्तींचे शिफारस पत्र,विविध पुरावे,मोबाईल क्रमांक, आधार क्रमांक,बँकेस मोबाईल क्रमांक लिंक असणे आवश्यक आहे.शासन निर्णय तरतुदीनुसार सर्व अटी शर्ती लागू राहतील ही योजना विशेषतः ग्रामीण भागातील दुर्लक्षित आणि पारंपारिक कला जपणाऱ्या जेष्ठ कलाकारासाठी महत्त्वाची असून अनेक पात्र कलावंत माहिती अभावी या योजनेपासून वंचित राहत आहेत.त्यामुळे अशा कलाकारापर्यंत या योजनेची माहिती पोहोचविण्याची गरज आहे.

सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या निर्देशानुसार एक जुलै ते ३१ जुलै या कालावधीत अर्ज प्रक्रिया सुरू राहणारा असून कलाकारांनी आपले सरकार पोर्टल वरील अर्ज प्रणाली द्वारे ऑनलाईन अर्ज सादर करावेत मुदत संपल्यानंतर आलेले अर्जाचा विचार केला जाणार नसल्याचे ही स्पष्ट करण्यात आले आहे. नांदेड जिल्ह्यातील वयोवृद्ध लोक पारपारिक कलावंत शाहीर भारुडकार ,गोंधळी, वासुदेव, पोतराज ,बंजारा लोकनाट्य, नाट्य कलावंत, साहित्यिक, कवी ,गायक ,वादक ,लोक पारंपारिक कलावंत लोकसंस्कृती क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या ज्येष्ठ साहित्यिक कलावंतांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन त्रिरत्नकुमार मा.भवरे कामारीकर संस्थापक/ अध्यक्ष पारंपरिक शहर लोककला संवर्धन मंडळ महाराष्ट्र राज्य, तथा, अशासकीय सदस्य राजश्री शाहू महाराज जेष्ठ साहित्यिक व कलावंत मानधन सन्मान योजना जिल्हा परिषद नांदेड यांनी केले आहे

**मस्टर प्रत हरवली**
माझे तिरुमला ईलेक्ट्रिकल इंटरप्रायजेस नांदेड व साईबाबा ईलेक्ट्रिकल लायसन्सची मूळ मस्टर प्रत नांदेड भोकर बस प्रवासात गहाळ झाली असून कूणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क करावा
**संपर्क पत्ता**
लिंगूराम भूमन्ना ताटेवाड
चिखलवाडी मूदखेड रोड भोकर ता.भोकर जि.नांदेड
मो.नं.९४२१७६८९६९

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# रोजगार हमी योजनेतील कामांचा अहवाल सादर करा– जिल्हाधिकारी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० जून**
शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या विविध कामांचे वस्तुनिष्ठ मूल्यांकन करून त्याचा अहवाल तात्काळ सादर करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले.
जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, उपजिल्हाधिकारी (रोहयो) राजेश सरोदे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) केशव गड्डापोड, सर्व गटविकास अधिकारी तसेच संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.
या बैठकीत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत विहिरी, गोठे तसेच इतर विविध वैयक्तिक व सार्वजनिक कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. सुमारे ३० टक्के पूर्ण झालेली कामे, पंचनामे पूर्ण झालेली कामे तसेच पूर्णत्वास गेलेल्या कामांच्या सद्यस्थितीची तपासणी करण्यात आली.
यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी पूर्ण झालेल्या प्रत्येक कामाचे जिओ-टॅग केलेले छायाचित्र, स्थळपाहणी अहवाल आणि संबंधित यंत्रणेचे प्रमाणित मूल्यांकन तातडीने सादर करण्याचे निर्देश दिले. प्रत्येक कामासाठी स्वतंत्र फाईल तयार करून आवश्यक कागदपत्रे अद्ययावत ठेवावीत, तसेच पंचनामे पूर्ण झालेल्या कामांना प्रत्यक्ष भेट देऊन ती प्रत्यक्षात पूर्ण झाली आहेत की नाही, याची खातरजमा करावी, असेही त्यांनी सांगितले. पूर्ण झालेल्या कामांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात येणार असून, तपासणीदरम्यान कोणत्याही प्रकारची अनियमितता आढळल्यास संबंधित अधिकारी अथवा कर्मचाऱ्यांवर नियमानुसार कठोर कार्यवाही करण्यात येईल, असा इशाराही जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी यावेळी दिला.

# वट पोर्णिमेचे औचित्य साधून जिल्हा परिषदेत वृक्षारोपण



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० जून**
पर्यावरण संवर्धन आणि हरित वसुंधरेचा संदेश हिंगोली जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय संकुल परिसरात वटपौर्णिमेचे औचित्य साधून वृक्षारोपण करण्यात आले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांच्या शुभहस्ते वडाच्या झाडासह इतर विविध प्रजातींच्या वृक्षांची लागवड करण्यात आली.
वटपौर्णिमेच्या दिवशी पारंपरिक पूजेसोबतच निसर्गाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाने हा उपक्रम हाती घेतला होता. याप्रसंगी बोलताना मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी केवळ झाडे लावणे पुरेसे नसून, त्यांचे संगोपन करून ती जगवणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे सांगत पर्यावरण रक्षणाचा संदेश दिला. तसेच यावर्षी पावसाळ्यात २५ लाखापेक्षा जास्त वृक्ष लागवडीचे उद्दीष्ट देण्यात आले आहे. यासाठी प्रशासनाने विभागवार नियोजन पूर्ण केले असल्याची माहीती गायकवाड यांनी दिली.
यावेळी सुधीर ठोंबरे (अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी), नामदेव केंद्रे (प्रकल्प संचालक), दिगंबर माडे (मुख्य लेखा व वित्त अधिकारी), अतुल वायसे (जिल्हा कृषी अधिकारी), विजय बोराटे (उपमुख्य कार्यकारी अधिकारी), संदीप सोनटक्के (शिक्षणाधिकारी)
डॉ. रवींद्र पुरी (अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी), राजू नरवाडे (कार्यकारी अभियंता), प्रियंका राजपूत (जलसंधारण अधिकारी), विठ्ठल भुसारे (प्रशासकीय अधिकारी) यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाला जिल्हा परिषदेतील इतर वरिष्ठ अधिकारी तसेच मोठ्या संख्येने कर्मचारी उपस्थित होते.

# सचखंड गुरूद्वारा बोर्ड नांदेड कायदा १९५६ कायम ठेवावा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० जून**
राज्य शासनाने मंत्री मंडळात नवीन सचखंड गुरूद्वारा बोर्ड नांदेड २०२६ लागू करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे परंतु या कायद्याला शीख व सिकलीगर समाजाचा तीव्र विरोध असून राज्य शासनाने पूर्वीचा सचखंड गुरूद्वारा अधिनियम १९५६ कायदा कायम ठेवावा अशी मागणी शीख व सिकलीगर बांधवांच्यावतीने जिल्हाधिकारी यांचे मार्फत मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.
सचखंड गुरूद्वारा अधिनियम १९५६ कायदानुसार मराठवाड्यातील आठ जिल्हे आणि चंद्रपूर जिल्ह्यातील २ तालुके असा समावेश कायद्यामध्ये केलेला आहे. त्यानुसार दर ३ वर्षाला सचखंड गुरूद्वारा बोर्ड नांदेडचा प्रधान निवडला जातो. परंतु काही वर्षापूर्वी राज्य शासनाने कलम ११ संशोधन करून प्रशासक, प्रशासकीय प्रधान निवडण्याचे प्रकार केले. परंतु या निर्णयाला मराठवाड्यातील सर्व शीख व सिकलीगर बांधवांनी विरोध दर्शविला होता आणि कलम ११ संशोधन रद्द करण्याची मागणी केली आहे.
निवेदनावर ठाकुरसिंग बावरी, सुखबीरसिंग अलग, किरणसिंग टाक, शेरसिंग बावरी, सतनामसिंग टाक, जुगनसिंग टाक, किरणसिंग बावरी, पांडुसिंग बावरी, भगतसिंग टाक, राहुलसिंग बावरी, प्रेमसिंग टाक, विनोदसिंग बावरी, राजुसिंग बावरी, सुरजसिंग बावरी आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.



**हिंगोली– हिंगोली जिल्ह्यात मागील काही दिवसांत बहुतांश भागात पावसाने दमदार हजेरी लावली असून शेतकरी कामाला लागले आहेत. औंढा नागनाथ तालुक्यातील जवळा बाजार परिसरात शेतकरी आता पेरणीला लागल्याचे चित्र दिसत आहे. छाया– दत्तात्रय शेगुकर**

## संक्षिप्त वृत्त

### सोशल मिडीयावर पोलिसाच्या फोटोचे कौतुक



हिंगोली– कायद्याचे रक्षण करत असतानाच कौटुंबिक जबाबदारी कशी पार पाडावी, याचा एक प्रत्ययकारी आणि भावूक क्षण नुकताच हिंगोली शहरात पाहायला मिळाला. पोलीस शिपाई आपल्या शासकीय कर्तव्यावर जात असताना, मार्गावरील पोलिओ बूथवर थांबला. त्याने स्वतःच्या पाल्याला मांडीवर घेऊन अत्यंत मायेने पोलिओचा डोस पाजला. आपल्या बाळाच्या आरोग्याची काळजी घेत ('बेबीसाठी' कर्तव्य) आणि त्यानंतर लगेचच समाजाच्या सुरक्षेसाठी ('ड्युटीसाठी') सज्ज होत त्यांनी दुहेरी कर्तव्य बजावले. खाकी वर्दीच्या आत दडलेल्या एका हळव्या बापाची आणि तितक्याच तत्पर पोलिसाची ही दुहेरी कर्तव्यभावना उपस्थित नागरिकांच्या मनाला स्पर्शून गेली. सध्या या कर्तव्यदक्ष पोलिसाचा फोटो सोशल मीडियावर चांगलाच कौतुकाचा विषय ठरत आहे.

### महिलांवर हल्ला करणारे वानर जेरबंद



हिंगोली– शहरात धुडगूस घालणाऱ्या दोन वानरांना वनविभागाच्या रेस्क्यू पथकाने पिंजरा लावून जेरबंद केले आहे. या वानरांनी शहरातील नारायण नगर परिसरात दोन महिलांना जखमी केल्याची घटना घडली होती. याची माहिती वन विभागाला मिळाल्यानंतर विभागीय वन अधिकारी डॉ राजेंद्र नाळे, सचिन माने वनपरिक्षेत्र अधिकारी मीनाक्षी पवार यांनी तातडीने रेस्क्यू टीमला या भागात रवाना करत या माकडांना पकडून नैसर्गिक अधिवासात सोडण्याच्या सूचना दिल्या होत्या. दरम्यान वनविभागाचे रेस्क्यू टीमचे कर्मचारी संग्राम भालेराव, विनायक राऊत, उमेश मोहरील यांनी पिंजरा लावत या माकडांना पकडण्याचा प्रयत्न केला. मंगळवारी ही दोन्ही वानरे वन विभागाच्या पिंजऱ्याच्या आत मध्ये अडकली. वन अधिकाऱ्यांच्या आदेशाने आता पुढील कार्यवाही करून ही वानरे नैसर्गिक अधिवासात सोडण्यात येणार आहेत अशी माहिती वन विभागाने दिली आहे.

### हिंगोलीत दररोज पावसाच्या सरी

हिंगोली– हिंगोली शहरात मागील चार ते पाच दिवसांपासून पावसाने हजेरी लावली असून दिवसभरात दोन ते तीन वेळा पावसाच्या सरी कोसळत असल्यामुळे वातावरणात थंडावा निर्माण झाला आहे.

# शेतकऱ्यांचे हळदीचे कट्टे लंपास करणारा स्थागुशाने केला जेरबंद



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० जून**
सेनगाव तालुक्यामध्ये मागील काही दिवसांत हळद व इतर धान्य चोरीला जाण्याचे प्रकार वाढले होते. या प्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तपास करीत एका आरोपीला जेरबंद केले असून त्याच्याकडून १ लाख ९८ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.
सेनगाव तालुक्यात शेतकऱ्यांची हळद व इतर धान्य चोरीला जाण्याचे प्रकार वाढले होते. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेवून पोलिस अधीक्षक श्रेणीक लोढा, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना यांनी सदर आरोपींचा तपास करण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेला आदेश दिले. त्याअनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गोपनीय माहीती आणि तंत्रशुध्द तपास करीत या प्रकरणातील आरोपी ऋषीकेश टाले यास खुडज शिवारातून ताब्यात घेतले. पोलिसांनी अधिक चौकशी केली असता त्याने हळदीचे कट्टे लंपास केल्याची कबूल केले. तसेच पुणे येथून चोरी केलेली एक मोटारसायकल व कागदपत्रे नसलेली आणखी एक मोटारसायकल मिळून आली. दोन्ही मोटारसायकल पोलिसांनी जप्त केल्या आहेत. तिन्ही गुन्ह्यातील १ लाख ९८ हजारांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. सदरील कामगिरी पोलिस निरीक्षक मोहन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि दिलीप मोरे, रविकिरण खंदारे, जमादार प्रेमदास चव्हाण, कोंडीबा मगरे, संदीप जाधव, नितीन गोरे, विक्रम कुंदनानी, सुभाष घुगे, साईनाथ कंठे आदींनी केली.

# साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समितीची कार्यकारणी जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३० जून**
साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. आण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या सार्वजनिक जयंतीनिमित्त विविध सामाजिक, सांस्कृतिक व जनजागृतीपर कार्यक्रमांचे नियोजन करण्यासाठी रविवारी (दि.२८ जून) शासकीय विश्रामगृह, हिंगोली येथे बैठक उत्साहात पार पडली. विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.
बैठकीत सर्वानुमते लहुजी शक्ती सेनेचे कोअर जिल्हाध्यक्ष सुशील श्रावणजी कसबे यांची जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीचे उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात स्वागत करून अभिनंदन केले.
यावेळी अखिल भारतीय मातंग संघाचे जिल्हाध्यक्ष शेषरावजी चव्हाण, कार्याध्यक्ष सोपानराव पाटोडे, डॉ. अण्णाभाऊ साठे क्रांती फोर्सचे जिल्हाध्यक्ष प्रदीप खंदारे, सामाजिक कार्यकर्ते अक्षय डाखोरे, लहुजी शक्ती सेनेचे जिल्हाध्यक्ष संदेश शिखरे, शहर प्रमुख संतोष घोंगडे, तसेच सोनू चांदणे, नागेश सूर्यवंशी, अविनाश गायकवाड, जितेंद्र हनवते, गोविंद आठवले आणि अजय कांबळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.
बैठकीत डॉ. आण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा व्यापक प्रसार करण्यासाठी जयंतीनिमित्त विविध सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्याचा निर्णय घेण्यात आला. जयंती मोठ्या उत्साहात, शिस्तबद्ध आणि समाजातील सर्व घटकांच्या सहभागातून साजरी करण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला.
नवीन अध्यक्ष सुशील कसबे यांनी निवडीनंतर बोलताना, डॉ. आण्णाभाऊ साठे यांचे विचार आणि कार्य आजच्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी सर्व समाजबांधवांच्या सहकार्याने भव्य आणि प्रेरणादायी जयंती उत्सव साजरा करण्यात येईल, असा विश्वास व्यक्त केला.
बैठकीच्या शेवटी उपस्थितांनी जयंती उत्सव यशस्वी करण्यासाठी एकजुटीने काम करण्याचा संकल्प केला.

# अवैध वाळू वाहतुक करणारे टिप्पर शहर पोलिसांनी पकडले, गुन्हा दाखल



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० जून**
जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अवैधरित्या वाळूची वाहतुक करणाऱ्या एका टिप्परसह १०.२५ लाख रूपयांचा मुद्देमाल शहर पोलिसांनी जप्त केला आहे. याप्रकरणी मंगळवार दि ३० जून रोजी शहर पोलिस ठाण्यात तिघांविरूध्द गुन्हा दाखल झाला असून दोघांना ताब्यात घेण्यात आले आहे.
जिल्ह्यात अवैधरित्या वाळू उपसा व वाहतुक करणाऱ्यावर पोलिस कारवाई करीत आहे. नूतन पोलिस अधीक्षक श्रेणीक लोढा, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना यांच्या मार्गदर्शनाखाली पथके स्थापन करण्यात आली आहेत. या पथकाडून दररोज पहाटे व रात्रीच्या सुमारास वाहनांची तपासणी केली जात आहे. मंगळवारी पहाटे एका टिप्पर मधून वाळूची वाहतुक केली जात असल्याची माहीती पोलिसांना मिळाली होती. त्यावरून पोलिस निरीक्षक गजेंद्रसिंह ठाकूर, सपोउपनि संजय मार्के, जमादार अशोक धामणे, गणेश लेकुळे, शेख मोहसीन, दिलीप लेकुळे, आकाश बोथीकर यांचय पथकाने पहाटे साडेपाच वाजल्यापासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील मार्गावर वाहनांची तपासणी सुरू केली होती. यावेळी पोलिसांनी एक टिप्पर थांबवून चालकाकडे चौकशी केली असता चालकाला समाधानकारक उत्तरे देता आली नाही. याशिवाय वाळू वाहतुकीचय पावत्या देखील आढळून आल्या नाहीत. त्यामुळे पोलिसांनी टिप्पर व वाळू जप्त केली आहे. याप्रकरणी गणेश लेकुळे यांच्या तक्रारीवरून टिप्पर चालक गोपाल राठोड रा. ब्राम्हणवाडा, कपील शेवाळे रा गंगानगर कारवाडी, गजानन मोरे रा माळीपूरा लोणार यांच्या विरूध्द गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी गोपाल व कपील यांना चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. पुढील तपास काळे हे करीत आहेत.शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक गजेंद्रसिंह ठाकूर यांनी अवैध धंद्याविरोधात जोरदार मोहीम सुरू केली आहे.

# एचआरपीएस नंबर प्लेट न बसविणाऱ्या वाहनांवर आजपासून कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० जून**
जिल्ह्यातील सर्व वाहनधारकांनी केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ मधील नियम ५० नुसार सर्व वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी (एचएसआरपी) बसविणे बंधनकारक आहे. दि. १ जुलै २०२६ पासून एचएसआरपी न बसविणाऱ्या सर्व जुन्या व नव्या वाहनांवर वायुवेग पथकाद्वारे कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. मात्र, दि. ३० जून २०२६ पर्यंत एचएसआरपी बसविण्यासाठी अपॉइंटमेंट घेतलेल्या वाहनधारकांवर कोणतीही कारवाई करण्यात येणार नसल्याचे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.
परिवहन आयुक्त यांच्या १८ मे २०२६ च्या परिपत्रकानुसार मुदत वाढ देण्यात आली होती. त्यामुळे दि. १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या सर्व वाहनांना एचएसआरपी बसविण्याचे निर्देश दिले आहेत. याशिवाय, एचएसआरपी न बसविणाऱ्या वाहनधारकांच्या वाहन हस्तांतरण, कर्जबोजा चढविणे, कर्जबोजा उतरविणे आदी कामांवर यापूर्वीच निर्बंध लागू करण्यात आले आहेत. तसेच, यापुढे एचएसआरपी नसलेल्या वाहनांची पुनर्नोंदणी, वाहनातील बदल, परवाना नूतनीकरण आदी सर्व कामे (योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरण वगळता) करण्यात येणार नाहीत.
जिल्ह्यातील सर्व वाहनधारकांनी तात्काळ आपल्या वाहनांना एचएसआरपी बसवून घेऊन कायदेशीर कारवाई टाळावी, असे आवाहन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, हिंगोली यांनी केले आहे.